
# कलेचा इतिहास व रसग्रहण

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३१.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# कलेचा इतिहास व रसग्रहण

## इयत्ता बारावी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

M4C9S3

आपल्या स्मार्टफोनवर DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**कलेचा इतिहास व रसग्रहण अभ्यासगट**

डॉ. शिरीष आंबेकर
श्री. जगदीश पाटील
श्री. विलास गोपाळे
श्री. सूर्यकांत जाधव
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**अक्षरजुळवणी**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व अंतर्गत चित्राकृती**
श्री. सूर्यकांत जाधव
श्रीमती भारती हिंगणे
श्री. विलास गोपाळे
श्रीमती मयुरा डफळ
श्री. अभिजीत धोत्रे

**निर्मिती**
श्री. सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. संदीप आजगावकर,
निर्मिती अधिकारी

**कागद**
७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**प्रमुख संयोजक**
**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी, कला शिक्षण,
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

इयत्ता बारावीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत. 'कलेचा इतिहास व रसग्रहण' या विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे.

दैनंदिन जीवनात कला या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कलेची विविध अंगे आत्मसात करता करताच कलेच्या इतिहासाचाही परिचय व्हावा, हा या पाठ्यपुस्तक निर्मितीमागील हेतू आहे. या पुस्तिकेत मूलभूत अभ्यासक्रमाच्या रूपरेषेनुसार भारतीय व पाश्चात्य कलेच्या इतिहासाची ओळख व्हावी आणि कला इतिहासाच्या अभ्यासाचे क्षेत्रही स्पष्ट व्हावे, ह्या दृष्टीने सैद्धांतिक व प्रात्यक्षिक अशा दोन विभागांत अभ्यासक्रमाची मांडणी करण्यात आलेली आहे.

पाठाखालील स्वाध्यायाचे स्वरूप आणि रचना वैविध्य हे या पाठ्यपुस्तकाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य आहे. स्वाध्याय तुम्हांला पाठाचे अंतरंग समजून घेण्यास मदत करतील. तुमच्यातील कल्पकता, सर्जनशीलता, विचारशक्ती आणि आकलनशक्ती विकसित करण्यासाठी हे स्वाध्याय निश्चितच उपयुक्त ठरतील. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तुमचा सातत्यपूर्ण सराव यातून तुम्हांला सहज अभ्यास करता येईल.

अध्ययन प्रक्रिया आनंददायी होण्यासाठी क्यू. आर. कोडद्वारे दृकश्राव्य माहिती आपणास उपलब्ध होईल. या विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावीपणे, सहजतेने व आनंदाने व्हावे या दृष्टीने हे पाठ्यपुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल. यापूर्वी कलेचा इतिहास व रसग्रहण या विषयाची शिक्षक हस्तपुस्तिका तयार करण्यात येत असे परंतु यावर्षी प्रथमच 'कलेचा इतिहास व रसग्रहण' या विषयासाठी पाठ्यपुस्तक तयार केले आहे. या पाठ्यपुस्तकात प्रात्यक्षिक विषयांचाही समावेश केलेला आहे. मुख्याध्यापक, पालक, विद्यार्थी तसेच या विषयाचे जाणकार या सर्वांकडून विद्यार्थ्यांसाठी प्रथमच तयार केलेल्या या चार रंगी पाठ्यपुस्तकाचे स्वागतच होईल अशी आशा आहे.

पाठ्यपुस्तक वापरताना काही शंका वा अडचणी आल्यास त्या मंडळाला जरूर कळवाव्यात. तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

(विवेक उत्तम गोसावी)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

## शिक्षकांसाठी

विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचा विकास करून त्यांच्या जास्तीत जास्त क्षमता उपयोगात आणणे अपेक्षित आहे. या विकास प्रक्रियेत व उपाययोजनांमध्ये आपला फार मोठा वाटा आहे. हा विषय अभ्यासण्यासाठी दोन भागांत विभागण्यात आला आहे.

**अ) सैद्धांतिक विभाग :**

भारतीय व पाश्चात्य कला इतिहासातील चित्रकला, शिल्पकला व वास्तुकला यांविषयीची चित्रमय माहिती अतिशय सोप्या भाषेत देण्यात आलेली आहे. हा भाग **अनिवार्य** आहे. कलाकृतींच्या रसग्रहणासाठी–
**वास्तू** – सूर्य मंदिर,कैलास मंदिर, कुतुब मिनार, ताजमहाल. **शिल्प**– गंगावतरण, त्रिमूर्ती, स्टॅच्यू ऑफ युनिटी, पिएत्ता
**चित्र–** मोनालिसा, तारांकित रात्र (स्टारी नाईट) रात्रीचा पहारा (नाईट वॉच) सैरंध्री इत्यादी.

**ब) प्रात्यक्षिक विभाग :**

चित्रकला, संकल्पचित्र व चित्रात्मक संकल्पाविषयीची चित्र, आकृत्या, फोटो याद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रात्यक्षिकांपैकी **कोणताही एक प्रात्यक्षिक विषय** विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार घेता येईल. पुस्तकात शेवटी दिलेली चित्रे ही विद्यार्थ्यांची आहेत. प्रात्यक्षिक कार्य करताना/देताना उपलब्ध साधन सुविधा विचारात घेऊन प्रात्यक्षिक कार्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी बदल करण्यास हरकत नाही. वर्षभरात केलेल्या वर्गकामांतील एक प्रात्यक्षिक काम वार्षिक परीक्षेत असणे अपेक्षित आहे. संपूर्ण वार्षिक कामाला वर्षाअखेर गुण द्यावेत व या अंतर्गत मुल्यमापनाची नोंद ठेवावी. सदर प्रात्यक्षिक कार्य हे विषयाची उद्दिष्टे समोर ठेवून देण्यात आलेले आहे. यात शिक्षक आपल्या कल्पकतेने उद्दिष्टांनुसार बदल करू शकतात. प्रात्यक्षिक कार्यासाठी शिक्षकांनी विविध घटक व रंगसंवादांची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.

या विषयाची आवड वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांना या संदर्भातील पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, त्यातून त्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त नवनवीन चित्रे, शिल्प, वास्तू यांची माहिती मिळवण्यासाठी उद्युक्त करावे. विविध कलासंग्रहालयांत प्रत्यक्ष नेऊन चित्रे, शिल्पे दाखवावीत, प्रत्यक्ष वास्तू किंवा फोटो दाखवावे व त्याचे महत्व सांगावे. आपल्या जवळच्या एखाद्या प्रसिद्ध वास्तूस भेट देऊन त्याविषयीची अधिक माहिती त्यांना द्यावी. अनेक ठिकाणी कलाप्रदर्शने भरतात त्यांना भेटी देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे. या विषयासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच वृत्तपत्रे, मासिके यांत येणाऱ्या अद्ययावत तपशीलाची कात्रणे काढून त्यांचा कात्रण संग्रह करण्याविषयी मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्राकृतींचे प्रदर्शन भरवावे.

या विषयाचे परिपूर्ण ज्ञान देण्यासाठी स्वयंअध्ययन, विविध कौशल्ये, शैक्षणिक साधने यांचा वापर करून आपली अध्यापन पद्धती प्रभावीपणे राबवाल याची खात्री आहेच. पुस्तकातील सर्व घटक ज्ञानरचनावादी पद्धतीने शिकवणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रत्येक घटकानंतर काही स्वाध्याय व इतर उपक्रम देण्यात आले आहेत. कोणतेही प्रकरण शिकवण्याआधी त्यातील उपक्रमांचे नियोजन करावयाचे आहे. **पुस्तकात नमुन्यादाखल काही प्रात्यक्षिके दिली आहेत. आवश्यकतेप्रमाणे त्यात बदल करण्यास हरकत नाही.** विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कलाकार किंवा व्यावसायिक कलाकार म्हणून आवश्यक कौशल्ये विकसित होतील या दृष्टीने आपणांकडून प्रयत्न होणे अपेक्षित आहे.

यापूर्वी कलेचा इतिहास व रसग्रहण या विषयाची शिक्षक हस्तपुस्तिका तयार करण्यात येत असे. परंतु यावर्षी प्रथमच 'कलेचा इतिहास व रसग्रहण' विषयाचे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. याचा उपयोग विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक व जिज्ञासू वाचकांना निश्चित होईल. या पुस्तकाचे लेखन संपादनात **श्री. राजेंद्र महाजन, श्री. दिपक जोगदंड आणि श्रीमती मेघा मानेकर** यांनी तसेच गुणवत्ता परीक्षण **श्रीमती हेमा धोत्रे** यांनी केले त्याबद्दल अभ्यासगट त्यांचे आभारी आहे.

**कलेचा इतिहास व रसग्रहण अभ्यासगट,**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

## विद्यार्थ्यांसाठी

कला हा विषय तुम्हांला परिचित आहेच. कलेचा इतिहास व रसग्रहण या विषयाच्या अभ्यासामुळे तुम्हांला अनेक नवनवीन गोष्टींचे ज्ञान मिळणार आहे. भारतीय तसेच पाश्चात्य कला, त्यांचा समृद्‌ध इतिहास किती मोठा आहे याची माहिती या विषयाद्‌वारे मिळणार आहे. येथे अगदी थोडासाच भाग आपल्याला अभ्यासण्यासाठी दिलेला आहे. या विषयाच्या अभ्यासामुळे तुमचा बौद्‌धिक तसेच कौशल्यात्मक विकास होईल अशाच कृतींचा आणि माहितीचा समावेश या विषयात केलेला आहे. यात गोडी निर्माण करण्यासाठी या विषयाची पुस्तके तसेच मासिकांत, वृत्तपत्रांत येणारे लेख वाचा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही अधिक माहिती तुम्हांला मिळू शकेल.

विविध कलासंग्रहालयांना जरूर भेटी द्या. तेथील प्राचीन शिल्पे, चित्रे, वास्तू नमुने पहा व अभ्यासा. शक्य असल्यास वेगवेगळ्या प्राचीन ठिकाणांना भेटी द्या. शैली, शिल्प, पाषाणाचा प्रकार, शिल्पे घडवण्याची पद्‌धत, शिल्पातून सांगितलेल्या कथा बारकाईने अभ्यासा. त्यांची चित्रे, फोटो आणि माहिती जमा करून कात्रणवही तयार करा.

प्रसिद्‌ध चित्रकारांची चित्रे अभ्यासा, रेखाटने, रंग देण्याच्या पद्‌धती, माध्यम यांसारख्या वैशिष्ट्यांचे निरीक्षण करा. चित्रांची प्रदर्शने भरतात त्यांना भेटी द्या. नावीन्यपूर्ण गोष्टी टिपून ठेवा. त्या आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. कला ही शास्त्र व क्रियात्मक स्वरूपात विभागलेली असते. शास्त्राबरोबरच क्रियात्मक म्हणजेच प्रात्यक्षिक कार्यावरही भर देत असताना चित्रकला, संकल्पचित्र व चित्रात्मक संकल्प यांचा समावेश प्रात्यक्षिकांमध्ये केलेला आहे. प्रात्यक्षिकांचा सरावही तितकाच महत्त्वाचा घटक आहे. त्या दृष्टीने आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सराव करावा.

कलेचा समृद्‌ध ठेवा तुम्ही या विषयाद्‌वारे अभ्यासणार आहात. सौंदर्यदृष्टी, जिज्ञासूवृत्ती, कल्पकता, टापटीपपणा, नीटनेटकेपणा यांसारख्या इष्ट मूल्यांची जोपासना या विषयातून आपोआपच होणार आहे.

या विषयासंदर्भात आलेल्या अडचणी सोडवण्यासाठी आपले शिक्षक मदतीला आहेत. या विषयाचा अभ्यास तुम्ही आनंदाने कराल ही आशा आहे. या पुस्तकातील प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वाध्याय दिला आहे. स्वाध्याय कृतिपत्रिकेवर आधारीत तयार केला आहे. स्वमत, स्वत:च्या संकल्पना, संदर्भ ग्रंथ विचारात घेऊन स्वाध्याय सोडवणे आवश्यक आहे. तसेच सरावासाठी काही प्रश्नही दिलेले आहेत.

कलेचा इतिहास व रसग्रहण या पुस्तकाच्या माध्यमातून कला विषयाचा अभ्यास करण्यासाठी आपणांस शुभेच्छा!

**कलेचा इतिहास व रसग्रहण अभ्यासगट,**

पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

# कलेचा इतिहास व रसग्रहण क्षमता विधाने : इयत्ता बारावी

| अ.क्र. | क्षमता विधाने |
|---|---|
| १. | कलेच्या विकासातील टप्पे माहीत होणे. |
| २. | भारतीय मंदिररचनेचा विकास अभ्यासणे. |
| ३. | नागर, द्राविड, वेसर शैलींची वैशिष्ट्ये जाणून घेणे. |
| ४. | प्रसिद्ध मंदिरांची व इतर शिल्पांची माहिती घेणे. |
| ५. | मोगल शैली, पहाडी शैली यांचा अभ्यास करणे. |
| ६. | सामाजिक व धार्मिक कल्पना यांतून निर्माण झालेली कला अभ्यासणे. |
| ७. | प्रसिद्ध चित्रकार, शिल्पकार यांची माहिती घेणे. |
| ८. | पाश्चात्य वास्तुकलेची माहिती व वैशिष्ट्ये समजून घेणे. |
| ९. | मायकेल अँजेलो, लिओनार्दो-द-विंची या प्रसिद्ध कलाकारांविषयीची माहिती घेणे. |
| १०. | आधुनिक कलाप्रवाहाची वैशिष्ट्ये जाणून घेणे. |
| ११. | बर्निनी या वास्तुकाराविषयी माहिती घेणे. |
| १२. | पाश्चात्य वास्तुकलेतील, पिसाचा झुकता मनोरा या वास्तूंची वैशिष्ट्ये समजून घेणे. |
| १३. | हाजिया सोफिया या चर्चची वास्तुकलाविषयक वैशिष्ट्ये अभ्यासणे. |
| १४. | अतिवास्तववादी कलाप्रणालीची माहिती घेणे. |
| १५. | शिल्प, वास्तू व चित्र यांविषयीची माहिती अभ्यासणे. |
| | **प्रात्यक्षिक विषय (कोणताही एक विषय)**<br>चित्रकला (Drawing)<br>संकल्पचित्र व रंगकाम (Design and colour)<br>चित्रात्मक संकल्प (Pictorial Composition) |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव (सैद्धांतिक विभाग) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | (अ) सैध्दांतिक | |
| (१) | भाग १ भारतीय कला | |
| | १. भारतीय वास्तुकला | १ |
| | २. भारतीय शिल्पकला | ३० |
| | ३. भारतीय चित्रकला | ३९ |
| (२) | भाग २ पाश्चात्य कला | |
| | ४. पाश्चात्य वास्तुकला | ५७ |
| | ५. पाश्चात्य शिल्पकला | ६३ |
| | ६. पाश्चात्य चित्रकला | ६९ |
| (३) | भाग ३ कला शिक्षण | |
| | कला शिक्षणातील व्यवसायाच्या वाटा | ८० |
| | कला शिक्षणाच्या संधी | ८२ |
| (४) | (ब) प्रात्यक्षिक विषय (कोणताही एक विषय) | |
| | १. चित्रकला (Drawing) | ८४ |
| | २. संकल्पचित्र व रंगकाम (Design and Colour) | ८६ |
| | ३. चित्रात्मक संकल्प (Pictorial Composition) | ८८ |

# प्रात्यक्षिक विभाग

## १. चित्रकला (Drawing)

| अ. क्र. | घटक | उपघटक |
|---|---|---|
| १. | **चित्रकलेचे मूळ घटक** | (i) रेषा (ii) आकार (iii) रंग (iv) छायाभेद (v) पोत |
| २. | **रेखाटन** | रेखाटनाची माध्यमे<br>(i) पेन्सिल (ii) पेन (iii) स्केचपेन (iv) कलरब्रश<br>(v) संगणक (आधुनिक साधने) |
| ३. | **नैसर्गिक घटकांची रेखाटने** | पाने, फुले, फळे, पक्षी, प्राणी इत्यादी |
| ४. | **मानवनिर्मित घटकांची रेखाटने** | भांडी, घर, फर्निचर, वाहने इत्यादी |
| ५. | **भौमितिक घटकांची रेखाटने** | त्रिकोण, चौकोन, वर्तुळ इत्यादी |
| ६. | **निसर्गचित्र** | निसर्गातील रेखाटने |
| ७. | **वस्तुचित्र** | विविध वस्तुसमूहांचे रेखाटन |
| ८. | **सुलेखनाचे मूलभूत रेखाटन** | देवनागरी आणि रोमन |

## २. संकल्पचित्र व रंगकाम (Design and Colour)

| अ. क्र. | घटक | उपघटक |
|---|---|---|
| १. | **चित्रकलेचे मूळ घटक** | (i) रेषा (ii) आकार (iii) रंग (iv) छायाभेद (v) पोत |
| २. | **संकल्प** | (i) संकल्प म्हणजे काय? (ii) संकल्पाचे प्रकार<br>(iii) संकल्पाची मूलतत्त्वे |
| ३. | **रंग व रंगसिद्धांत** | (i) रंगव्याख्या (ii) रंगज्ञान (iii) चित्रकारांचा रंगसिद्धांत (iv) रंगांची गुणवैशिष्ट्ये (v) रंगांचे प्रतीकात्मक अर्थ (vi) रंगमिश्रणे |

## ३. चित्रात्मक संकल्प (Pictorial Composition)

| अ. क्र. | घटक | उपघटक |
|---|---|---|
| १. | **चित्रकलेचे मूळ घटक** | (i) रेषा (ii) आकार (iii) रंग (iv) छायाभेद (v) पोत |
| २. | **संकल्पाची मूलतत्त्वे** | • पुनरावृत्ती • विरोध • लय • श्रेणीक्रम • प्रमाण<br>• संक्रमण • संवाद • विविधता • उत्सर्जन<br>• तोल • प्राधान्य • गौणत्व • एकता |
| ३. | **मुद्राचित्रण** | (i) नैसर्गिक पृष्ठभागावर केलेले मुद्रण (ii) उठाव मुद्रा मुद्रण<br>(iii) खोद मुद्रा मुद्रण |
| ४. | **लघुचित्र** | (i) भारतीय लघुचित्र शैलीची संकल्पना<br>(ii) लघुचित्र शैलीतील रचनाचित्रांची मांडणी, घटक व माध्यम<br>(iii) लघुचित्र शैलीतील घटकांची अभ्यास रेखाटने<br>(iv) लघुचित्र शैलीवर आधारित अभ्यास चित्रे |
| ५. | **रचनाचित्र – प्रकार** | (i) अलंकारिक रचना (ii) भौमितिक रचना<br>(iii) अमूर्त रचना (iv) जाहिरात चित्र |

# भारतीय कला

## १ भारतीय वास्तुकला

### १. भारतीय मंदिर रचना

दगड आणि विटा यांचा उपयोग करून हिंदू धर्मीय देवालय बांधकामाचा प्रारंभ गुप्तकाळात झाला. सुरुवातीच्या चैत्य पद्धतीच्या रचनेनंतर चौरस गर्भगृह व त्यासमोर एक लहानसा द्वारमंडप अशी दोन भागांची साधी रचना करण्यात येई. त्यानंतर गुप्तकाळातच गर्भगृहासमोर एक सभामंडप व पुढे द्वारमंडप आणि गर्भगृहावर कमी उंचीचे लहानसे शिखर, छप्पर असलेला सभोवतीचा प्रदक्षिणा मार्ग याची भर पडली. हळूहळू त्याच्या सजावटीत अधिक अलंकारिकपणा आला.

गुप्तकाळानंतर मोठ्या आकारांची देवालये बांधण्यात आली. त्यात स्थानिक गरजेनुसार नव्या नव्या भागांची भर पडली व वास्तूचे अलंकरणही हळूहळू अधिकाधिक समृद्ध होत गेले. पूर्ण विकसित हिंदू मंदिरात विमान, अंतराल आणि मंडप असे विविध भाग निर्माण झाले.

- **विमान :** आयताकृती किंवा चौरस गर्भगृह व त्यावरील उंच निमुळते शिखर यांना मिळून 'विमान' असे नाव आहे.
- **अंतराल :** गर्भगृहात मुख्य देवतेची मूर्ती असे. गर्भगृहाला फक्त एकच दरवाजा असल्यामुळे आत अंधार असे. गर्भगृहातून मंडपात जाण्यासाठी जो चिंचोळा मार्ग असे त्याला 'अंतराल' म्हणतात.
- **मंडप :** मंडप किंवा सभामंडप हे एक प्रशस्त दालन असे व ते बहुधा स्तंभयुक्त असे. द्वारमंडपासारख्या अरुंद व तुलनेने लहान असलेल्या भागाला 'मंडप' असे म्हणतात.

भारतासारख्या विस्तीर्ण देशात स्थानिक परिस्थितीमुळे व कलाकारांच्या प्रतिभेनुसार बारीक सारीक तपशिलात खूप भिन्नता आढळून येते. तथापि मंदिर रचनेची कोणतीही शैली असली तरी विमान अंतराल व मंडप हे भाग पूर्ण विकसित स्वरूपात मंदिरात आढळून येतात.

आठव्या शतकात इमारतीच्या बांधकामाला खूपच गती मिळाली होती. बांधकाम करणाऱ्या कारागिरांच्या संघटना होत्या व या कलेचे शिक्षण उमेदवारी पद्धतीने मिळत असे. शिकाऊ उमेदवारांना 'अंतेवासिक' म्हणत. लवकरच या कलेचे शास्त्र निर्माण झाले. चित्र, शिल्प व स्थापत्य यांची निर्मिती शास्त्रोक्त नियमांनुसार होऊ लागली. सर्वच प्राचीन भारतीय कलाकृतीचे निर्माते अज्ञात आहेत. कोणत्याही प्राचीन वास्तुविशारदाचे नाव आज आपणास माहीत नाही. कारण कलावंतांना कारागिराचाच दर्जा होता.

बांधकामात उपयोगात आणलेली एकमेव पद्धत म्हणजे 'चौकट पद्धत' होय. उभ्या दोन खांबांवर आडवी तुळई बसवण्याच्या पद्धतीला 'चौकट पद्धती' म्हणतात. कमानींचा उपयोग कोठेही केलेला दिसत नाही. शिखराचे निमुळते बांधकामही याच प्रकारे केले जाई. दगडांचा वरील थर खालच्या दगडाच्या थोडा आत राहील अशा बेताने ठेवून शेवटचा दगड केवळ त्यांच्या वजनामुळेच जागच्या जागी राही. थरांच्यामध्ये चुन्याचा उपयोग केला जात नसे.

भारतात मूर्तिपूजा सुरू झाली आणि खोदलेली गुहामंदिरे अपुरी वाटू लागली. खडकात मंदिरे खोदण्यापेक्षा उघड्या मैदानात भव्य मंदिर बांधण्याची पद्धत सुरू झाली.

### मंदिराचे प्रकार :

मंदिराचा महत्वाचा व बाहेरून नजरेत भरणारा भाग म्हणजे 'विमान' होय. 'देव हे पर्वत शिखरावर वास्तव्य करतात' अशी सर्व प्राचीन संस्कृतीत प्रचलित असलेली कल्पना भारतातही होती. म्हणून देवाचे मंदिरही पर्वतशिखराप्रमाणेच उंच असावे या हेतूने मंदिराची शिखरे जास्तीत जास्त उंच करण्याकडे कल दिसून येतो. मुख्यतः विमानांच्या आकारांवरून देवालयांचे प्रकार कल्पिले आहेत. दहाव्या व अकराव्या शतकात मंदिरांचे तीन प्रकार मानण्यात येत.

१) नागर २) द्राविड ३) वेसर(वासर)

१. **नागर :** उत्तर भारतात म्हणजे हिमालयापासून विंध्य पर्वतापर्यंतच्या प्रदेशात नागर शैलीची देवालये प्रामुख्याने आढळतात.

२. **द्राविड :** द्राविड हा शब्द भौगोलिक प्रदेशाचा सूचक आहे. कृष्णा नदीपासून कन्याकुमारीपर्यंतच्या दक्षिण प्रदेशात सामान्यपणे ही शैली अस्तित्वात होती.

३. **वेसर (वासर) :** विंध्य पर्वतापासून कृष्णा नदीपर्यंतच्या प्रदेशात वेसर (वासर) शैली स्थूलमानाने अस्तित्वात होती.


दक्षिणेत नागर पद्धतीची व उत्तरेत द्राविड शैलीची मंदिरेही आढळून येतात.

### नागर शैली


नागर प्रकारच्या मंदिरांना पाश्चिमात्य समीक्षकांनी 'इंडोआर्यन मंदिर' असे नाव दिले आहे. हिंदू मंदिरांपैकी हा सर्वात प्राचीन व महत्त्वाचा प्रकार होय.

### शिखर रचना :

याचा आकार शंकूप्रमाणे वर निमुळता होत जाणारा व काहीसा बहिर्वक्र स्वरूपाचा असतो. शिखराच्या वर बसक्या कलशाप्रमाणे आकार असलेला आमलक



नागर मंदिराचे शिखर




नागर शिखर

नावाचा भाग असतो. या प्रचंड, एकसंध दगडाच्या आकाराला उभे कंगोरे कोरलेले असतात. त्यावर सर्वात शेवटी कळस असतो.

शिखराचा पाया गोलाकार किंवा गर्भगृहाचे संपूर्ण छत व्यापणारा म्हणजे चौकोनी असतो. गर्भगृहात मुख्य देवतेची मूर्ती असल्याने त्याचे शिखर सर्वात अधिक उंच असते व इतर शिखरे क्रमाक्रमाने कमी उंचीची दिसतात.



त्रिरथ पंचरथ सप्तरथ नवरथ

## मंदिर रचना :

या शैलीतील मंदिराचे गर्भगृह आतून नेहमी चौरस आकाराचे असते. पण त्याच्या चारी बाजूस बाहेरून पुढे आलेले भाग असतात. त्याला 'रथ' म्हणतात.

प्रत्येक बाजूस एकेक भाग पुढे आलेला असल्यास त्या बांधणीस 'त्रिरथ मंदिर' म्हणतात.

प्रत्येक बाजूस दोन भाग पुढे आलेले असल्यास त्या बांधणीस 'पंचरथ मंदिर' म्हणतात.

तीन भाग पुढे आल्यास 'सप्तरथ' व चार भाग पुढे आल्यास 'नवरथ' प्रकारची मंदिरे असे म्हणतात. या भागांमुळे गर्भगृहाचा बाह्य आकार जरी पुष्कळच बदलत असला तरी आतील गर्भगृह मात्र चौरस आकाराचेच रहाते. हे भाग गर्भगृहाच्या भिंतीपुरतेच मर्यादित न राहता शिखरावरही पुढे आलेले असतात.

## प्रसिद्ध मंदिरे

भुवनेश्वर, कोणार्क, खजुराहो, राजस्थान, माऊंट आबू , गुजरात आणि सौराष्ट्र या ठिकाणी नागर शैलीची मंदिरे आहेत.

## लिंगराज मंदिर – भुवनेश्वर :



लिंगराज मंदिर

**स्थळ** : भुवनेश्वर

**कालखंड** : इ.स. १०००

**राजवंश** : गंगवंश

**शैली** : ओरिसा शैली (नागर शैली)

**माध्यम** : पाषाण

**वैशिष्ट्ये** : हे भुवनेश्वरच्या मंदिरांपैकी सर्वात प्रसिद्ध व महत्वाचे मंदिर होय. हे ओरिसा शैलीतील पूर्ण विकसित व सर्वात मोठे मंदिर आहे. त्याची निर्मिती इ.स. १००० च्या सुमारास झाली. १५८ मीटर लांबी व १४२ मीटर रुंदी असणाऱ्या विस्तृत आवारात त्याची उभारणी केली आहे. या मंदिरात गर्भगृह, जगमोहन, नटमंडप व भोगमंडप एका ओळीत आहेत. प्रत्येक भागासाठी स्वतंत्र इमारत आहे. प्रत्येक मंडपावर उंची कमी होत जाणारी भद्र प्रकारची शिखरे आहेत. लिंगराज मंदिराचे मुख्य शिखर हे ४५ मीटर उंचीचे सर्वांत मोठे व शहराच्या कोणत्याही भागातून नजरेस पडेल असे आहे. सुरुवातीस ते अगदी सरळ आहे. पण मध्यावर किंचित बहिर्वक्र होत जाते. गर्भगृहाच्या भिंतीचे पुढे आलेले भाग शिखरातही तसेच वर चढत गेल्यामुळे शिखर अधिक आकर्षक दिसते. शिखरावरील आडव्या विभाजनांना 'भूमी' म्हणतात. अशा दहा भूमी या शिखरावर दिसतात. या आडव्या रेषा व सप्तरथ

प्रकारामुळे शिखरात दिसणाऱ्या उभ्या रेषा यांचा योग्य तोल साधला गेला आहे. या सर्व रचनांमुळे शिखर आकर्षक झाले आहे. शिखराच्या मुख्य भागावर मस्तक किंवा आमलक व त्यावर कलश व नंतर आयुध हे भाग आहेत. आयुध त्या देवळातील मुख्य देवतेचे प्रतीकात्मक चिन्ह असते. ओरिसा शैलीतील रेखा देऊळ, ही एक एकात्मरचना आहे. त्यांच्या विविध भागांना मानवी शरीराची नावे दिलेली आहेत. जगमोहनावरील शिखरावर सूचीच्या आकाराची, पायऱ्यांची मजले असलेली रचना आहे. या मंदिराच्या सभोवती अनेक लहान लहान मंदिरे आहेत.

## सूर्यमंदिर – कोणार्क :



सूर्यमंदिर

**स्थळ :** ओरिसा राज्यात कोणार्क येथे समुद्रकिनारी.

**कालखंड :** इ.स. १२३८ ते १२६४ राजा नरसिंह देव यांचा कालखंड.

**राजवंश :** गंगवंश.

**शैली :** ओरिसा शैली.

**माध्यम :** वालुकाश्म.

ओरिसा शैलीच्या मंदिररचनेचा शेवटचा उत्कृष्ट आविष्कार या मंदिरात पहावयास मिळतो. जगन्नाथपुरीच्या ईशान्येस समुद्र किनाऱ्याजवळ कोणार्क हे लहानसे गाव आहे. तेथे किनाऱ्यावर एकाकी अवस्थेत या मंदिराचे भग्नावशेष आज उभे आहेत.

गर्भगृह, जगमोहन (सभामंडप) व नटमंडप असे तीन विभाग ओरिसा शैलीप्रमाणे आहेत. यातील गर्भगृह व त्यावरील शिखर आज एका ढिगाऱ्याच्या स्वरूपात पहावयास मिळते, तसेच नटमंडपाचे जोते व त्यावरील स्तंभ अवशेष रूपात पहायला मिळतात.

गर्भगृहानंतरचे सभामंडप म्हणजेच जगमोहन (सभामंडप) मात्र शिखरासह भग्न स्वरूपात आज कसाबसा उभा आहे. हे कोसळू नये म्हणून आतील सर्व भाग दगडमातीने संपूर्ण भरून टाकला आहे.

पूर्ण देवालय म्हणजे सूर्याचा रथ अशी भव्य कल्पना करून देवालयाची रचना केली आहे. मंदिराच्या पायाच्या चबुतऱ्यास दोन्ही बाजूस मिळून चोवीस कोरीव दगडी चाके बसवली आहेत. ही चाके चबुतऱ्यापासून सुटी असून त्यावर अप्रतिम कोरीव काम केलेले आहे. १२ चाके म्हणजे १२ महिने, २४ आऱ्या म्हणजे २४ घटिका, सात घोडे म्हणजे आठवड्याचे दिवस हे कालचक्र प्रतीकात्मक रीतीने दाखवले आहे. घोड्याच्या प्रचंड आकाराच्या सात शिल्पांपैकी फक्त एक – दोनच शिल्लक आहेत.



कोरीव दगडी चाक

### जगमोहन (सभामंडप) :

आज शिल्लक असलेला जगमोहन चौरस घनाकृती असून त्याची प्रत्येक बाजू ३० मीटर लांब आहे व उंचीही ३० मीटर आहे. शिखराचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्याची उंची दुप्पट म्हणजे ६० मीटर झाली असती.

याच्या पायाच्या चबुतऱ्यावरील खालच्या पट्टीत कोरलेल्या शिल्पांत हत्तींच्या व जंगली प्राण्यांच्या शिकारीची दृश्ये कोरली आहेत. त्यावरील दोन आडव्या पट्ट्यात स्तंभयुक्त कोनाड्यांची मालिका आहे. त्यात काही शिल्पे कोरलेली आहेत.

### शिखर

याचे शिखर भद्र पद्धतीचे आहे. शिखराचा आकार अनेक मजले असलेल्या पिरॅमिडसारखा दिसतो. शिखरावर तीन मजले दिसतात. यावर कमळासारखा प्रचंड दगडी आमलक आहे. प्रत्येक मजल्यावर कमी होते जाणाऱ्या आडव्या पाच – सहा थरांनी आकर्षकता आणली आहे.

### कोणार्क मंदिरातील शिल्पे


या मंदिरातील शिल्पात अप्सरा, देवदेवता व विविध प्राणी यांच्याबरोबर स्वैरकल्पनेने निर्माण केलेल्या कल्पित, मिश्र स्वरूपाच्या प्राण्यांची शिल्पेही आहेत. हत्ती व सिंह यांच्या आकाराचे एकत्र मिश्रण केलेली गजसिंहाची शिल्पेही आहेत.

याशिवाय सूर्यदेवतेच्या उत्थित शिल्पातील अनेक मूर्ती आहेत व त्या हिरव्या रंगाच्या क्लोराइट दगडात कोरलेल्या आहेत. मंदिरातील मुख्य मूर्तीत सूर्य समअंग अवस्थेत (ताठ संमुख स्थितीत) उभा दाखवला आहे. याच्या रथावर दोन्ही बाजूस सारथ्याच्या आकृती आहेत व पायाजवळ गुडघे टेकलेल्या दोन स्त्रिया दाखवल्या आहेत. सारथ्यांच्या मागे लहान स्तूपिका आहेत. गुप्त काळातील महान परंपरेला अनुसरून या मूर्ती निर्माण केल्या आहेत.

### कंदारिया महादेव मंदिर – खजुराहो :



कंदारिया महादेव मंदिर




कंदरिया महादेव मंदिर – अनुविक्षेप

**स्थळ :** मध्यप्रदेश राज्यात छत्तरपूर जिल्ह्यातील खजुराहो

**कालखंड :** इ.स. १०२५ ते इ.स. १०५०

**राजवंश :** चंदेल राजे.

**शैली :** नागरशैली

**माध्यम :** पिवळसर रंगाचा वालुकाश्म

खजुराहोची सर्वच मंदिरे भव्य आणि उत्कृष्ट शिल्पांनी अलंकृत केलेली आहेत. त्या सर्व देवालयांत आकाराच्या व रचनासौंदर्याच्या दृष्टीने सर्वात मोठे आणि अप्रतिम असे एक शिवमंदिर 'कंदरिया महादेव मंदिर' या नावाने प्रसिद्ध आहे. नागरशैलीचा हा जगप्रसिद्ध आविष्कार आहे. वास्तुकला व मूर्तिकला यांच्या जितक्या विविध छटा येथे दिसतात तितक्या अन्यत्र क्वचितच आढळतात. कंदारिया महादेव मंदिर म्हणजे कलाविश्वाचा मुकुटमणीच आहे. इ.स. १००० च्या सुमारास बांधले गेले.

**मंदिराची वैशिष्ट्ये :** ३० मीटर लांब व तितकेच उंच, रुंदी १८ मीटर रुंद आहे. १५ फुट उंचीच्या घडीव दगडी व विस्तृत चौथऱ्यावर ते बांधलेले आहे. या एकाच समान पायावर त्याच्या गर्भगृह, सभामंडप, अर्धसभामंडप इत्यादी विभागांची उभारणी झालेली आहे. नागर शैलीच्या सर्व वास्तुवैशिष्ट्यांनी परिपूर्ण असे हे मंदिर आहे. या मंदिराचा मूळ आकार चौकोनी

असला तरी भिंतीची अनेक ठिकाणी वळणे देण्यात आल्याने मूळ चौकोनी रूप झाकून गेले आहे. या योजनेमुळे कोन – प्रतिकोन निर्माण झालेले आहेत. या मंदिराइतके कोन – प्रतिकोन अन्यत्र कोणत्याच वास्तूत दिसत नाहीत, त्यामुळे छाया प्रकाशाच्या खेळास पोषक वास्तुरचना आहे. सप्तरथ प्रकारचे हे मंदिर असल्याने गर्भगृहाच्या फक्त चार कोपऱ्यांऐवजी २८ कोपरे निर्माण झाले आहेत.

मंदिराच्या भिंतीवर एकावर एक असे मूर्तींचे तीन पट्टे दिसतात. या शिल्पपट्ट्यात बहुसंख्य उभ्या मानवाकृती कोरल्या आहेत. अनेक देवदेवता, सुरसुंदरी, अप्सरा, नागकन्या या प्रमाणबद्ध व सौष्ठवपूर्ण आहेत, तसेच मांडणी योग्य अंतर ठेवून केली आहे.

## शिखर रचना :

या मंदिरातही गर्भगृह, अंतराल, महामंडप व अर्धमंडप असे भाग आहेत व त्या प्रत्येक भागावर वेगवेगळी शिखरेही आहेत. परंतु ते भाग निरनिराळे न भासता, सर्वांची मिळून एकात्म रचना साधली आहे. प्रत्येक कोनावर स्वतंत्र शिखरे अशा उपशृंगांची संख्या येथे ८४ इतकी आहे. सर्व वास्तूच्या उपअंगांवर असलेली शिखरे अर्धमंडपापासून उंच उंच होत असून गाभाऱ्यावरील शिखर सर्वात उंच आहे. या ठिकाणी उंच ह्या तत्त्वाला महत्त्व दिलेले आहे.

## मंदिर रचना :

मंदिराचे सर्व भाग एकाच समान चौथऱ्यावर बांधले आहेत. चौथऱ्याच्या मध्यभागी मोठे मंदिर व चौथऱ्याच्या चार कोपऱ्यांवर चार लहान मंदिरे अशी या मंदिराची पंचायतन पद्धतीची रचना आहे. चार उपमंदिरे आज नष्ट झाली आहे. या मंदिराच्या समोर १० ते १२ फुट उंचीचा नंदी आहे. हे मंदिर आतून व बाहेरून सुंदर शिल्पाकृतींनी सजवले आहे. गर्भगृहात भव्य शिवलिंग असून उजव्या व डाव्या बाजूस ब्रह्मा व विष्णूच्या मूर्ती आहेत.

## मंदिरावरील शिल्पकला :

आंतरभागातील व बहिरंगावरील शिल्पकामाबरोबर प्रवेशद्वारावरील तोरणेही उल्लेखनीय आहेत. देवदेवता, अप्सरा, गंधर्व, प्राणी, लतावेली या विषयांवरील शिल्पे कोरलेली आहेत. शिल्पकाराने मानवी शरीराच्या सौंदर्याचे विविध पैलू साकार केले आहेत. मुख्यमंडपाच्या छतावर अष्टवर्तुळ असून प्रत्येक वर्तुळामध्ये नाजूक लोलकासारखा आकार कोरलेला आहे. मुख्य स्तंभ तसेच इतर स्तंभांवरील तुळया, मंदिराचा अंतर्बाह्य भाग मूर्ती सौंदर्याने नटलेला आहे. या मूर्तींमध्ये पायात रुतलेला काटा काढणारी सुंदरी, दर्पणात पाहून कुंकुमतिलक लावणारी अप्सरा, पत्र लिहणाऱ्या, बाळाला खेळवणाऱ्या, वळलेल्या, वाकलेल्या, एक पाय वर उचलून धरलेल्या, एका हात वर केलेल्या अशा अनेक अवस्थांतील मूर्ती कोरलेल्या आहेत.

कलाइतिहासाच्या दृष्टीने सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे येथील सर्वच मूर्ती उभट आहेत. उंच शरीराला स्वाभाविक एक सौंदर्य लाभले. येथे एकही बैठी मूर्ती नाही. दोन पायांवर उभे असलेले व्याल प्राणीही कोरले आहेत.

वास्तू व मूर्ती या दोन्हींची सूत्रबद्धता अन्यत्र क्वचितच पाहावयास मिळते.

## जैन मंदिरे – माऊंट आबू :

राजस्थानमध्ये आबूच्या पहाडावरील जैन मंदिरांत गुजरात शैलीचा पूर्ण विकास झालेला दिसतो. आबूपासून जवळच असलेल्या दिलवाडा या गावात पाच मंदिरांचा समूह आहे. ही सर्व मंदिरे पांढऱ्या संगमरवरामध्ये बांधलेली आहेत. १) चौमुखीजी २) महावीर ३)शांतीनाथ ४) विमलवसही ५) लुणवसही किंवा नेमिनाथ अशी पाच मंदिरे आहेत. ही मंदिरे अतिशय नाजूक कोरीवकाम व अप्रतिम अलंकृत शिल्पे यांसाठी वास्तुकलेतील आश्चर्य मानली जातात.

भारतातील इतर मंदिरांपेक्षा या मंदिरांची रचना वेगळी आहे. ती पर्वतावर बांधलेली आहेत. मंदिराभोवती

उंच भिंतींची तटबंदी असल्यामुळे ती सुरक्षित व सुस्थितीत राहिलेली आहेत. स्तंभ, कमानी, घुमटाचे छत व मंदिरांचे कानेकोपरे हे अत्यंत बारीक अलंकृत नक्षीकाम व कोरीव शिल्पे यांनी भरलेले आहेत. संगमरवरातील हा कलाविष्कार मनाला प्रसन्न करतो.

आबूच्या मंदिरांमध्ये विमलवसही मंदिर व लूणवसही मंदिर प्रसिद्ध आहे.

### विमलवसही मंदिर



विमलवसही मंदिर

**स्थळ :** आबूचा पहाड (राजस्थान)

**कालखंड :** इ.स. १०३१ ते इ.स. १०८०

**राजवंश :** राजा भिमदेव यांचा मंत्री विमलशोह याने बांधकाम केले.

**माध्यम :** पांढरा संगमरवर

**वैशिष्ट्ये :** या मंदिराला 'आदिनाथ मंदिर' असेही म्हटले जाते, कारण या मंदिरामध्ये जैन धर्माचे पहिले तीर्थंकर आदिनाथ (ऋषभनाथ) यांची मूर्ती आहे. ती मूर्ती अतिशय सुंदर व हिऱ्या माणकांनी सजवलेली आहे.


मंदिर बाहेरून अगदी साधे असले तरी आतील स्तंभ, तोरणे आणि वरील अलौकिक नक्षीकाम प्रेक्षकाला थक्क करून सोडणारे आहे. या मंदिर उभारणीस त्याकाळी १८ ते १९ कोटी रुपये खर्च



विमलवसही मंदिर (अंतर रचना)

झाल्याचे सांगितले जाते. या मंदिराचे आवार १२८ फुट लांब व ७५ फुट रुंद आहे. यात १२१ अलंकृत खांब आहेत. सभामंडपाच्या मध्यभागी अष्टकोनी स्तंभांच्या माथ्यावर भव्य घुमट आहे व त्यातील समकेंद्री वर्तुळाकारांमधील कोरीव काम अप्रतिम आहे. त्यामध्ये १६ तीरशील्पे आहेत. त्याशिवाय प्रत्येक वर्तुळात गायक, नर्तक, नर्तिका, देवता, हत्ती व घोडेस्वार यांसारखी शिल्पे कोरलेली आहेत. भिंतीवर तीर्थंकरांच्या जीवनातील प्रसंग व पौराणिक प्रसंग कोरले आहेत. मंदिरातील तोरणे विशेष सुंदर आहेत. मंदिराच्या प्रांगणात प्रवेश करताच प्रथम गजशाळा आहे. तिच्यामध्ये दहा संगमरवरी हत्ती कोरले असून दारातच विमलशाहचा अश्वारूढ पुतळा आहे.

### लूणवसही मंदिर



लूणवसही मंदिर

**स्थळ :** आबूचा पहाड (राजस्थान)

**कालखंड :** इ.स. १२३०

**राजवंश :** राजा वीरधवल व त्याचे वस्तुपाल व तेजपाल हे मंत्री यांनी बांधले

**माध्यम :** पांढरा संगमवर

मंत्री तेजपाल याचा मुलगा लूणवसिंह हा लहानपणीच मरण पावला. त्याच्या स्मरणार्थ हे मंदिर बांधण्यात आले. या मंदिराच्या गर्भगृहात २२ वे तीर्थंकर नेमिनाथ यांची काळ्या पाषाणातील रत्नजडित मूर्ती आहे. येथील स्तंभ अधिक भव्य असून या मंदिरांचे कोरीवकाम अत्यंत सुंदर व प्रगत स्वरूपाचे आहे.


सभामंडपाच्या घुमटाकार छतावर विपुल नक्षीकाम कोरले आहे. तसेच याच्या मध्यभागी कोरलेला लोलक फारच कलापूर्ण आहे. या नाजूक कोरीव कामामुळे दगडाची घनता व कठिणपणा मुळीच जाणवत नाही. या मंदिराच्या गजशाळेत दहा संगमरवरी हत्ती आहेत. त्याच्यामागे भिंतीजवळ वस्तुपाल, तेजपाल व त्यांच्या स्त्रिया, नातेवाईक यांच्या मूर्ती आहेत.

## द्राविड शैली

कृष्णा नदीपासून कन्याकुमारीपर्यंतच्या भौगोलिक प्रदेशातील मंदिर रचनेच्या विशिष्ट शैलीला ‘द्राविड शैली’ असे म्हणतात. या मंदिरात हिंदू मंदिराचे विमान, गर्भगृह, अंतराल आणि मंडप हे भाग असतातच. तथापि नागर शैलीहून या शैलीचा वेगळेपणा त्याच्या विमानात आहे. मंदिराचे विमान चौरस पायावर उभारलेले असते व त्याचे शिखर उंच सूचीच्या आकाराचे असते.

**गर्भगृह :** चौरस आकाराचे देवालयाचे मुख्य स्थान, जेथे मुख्य देवतेची मूर्ती असते.

**विमान :** गर्भगृह व त्यावरील शिखर या एकूण रचनेला ‘विमान’ म्हणतात.



विमान

**अंतराळ :** गर्भगृह व सभामंडप याना जोडणारा भागास ‘अंतराळ’ म्हणतात.

**भूमी :** कमी होत जाणाऱ्या आकाराचे मजले एकावर एक बांधून केलेली शिखरांची रचना असते. या मजल्यांना ‘भूमी’ म्हणतात.

**हार :** प्रत्येक भूमीवर चारी बाजूस लहान लहान मंदिराकृतींच्या रांगा असतात व त्यांना ‘हार’ म्हणतात.

**कूट :** प्रत्येक भूमीच्या कोपऱ्यांवर विमानाची लहान आकाराची प्रतिकृती असते, तिला ‘कूट’ म्हणतात.



कूट

**शाला :** भूमीवरील लहान मंदिराकृतींना 'शाला' म्हणतात. त्यांचा पाया आयताकृती असतो व छप्पर अर्ध दंडगोलाकार (बॅरेल व्हॉल्ट) असते.




शाला

**ग्रीवा :** निमुळत्या होत गेलेल्या शिखरावरील शेवटच्या भूमीच्या वरील बाजूस थोडा आत गेलेला भाग.

**स्तूपिका :** ग्रीवेच्या वरचा घुमटासारखा गोल किंवा अष्टकोनी आकाराचा भाग. नागर शैलीतील आमलक व कलश याऐवजी द्राविड शैलीत स्तूपिका असते. हे द्राविड शैलीचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**प्राकार :** मंदिरातील अंगण, अंगणात कुंड, इतर देवांची छोटी मंदिरे या सर्वांना संरक्षणात्मक तट अथवा भिंती बांधल्या जात, त्यास 'प्राकार' असे म्हणतात.

**गोपूर :** दक्षिण भारतीय वास्तूचा दुसरा विशेष प्रकार म्हणजे 'गोपूर' होय. हे मंदिराचे प्रवेशद्वार होय. त्याचा अनुविक्षेप आयताकृती असतो. या गोपूराच्या तळमजल्याच्या मध्यातून आत प्रवेश करण्याचा मार्ग असतो.



गोपूर

दक्षिण भारतीय स्थापत्याचा विकास कित्येक शतके होत होता व तो सामान्यतः खालील पाच कालखंडात विभागण्यात येतो. ही कला मुख्यतः राजाश्रयानेच विकास पावली, म्हणून हे कालखंडही निरनिराळ्या राजवंशाच्या काळानुसार आहेत. ते सर्वसाधारण पुढीलप्रमाणे आहेत; पल्लव वंश, चोल वंश, पांड्य किंवा उत्तर चोल वंश, विजयनगर साम्राज्य, मदुरा नायक वंश.

कांचीचे कैलासनाथ मंदिर, तंजावरचे बृहदीश्वर मंदिर, मदुराईचे मीनाक्षी मंदिर ही द्राविड शैलीतील सुप्रसिद्ध मंदिरांची उदाहरणे आहेत.

### कैलास मंदिर – वेरूळ :



कैलास मंदिर

**स्थळ :** वेरूळ, औरंगाबादजवळ (महाराष्ट्र)

**कालखंड :** इ.स.७५७ ते ७८३ राष्ट्रकूट वंश पहिला राजा कृष्ण

**राजवंश :** राष्ट्रकूट

**माध्यम :** अखंड पाषाण

**वैशिष्ट्ये :** वेरूळचे कैलास मंदिर हे द्राविड वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हे भव्य मंदिर बांधीव स्वरूपाचे देवालय नव्हे, डोंगरातील एकच खडक बाहेरून व आतून कोरून त्याची निर्मिती केली आहे. द्राविड वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. आधी कळस मग पाया असे कोरलेले जगातील एकमेव मंदिर आहे. सुमारे १६४ फुट लांबी व १०९ फुट रुंदी असणारे हे मंदिर सुमारे २० ते २५ फुट उंच चौथऱ्यावर आहे. हे शैवमंदिर असून गर्भगृहात एक भव्य शिवलिंग आहे, शिवाचे निवासस्थान असलेल्या कैलास पर्वताची ही प्रतिकृती निर्माण करण्याचा हेतू त्याच्या नावावरून स्पष्ट होतो.


एका बाजूने दिसणाऱ्या या मंदिराच्या शिखरांचे एकूण दृश्य थोडे बहुत हिमालयातील कैलास पर्वतासारखे दिसते, असे सांगितले जाते.

मुख्य मंदिरांची तळापासून सुमारे ९६ फुट उंची आहे. नंदीमंडपाच्या दोन्ही बाजूस सुमारे ५० फुट उंचीचे ध्वजस्तंभ व एक-एक हत्तीचे भव्य शिल्प आहे. समोर मोकळे प्रांगण व त्याभोवती नैसर्गिक भिंत आहे. दर्शनी भिंतीत अनेक देवदेवतांची शिल्पे कोरलेली आहेत. गर्भगृहावर द्राविड पद्धतीचे तीन मजली शिखर आहे. गर्भगृहापुढे अंतराळ व त्यापुढे सभामंडप आहे. गोपुर, नंदीमंडप, मुख्य मंदिर या वास्तू दुमजली आहेत. गाभाऱ्याभोवती प्रदक्षिणामार्ग व पाच उपमंदिरे आहेत. एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी पूल आहेत. या सर्वावर आतून व बाहेरून शिल्पे कोरलेली आहेत.

**शिल्पकला :** मंदिराच्या सर्व भागांच्या बाहेरील बाजूंना शिल्पाकृती कोरलेल्या आहेत. चौथाऱ्यावर सिंह व हत्ती यांच्या शिल्पांची रांग असून त्यांनी आपल्या पाठीवर हे संपूर्ण मंदिर तोलून धरले आहे असे वाटते. मुख्य मंदिरावर व सभोवती शिल्पे आढळतात. ती शिवमहात्म्य दर्शवणाऱ्या कथांची व रामायण-महाभारत प्रसंगांवर आधारित आहेत. सर्व उत्थित शिल्पे प्रचंड आहेत. 'रावण कैलास पर्वत हलवतो' हे अत्यंत सुंदर व नाट्यमय शिल्प आहे. मध्यभागी कैलास पर्वत आहे. त्यावर शिवपार्वती बसलेले आहेत. सर्व पर्वत हलल्यामुळे भ्यालेली पार्वती शंकराचा बाहू पकडून व पाय एका बाजूस मुडपून बसली आहे. अत्यंत भयभीत झालेली एक सेविका मागील अंधकारमय भागात पळत सुटलेली आहे असे दिसते. खालील गुहेत रावण अडकला आहे. शक्तिमान शिव एक पाय जमिनीवर सोडून शांतपणे आसनावर बसलेले आहेत. रावण आपल्या वीस हातांनी पर्वत उचलण्याचा प्रयत्न करीत आहे. शंकराच्या दाबलेल्या पायाच्या अंगठ्यामुळे रावण स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करीत आहे, असे दृष्य कोरलेले आहे. या शिल्पात अवकाश विभाजन, रचना व छाया-प्रकाश यांचा सुंदर मेळ दिसून येतो.

या शिवाय सरिता मंदिर, गंगावतरण, त्रिपुरांतक शिव, रावण-जटायु युद्ध, शिव पार्वती विवाह, गरुडवाहन विष्णु, अर्धनारी नटेश्वर, महिषासुरमर्दिनी ही शिल्पे विशेष प्रसिद्ध आहेत. या मंदिराच्या काही गुहातील भिंतीवर व छतांवर अजंठा शैलीतील चित्राप्रमाणेच चित्रे रंगवली होती. काही गुहांतून भित्तिचित्रांचे थोडे अवशेषही आढळतात.

### मीनाक्षी मंदिर - मदुराई :



मीनाक्षी मंदिर

**स्थळ :** मदुराई (तामिळनाडू)

**कालखंड :** १७ वे शतक

**राजवंश :** नायक वंश

**माध्यम :** पाषाण.

**वैशिष्ट्ये :** मदुरा हे नायक वंशाचे राजधानीचे शहर होते. यांच्या काळात निर्माण झालेल्या मंदिरात मदुराई येथील मीनाक्षी मंदिर विशेष प्रसिद्ध आहे. या मंदिराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विस्तृत प्राकार होय. द्राविड मंदिराचे सर्व वास्तुविशेष येथे आढळतात. दक्षिणेकडील गोपुर तिरुमल नायक याने बांधलेले आहे. मदुराईची देवता मीनाक्षी असून तिचे हे भव्य मंदिर आहे. या मंदिराने १४ एकर जागा व्यापलेली आहे. चारही दिशांना उंच तट असून तटाची उंची २५ फुट आहे. चारही दिशांना दरवाजे आहेत. तटावर २७ लहानमोठी गोपुरे आहेत. सर्वात उंच गोपूर दक्षिणेला आहे. पश्चिमेकडील गोपुरे सर्वात सुंदर आहेत. 'सहस्त्रमंडपा' या नावाने प्रसिद्ध असलेल्या मंडपाला ८२५ स्तंभ आहे. पुदुमंडपातील कलाकुसर अप्रतिम आहे. यात नटराजाची मूर्ती व स्वरस्तंभही आहे त्यावर नाद केल्यास सात स्वर ऐकू येतात. सर्व सभामंडपात हा मंडप तिरुमल नायकाने बांधला. देवदेवतांच्या, घोडेस्वारांच्या ८ ते १० फुट उंचीच्या अनेक मूर्ती, संतांच्या, आचार्यांच्या सुबक मूर्ती कोरलेल्या आहेत.

या मंदिराला मंदिर-नगरी म्हणावे लागेल. अनेक सभामंडप, स्तंभयुक्त ओवऱ्या, स्नानासाठी तलाव, पूजेअर्चेसाठी लागणारे साहित्यांची दुकाने यामुळे आत एक नगरी वसल्यासारखे जाणवते.

या मंदिराची गोपुरे विशेष लक्षणीय आहेत. आयताकृती पायांवर उभारलेल्या या गोपुरांच्या बाजू किंचित अंतर्वक्र असून वर अर्धदंड गोलाकृती गजपृष्ठाकार आहेत. पायापासून वरपर्यंत असंख्य देवतामूर्तींनी ती अलंकृत केलेली आहेत. मूर्ती स्टक्को प्लॅस्टरच्या बनवलेल्या आहेत व त्या भडक रंगात रंगवलेल्या आहेत.

मूर्ती विज्ञानाच्या दृष्टीने त्या महत्वपूर्ण असल्या तरी कलात्मकतेच्या दृष्टीने त्या सरस नाहीत. या मंदिरातील सर्वच गोष्टी अवाढव्य आढळतात. त्यातील स्तंभांची एकूण संख्या दोन हजारापेक्षा अधिक आहे. येथील स्तंभयुक्त ओवऱ्या असलेले तलाव हा एक नावीन्यपूर्ण घटक आहे.

### बृहदेश्वर मंदिर (राजराजेश्वर मंदिर) – तंजावर :



बृहदेश्वर मंदिर (राजराजेश्वर मंदिर)

**स्थळ :** तंजावर

**कालखंड :** इ.स. ९८५-१०१८

**राजवंश :** चोल सम्राट राजराज

**शैली :** द्राविड शैली

**माध्यम :** पाषाण

**वैशिष्ट्ये :** सुप्रसिद्ध चोल सम्राट राजराज हा शिवभक्त होता व त्याने हे मंदिर इ.स. १०० च्या सुमारास बांधले. राजराज या सम्राटाच्या नावावरून राजराजेश्वर मंदिर असेही नाव या मंदिरास पडले.

या मंदिराची उंची ५४ मीटर (१०८ फुट) व त्याच्या उत्तुंग शिखरासह एकूण उंची ५७ मीटर (१९० फुट) आहे. या मंदिराचे गर्भगृह चौरस आकाराचे व ५० फुट

उंचीचे असून त्यावर मुख्य शिखराची उभारणी केली आहे. द्राविड पद्धतीच्या या शिखराला १३ भूमी आहेत ते वर निमुळते होत गेले आहे. शिखराच्या स्तुपिकेच्या खालील भाग पायाच्या रुंदीच्या फक्त एकतृतियांश एवढाच आहे. एकूण शिखराची रचना अत्यंत प्रमाणबद्ध आहे.

स्तूपिका एकाच प्रचंड दगडात घडवलेली असून तिचे वजन ८० टन आहे. ही प्रचंड स्तूपिका जवळजवळ २०० फुट उंचीवर बसवण्यासाठी त्या काळी यांत्रिक साधने उपलब्ध नव्हती. इजिप्तमधील पिरॅमिड बांधताना ज्या भरीव पद्धतीचा उपयोग केला गेला होता, त्याच पद्धतीने तेवढ्या उंचीपर्यंत मातीचा उतरता ४ मैल लांबीचा भराव निर्माण करण्यात आला. त्या भरावावरून स्तुपिका ओढून आणून योग्य जागी बसवण्यात आली व नंतर भराव काढून टाकण्यात आला.

या मंदिराच्या भव्य प्रमाणापेक्षाही त्याचा कलात्मक परिणाम अधिक महत्त्वाचा आहे. एवढेच त्याचे वैशिष्ट्ये नसून त्याची रचनाही अत्यंत सुंदर व प्रमाणबद्ध आहे.

घुमटाकार स्तुपिकेच्या चारही बाजूस चैत्य आकारच्या कमानी, त्यावर नागांची नक्षी आणि कीर्तीमुख आहेत. कीर्तीमुखाच्या आकृती शिखरावर व पायावर अनेक ठिकाणी पुनरावृत्त झालेल्या आहेत. त्याच्या तेराही मजल्यांवर वरील स्तुपिकेचा आकार लहान प्रमाणात पुनः पुनः उपयोजिलेला दिसतो.

पायाच्या चबुतऱ्यावरील दोन आडव्या पट्ट्यात कोनाड्यांमध्ये देवदेवतांच्या सर्वतोरचित मूर्ती बसवलेल्या आहेत. या दोन पट्ट्यांच्या खाली सिहांची तोंडे अपूर्ण अवस्थेत कोरलेली आहेत. त्या खाली एका रुंद पट्टीत राजराजाचा शिलालेख कोरलेला आहे. हे मंदिर द्राविड शैलीच्या हिंदू मंदिराचे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण मानले जाते.

### वासर (वेसर) शैली

नागर आणि द्राविड परंपरांचा संगम असलेली वासर प्रकारची मंदिरे कर्नाटक राज्यात हळेबीड, बेलूर, सोमानाथपूर या ठिकाणी आहेत. होयसाळ राजवंशांच्या आमदानीत बरीच मंदिरे बांधण्यात आली. उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील मंदिरशैलींची काही वैशिष्ट्ये त्यांत आढळतात. शिवाय त्यांच्या स्थापत्यविषयक काही वैशिष्ट्यांमुळे ती इतर भारतीय मंदिरांपेक्षा वेगळी भासतात.

या शैलीचा विकास नागर व द्राविड या दोन शैलींच्या पूर्ण विकासानंतर त्यांच्या मिश्रणातून झाला आहे, म्हणून या पद्धतीला शिल्पशास्त्रात 'मिश्रक' असेही दुसरे नाव आढळते.

#### वासर शैलीची वैशिष्ट्ये

- या शैलीत विमान व मंडप असे दोनच प्रमुख भाग असतात.
- विमानाचे शिखर चौरस असून क्रमाने निमुळते होत जाणाऱ्या एकावर एक मजल्यांनी चढत गेलेले असते. त्यावर शेवटी गजपृष्ठाकार किंवा कळस असतो. मंडप अनेक स्तंभांवर आधारलेला असून त्यावर सपाट छप्पर असते.
- प्रारंभीच्या काळात या शैलीच्या वर्तुळाकृती व लंबवर्तुळाकृती देवालयांची निर्मिती झाली.
- अनेक मंदिरात मंडपाच्या पुढे दुसरा एक मोकळा मंडप असतो.
- प्रदक्षिणामार्गाच्या भिंतीत आतल्या अंगाने ओवऱ्या नसतात.
- मंडपाची लांबी-रुंदी गाभाऱ्याच्या लांबी-रुंदीपेक्षा मोठी असते.

  भिंतीची रचना नागर शैलीप्रमाणे रथाकार करून द्राविड शैलीप्रमाणे त्यात अधूनमधून स्तंभ उभारलेले असतात.

- मध्यभागी मंडप व त्याला लागून दोन किंवा अधिक मंदिरे किंवा गर्भगृहे बांधणे हे वासर (वेसर) शैलींचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.
- वासर (वेसर) शैलीचा एक महत्वाचा विशेष म्हणजे त्या मंदिरांची रचना बहुकोनाकृती अर्थात ताराकृती जोत्यावर केलेली असते. अशा प्रकारची ताराकृती मंदिरे होयसाळांच्या राजवटीत उभारली गेली.

### केशव मंदिर–सोमनाथपूर :



केशव मंदिर

**कालखंड :** इ.स.१२६८

**शैली :** वासर

**राजवंश :** होयसाळ

**स्थळ :** सोमनाथपूर

**माध्यम :** पाषाण

**वैशिष्ट्ये :** सोमनाथपूर हे क्षेत्रस्थान म्हैसूरपासून ३८ कि.मी अंतरावर असून तेथे होयसाळ शैलीचे एक केशव मंदिर आहे. वासर पद्धतीत बांधलेले हे मंदिर हळेबीडच्या होयसाळेश्वर मंदिरापेक्षा लहान असले तरी होयसाळ शैलीचे सर्वात सुंदर व सर्वांगपरिपूर्ण बांधणीचे उदाहरण म्हणून शिल्पशास्त्रज्ञांनी गौरवले आहे. या मंदिराचे बांधकाम होयसाळचा सेनापती सोमनाथ यांनी केले.

या मंदिराचा आकार सप्तकोनी ताऱ्यासारखा असून त्यात एकूण तीन गर्भगृहे आहेत. त्यांना मधोमध जोडणारा व मोठे स्तंभ असलेला एक भव्य सभामंडप आहे. संपूर्ण मंदिर मध्यम उंचीच्या एका विशाल चौथऱ्यावर उभे आहे. त्या तीन गर्भगृहात विष्णूच्या भिन्न रूपातील तीन मूर्ती आहेत.

मंदिराभोवती प्रांगणात ६४ लहान मंदिरे आहेत. मंदिराच्या पूर्वेला एक सुंदर प्रवेशमार्ग आहे. या मंदिराचा चबुतरा उंच असून दगडी बारीक जाळीदार पडद्याचे काम असलेल्या खिडक्या, घासून अगदी गुळगुळीत केलेले स्तंभ आणि या सर्वांवरील कुशलपणे केलेले कोरीव अलंकरण ही या मंदिराची वैशिष्ट्ये आहेत.

उत्तरेतील मंदिरात आढळणारी, मुख्य शिखरापर्यंत क्रमाक्रमाने उंच होत जाणारी शिखरे येथे दिसत नाहीत. येथील शिखरांवरील गच्चीसारख्या आडव्या जाणाऱ्या भागामुळे सर्व शिखरांत आडव्या रेषांना प्राधान्य आले आहे. ही शिखरे म्हणजे उत्तरेतील व दक्षिणेतील शिखरांच्यामधील स्थिती आहे.

### होयसाळेश्वर मंदिर – हळेबीड :



होयसाळेश्वर मंदिर

**कालखंड :** इ.स. ११२१

**शैली :** वासर

**राजवंश :** होयसाळ

**स्थळ :** हळेबीड

**माध्यम :** क्लोराइट शिस्ट दगड

**वैशिष्ट्ये :** होयसाळेश्वर मंदिर हे चालुक्य – होयसाळ शिल्पशैलीचे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण मानले जाते.

या मंदिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे अक्षरशः वरच्या टोकापासून खालपर्यंत कोरलेले तेथील अलंकारिक शिल्प होय. या मंदिराचे बांधकाम क्लोराइट शिस्ट दगडात केलेले आहे. वालुकाश्म किंवा काळा फत्तर यापेक्षा हा दगड सूक्ष्म कोरीव कामाला अतिशय उपयुक्त असल्याने वापरला गेला. खाणीतून काढताना तो मऊ असतो, पण नंतर हवा लागून तो काही काळाने अतिशय कठीण बनतो. त्यामुळे या दगडाच्या वैशिष्ट्यामुळे कोरीव कामाची इतकी भरमार आहे की, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

महाकाव्यातील कथांचे चित्रण व देवादिकांच्या मूर्ती हे या कोरीव शिल्पांचे विषय आहेत त्यांतील आकृतींची घडण मात्र शास्त्रात दिलेल्या लक्षणांनुसार केलेली आहे.

या मंदिरातील पायाच्या चबुतऱ्यावरील शिल्पनिर्मिती एका ठरावीक संकेतानुसार केलेली दिसते, सर्वात खालच्या शिल्पपट्टीत असंख्य हत्ती एकामागून एक ओळीने चाललेले दाखवले आहेत. त्यावरील पट्टीत विविध अवस्थांमधील सिंहाच्या आकृती आहेत व त्या पराक्रमाच्या द्योतक आहेत. त्यांच्यावर वेग दर्शवणाऱ्या घोडेस्वारांच्या कोरलेल्या रांगा आहेत. मूळात चंदनाच्या लाकडावर किंवा हस्तिदंतावर कोरलेल्या नाजूक व लहान शिल्पांच्या फार मोठ्या प्रमाणावर केलेल्या या प्रतिकृतीच आहेत. या कोरीव कामातील कौशल्य अजोड आहे. हे तर खरेच, पण हेही लक्षात ठेवले पाहिजे की अतिरेकी अलंकारिकता कलेची उतरती कला सूचित करते. परंतु आत्यंतिक कोरीव काम मंदिराच्या एकूण रचनात्मक रूपाला कोणत्याही प्रकारे बाधा आणत नाही हे मान्य करावयास हवे.

या मंदिराला एक विस्तृत संपूर्ण दगडी चौथरा असून त्याचा आकार तारकाकृती आहे. एकाच मंदिरात दोन गर्भगृहे हे याचे वैशिष्ट्य होय, म्हणजेच हे जुळे देऊळ आहे. एका गाभाऱ्यात होयसाळेश्वर तर दुसऱ्या गाभाऱ्यात शांतलेश्वर विराजमान आहेत. दोन्ही शिवलिंगेच आहेत. मंदिराला चार प्रवेशद्वारे आहेत. येथील द्वारपालांच्या मूर्ती फारच प्रेक्षणीय आहेत. त्यांचे कोरीव काम सूक्ष्म व नाजूक असून ते चतुर्भुज दर्शवले आहेत. दोन्ही मंदिराच्या समोरील मंडपात एकेक भव्य नंदी आहे. त्यापैकी एकाची उंची ८ फुट, तर दुसऱ्याची सुमारे १२ फुट आहे. मंदिराचा संपूर्ण बाह्य भाग लहान मोठ्या सुबक मूर्तींनी भरलेला आहे. मंदिराच्या चौथऱ्यावर मेखल्यासारख्या पट्ट्या आहेत. त्यांच्या अलंकरणातही एक प्रकारची अर्थपूर्ण सुव्यवस्था दिसते.

### प्रसिद्ध शिल्प

उमामहेश्वर, श्रीकृष्ण, अर्जुनाचा मत्स्यवेध, वीणाधारी सरस्वती, ऐरावतावरील इंद्र आणि इंद्राणी, गजचर्मावर नृत्य करणारा शिव इत्यादी शिल्पे विलक्षण प्रभावी आहेत. शिवाय त्यात रामायणातील आणि कृष्णचरित्रातील अनेक प्रसंग प्रभावीपणे शिल्पांकित केलेले आहेत.

### चन्नकेशव मंदिर – बेलूर :



चन्नकेशव मंदिर

**कालखंड :** इ.स.१११६

**राजवंश :** होयसाळ

**शैली :** वासर

**माध्यम :** पाषाण

**वैशिष्ट्ये :** बेलूर हे प्राचीन शहर बेंगलोरपासून १२७ मैलावर व हळेबीडपासून ८-१० मैलावर आहे. काही काळ ही होयसाळांची तात्पुरती राजधानीही होती. इ.स. १११६ च्या सुमारास चोल राजाचा पराभव केला व त्या विजयाचे स्मारक म्हणून त्याने तेथे विजय नारायण किंवा चन्नकेशव मंदिर बांधले. तेथील शिलालेखावरून विष्णुवर्धनाने इ.स.१११७ मध्ये केशव स्वामींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली असे दिसून येते.

हे मंदिर होयसाळ शिल्पशैलीचे एक उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. त्याची लांबी १७८ फुट व उंची १५६ फूट असून ते एका दगडी चबुतऱ्यावर बांधले आहे. या मंदिराचे गर्भगृह तारकाकृती आहे व त्याच्या समोर एक भव्य सभामंडप आहे. त्या मंडपात असंख्य स्तंभ व पाषाणाचे जाळीदार पडदे आहेत. त्यावर व छतावर विपुल नक्षीकाम आहे. मध्यवर्ती चार स्तंभावरील नर्तिकांची शिल्पे विशेष प्रेक्षणीय आहेत.

मंदिराचे छत अष्टकोनी असून त्यावर १० फुट व्यासाचा व ६ फुट उंचीचा घुमट आहे. त्याच्या मध्यभागी हिरण्यकश्यपूला मारणाऱ्या नृसिंहाचे एक भव्य शिल्प कोरलेले आहे. गर्भगृहात ५-६ फुट उंचीची विष्णूची सुरेख मूर्ती आहे व तिच्या दोन्ही बाजूस भूदेवी व श्रीदेवी यांच्या मूर्ती आहेत.

या मंदिरास विमान नाही व भिंती खालपासून वरपर्यंत सरळ आहेत. त्यांवर खूप नक्षीकाम केलेले आहे. याच्या सभामंडपास तीन दरवाजे आहेत. चबुतरा व भिंती यावर नाना प्रकारच्या मूर्ती व आकृत्या कोरलेल्या आहेत. चौथऱ्याच्या तळाशी गजपट्टीवर कीर्तीमुखे, त्यावर वेलबुट्टी आणि नंतर पौराणिक प्रसंग अशी शिल्पांची योजना आहे.

**मदनिका (Bracket Figures) –**

सभामंडपातील ४२ स्तंभांवर छताला लागून किंचित तिरकस अशा सुरेख मूर्ती आहेत; त्यांना 'मदनिका' असे म्हणतात. त्या अगदी सजीव वाटतात. अतिशय कमनीय, आकृतीचे सौंदर्य, कलेचा नजूकपणा व कोरीव कामाची सफाई या दृष्टींनी त्या अप्रतिम आहेत. दर्पणहस्ता, धनुर्धारिणी, नर्तिका, डमरूधारिणी इत्यादी मूर्ती विशेष आकर्षक आहेत. सर्वच मदनिका वेगवेगळ्या उद्योगांत गर्क असलेल्या व भावपूर्ण आहेत.

यांखेरीज रामायण, महाभारत व पुराणे यातील कित्येक प्रसंगावर कोरलेली अतिशय सुंदर शिल्पे जागोजागी दिसतात. नाजूक, रम्य व विपुल नक्षी आणि असंख्य सुंदर मूर्ती यामुळे हे मंदिर विलक्षण आकर्षक झाले आहे. मंदिराच्या प्रांगणात २० लहानमोठी मंदिरे आहेत व सभोवती एक विशाल दगडी प्राकारही आहे.

### हेमाडपंती स्थापत्यशैली

भारतीय स्थापत्यशैलींपैकी एक प्रमुख शैली म्हणून या शैलीचा उल्लेख केला जातो. मध्ययुगीन काळात प्रचलित असलेली ही शैली. या शैलीस 'हेमाडपंती' असे संबोधले जाते. हे नाव यादव काळातील हेमाद्री उर्फ हेमाडपंत हा यादव राजा महादेव याचा श्रीकरणधिप आणि नंतर यादव राजा रामदेवराव यांच्या पदरी मंत्री होते, त्यावरून रूढ झाले आहे. हेमाडपंताने अनेक मंदिरे बांधली आणि मंदिरबांधणीस प्रोत्साहन दिले. हिंदू धर्माच्या प्रचार-प्रसारार्थ त्याने सुमारे तीनशे मंदिर बांधली असावीत.

हेमाडपंती मंदिरांत चुना किंवा तत्सम कुठल्याही प्रकारच्या जोडकामाच्या साहित्याशिवाय केवळ दगडच एकमेकांत अडकवून एकमेकांत घट्ट बसवले जात. दगडांना कोनातून कापून त्यांनाच खुंट्या आणि खाचा पाडून ते एकमेकांत बसू शकतील अशी रचना मंदिराच्या पायापासून ते शिखरापर्यंत एकात एक दगड गुंतवून केली जाई. दगड एकमेकांत गुंतवले गेल्याने त्यांच्यात एकसंघपणा येऊन मंदिरे जास्त टिकाऊ बनतात.

या मंदिरांचा गाभारा व सभामंडपाला अनेक अलंकृत खांब असून खांबावर व छतावर पौराणिक प्रसंगाची चित्रे कोरलेली असतात. या मंदिरांचे शिखर

वैशिष्ट्यपूर्ण असे. शिखराची रचना आणि मंदिराच्या पायाची रचना, आखणी यात फार मोठा समतोल साधलेला असे. मंदिराच्या सर्व कोनांच्या रेषा जमिनीपासून निघून थेट कळसापर्यंत उभ्या जाऊन भिडत.

हेमाडपंती स्थापत्यशैलीची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे;

- घृष्णेश्वर मंदिर – वेरूळ
- नागनाथ मंदिर – औंढा
- शिव मंदिर – अंबरनाथ
- अमृतेश्वर मंदिर – रतनवाडी, अहमदनगर
- गोन्देश्वर मंदिर – (सिन्नर) नाशिक
- महादेव मंदिर – (मुखेड) नांदेड
- महादेव मंदिर – (मानकेश्वर) उस्मानाबाद
- सिद्धेश्वर मंदिर – (होट्टल) नांदेड

**परिसरातील प्राचीन मंदिरांच्या वास्तुशैलीची माहिती मिळवा.**

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

..................................................

### कोपेश्वर मंदिर – खिद्रापूर :



कोपेश्वर मंदिर – खिद्रापूर

**स्थळ :** कोल्हापूर, तालुका-शिरोळ, गाव-खिद्रापूर

**कालखंड :** सातवे शतक

**राजवंश :** चालुक्य राजवट

**शैली :** हेमाडपंती

**माध्यम :** पाषाण

**वैशिष्ट्ये :** हे ठिकाण कृष्णा नदीच्या तीरावर आहे. पूर्ववाहिनी कृष्णा येथून पश्चिमेला वळले म्हणून या ठिकाणाला विशेष महत्त्व आहे. हे मंदिर १०३ फुट लांब ६५ फुट रुंद असून याची कळसापर्यंत उंची ५२ फुट आहे. या देवालयाचे गर्भगृह, अंतराळ, गूढमंडप आणि सभामंडप असे चार भाग आहे. अंतराळ भागात दाराच्या दोन्ही बाजूंना जय-विजय या द्वारपालांच्या भव्य आणि चतुर्भुज मूर्ती भग्नावस्थेत आहे.

देवालयाचे एक प्रवेशद्वार पूर्वाभिमुख तर दुसरे उत्तराभिमुखी आहे. पूर्वेकडील दारावर नगारखाना आहे. मंदिराचा 'स्वर्गमंडप' हा भाग गोलाकार असून मुख्य देवळाला जोडलेला आहे. याचा वरचा भाग मोकळाच आहे. त्यातून निळ्याशार आभाळाचे दर्शन होते. म्हणून याला कदाचित स्वर्गमंडप म्हणत असावेत. होम-हवन करताना निघणारा धूर मंडपात साठून न राहता तो वरच्यावर निघून जावा म्हणूनही कदाचित असे छत केलेले असावे. मंडपाच्या मध्यभागी वर्तुळाकार रंगशिळा आहे. तिच्याभोवती घुमटाकार छताला पेलून धरणारे बारा स्तंभ आहेत. स्तंभाच्या आतील भागात

कार्तिकेय आणि अष्टदिक्पालांच्या त्यांच्या वाहनांसह शिल्पाकृती कोरलेल्या आहेत. या बारा स्तंभाच्या मागे त्याहून कमी रुंदीचे नऊ खांब आहेत. मंदिरात एकूण १०८ स्तंभ आहेत आणि पूर्ण मंदिर ९६ हत्तींच्या पाठीवर तोलले आहे. सभामंडपाच्या दोन्ही बाजूंना गवाक्ष आहेत. प्रवेशमार्गाशी दोन्ही बाजूंना द्वारपालांच्या मूर्ती आहेत. सभामंडपात जाणाऱ्या मार्गावर दरवाजाच्या दोन्ही बाजूंना नक्षीदार दगडी जाळ्या आहेत. मंदिरात ठिकठिकाणी रामायण आणि महाभारतावर आधारित शिल्पे कोरलेली आहेत.

मंदिराच्या बाहेरील बाजूस संपुर्ण प्रदक्षिणा मार्गावर विविध भावनांचे प्रदर्शन करणारी पूर्णाकृती आखीव रेखीव मानवशिल्पे आहेत. मंदिराच्या पायाजवळ हत्तीची शिल्पे आहेत. सभामंडपाच्या दक्षिण दरवाजाबाहेर एक पुरातन शिलालेख आहे. या मंदिरातील सुरसुंदरी शिल्प विशेष प्रसिद्ध आहेत.

आदिलशाही राजवटीत त्याचा एक सरदार खैदर खानानं मंदिराची तोडफोड केली. त्यामुळे या गावाचे नाव खिद्रापूर पडले असावे असे म्हटले जाते. या मंदिराबद्दल एक आख्यायिका सांगितली जाते. दक्षकन्या सतीच्या मृत्यूनंतर भगवान महादेव अतिशय संतापले होते. अशा कोपलेल्या अवस्थेत ते खिद्रापूरला येऊन राहिले. त्यांची समजूत काढण्यासाठी विष्णूने पुढाकार घेतला. कोपलेले महादेव म्हणून या स्थानाचे नाव पडले 'कोपेश्वर'. मंदिराच्या गर्भगृहात दोन शाळुंका आहेत. त्यापैकी एक कोपेश्वर आणि दुसरी थोडी अधीक उंचावर असलेला धोपेश्वर म्हणजे विष्णू. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक महादेवाच्या मंदिरासमोर असतो तसा येथे नंदी नाही.

भारतीय पुरातत्व विभागाने २ जानेवारी १९५४ मध्ये हे राष्ट्रीय संरक्षित स्थान म्हणून घोषित केले.

**शिव मंदिर – अंबरनाथ :**

**स्थळ :** अंबरनाथ

**कालखंड :** ११ वे शतक

**राजवंश :** शिलाहार घराणे



**शिव मंदिर – अंबरनाथ**

**शैली :** हेमाडपंती, भूमीज शैली

**माध्यम :** काळा दगड

**वैशिष्ट्ये :** हे महाराष्ट्रातील भूमीज शैलीचे सर्वात प्राचीन मंदिर आहे. शिलाहार राजघराण्यातील माम्वाणी राजाच्या काळात इ.स. १०६० मध्ये हे मंदिर पूर्ण झाल्याचा उल्लेख मंदिरावरील शिलालेखावर आढळतो. सांस्कृतिक वारसा म्हणून जगातील ज्या २१८ कलासंपन्न वास्तू युनेस्कोने जाहीर केल्या, त्यामध्ये महाराष्ट्रातील या मंदिराचा समावेश आहे.

उत्तर कोकणावर राज्य करणाऱ्या शिलाहार घराण्यातील छित्तराजाने १०२२ ते ३५ या काळात हे शिवालय उभारण्यास प्रारंभ केला. इ.स.१०६०–६१ मध्ये छित्तराजाच्या धाकट्या भावाच्या माम्वाणी (मांबाणी) राजाच्या काळात या मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले.

हे मंदिर शिल्पजडित आहे. अंतराल, सभामंडप व मंडपातील स्तंभ यांवर विविध देवदेवतांची शिल्पे साकारली आहे. मंदिराभोवतालची भिंत आणि समोरचा नंदीमंडप कालौघात नष्ट झाले असले तरी मूळ मंदिर मात्र अजून शाबूत आहे. सध्या असलेले मंदिर दोनच भागात आहे. गर्भगृह आणि सभामंडप. गर्भगृह हे सभामंडपापेक्षा थोडे खोलगट जागी आहे. गाभाऱ्याच्या दरवाज्यावर गणेशपट्टी आहे. या गणेशपट्टीच्या वरच्या भागात शिव, सिंह, हत्ती यांच्या सुरेख आकृत्या कोरलेल्या आहेत. सभामंडप सर्व बाजूंनी बंद आहे. मंडपाच्या मध्यभागी चार खांबांवर आधारलेले एक

घुमटाकृती छत आहे. या घुमटाच्या मध्यभागी झुंबर आहे. या घुमटाची रचना पाण्यात दगड फेकला की वलये उठावीत अशी एकामागोमाग एक अशी असंख्य वर्तुळे कोरली आहेत. मंडपाच्या खांबावर अत्यंत कोरीव अशा मूर्ती आहेत. या भिंतीवर एकूण ७० प्रतिमा कोरल्या आहेत. शंकर पार्वतीची विविध मुद्रांमधील या मूर्ती अत्यंत कोरीव आहेत. या मंदिरातील 'त्रिमुखी' मूर्तीही प्रसिद्ध आहे.

गाभाऱ्यात शिवलिंगाऐवजी एक उंचवटा आहे. यालाच स्वयंभू शिवलिंग मानून त्याची पूजा केली जाते. मंदिराच्या स्तंभावर शिव पार्वती, विष्णू, महिषासूरमर्दिनी यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत आणि प्रत्येक मूर्तीवर तेवढेच सुंदर नक्षी केलेले तोरण आहे.येथे एक प्राचीन शिलालेखही मिळाला आहे. हेमाडपंती शैलीतील उत्कृष्ट वास्तुकलेचा हा नमुना आहे.

**नागनाथ मंदिर :**



नागनाथ मंदिर

**स्थळ :** औंढा (नागनाथ) जि. हिंगोली (महाराष्ट्र)

**माध्यम :** वालुकाश्म

नागनाथ मंदिर हे भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी आठवे ज्योतिर्लिंग असून महाराष्ट्रामध्ये हिंगोली जिल्ह्यातील औंढा या तालुक्याच्या ठिकाणी हिंगोलीपासून दक्षिणेस २४ कि. मी. अंतरावर आहे.

सदर मंदिर हे मराठवाड्यातील देवालय चक्रवर्ती म्हणून ओळखले जाते.

नागनाथाचे मंदिर एका विस्तीर्ण (२८९ × १९० फुट) आवारात असून मंदिराभोवती तट आहे व चार प्रवेशद्वारे आहेत. या मंदिराच्या प्राकारात इतर लहान मंदिरे, व आग्नेय कोपऱ्यात बारव (विहिर) असून त्यास सासू- सुनेची बारव असेही म्हणतात.

प्राचीन स्थापत्यशास्त्र व शिल्पशास्त्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून या भव्य मंदिराचा उल्लेख करता येतो.

**विधान :** हे मंदिर पंचांग पद्धतीचे आहे. त्याचे विधान बहुकोनाकृती असून ते गर्भगृहाच्या बाह्य चौकोन स्वअक्षावर फिरवून निर्माण होणाऱ्या चौकोनांनी बनलेले आहे.

या मंदिरात गर्भगृह, अंतराळ. मंडप, मुखमंडप व दोन अर्धमंडप आणि मंदिरासमोर नंतरच्या काळात बांधलेला नंदीमंडप एवढे घटक आहेत. उत्तरेकडील तटाचे प्रवेशद्वार हे मुख्य प्रवेशद्वार होय.

**अधिष्ठान :** गर्भगृह व सभामंडपाला उत्कृष्ठ अधिष्ठान असून जमिनीपासून अनुक्रमे खुर, पद्म, कणी, अर्धस्फुट, कपोत, कीर्तीमुख, गजथर, अश्वथर व नरथर आहेत. यातील नर थरामध्ये कृष्णलीला, युद्धदृश्य, मानवी जीवनातील प्रसंग कोरलेले असून रामायन-महाभारतातील युद्ध प्रसंगही कोरलेली आढळतात.

**गर्भगृह :** गर्भगृह दोन मजल्याचे आहे. वरचा मजला हा मुख्य मंडपाच्या समपातळीत असून या मजल्यावरील रचना मराठा शैलीची आहे. या मजल्यावरील पूर्वेकडे भिंतीजवळ विष्णूची मूर्ती आहे. १९७३ मध्ये जवळच्या एका तलावातील गाळ काढण्याचे काम चालू असताना ती सापडली. ही मूर्ती शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

गर्भगृहाच्या दक्षिणेकडील भिंतीजवळ तळातल्या गाभाऱ्याकडे जाण्यासाठी भिंतीलगत पायऱ्या आहेत. तळगर्भगृहाच्या आकार मध्यभागी शिवलिंग आहे.

अशा प्रकारच्या गाभाऱ्याची रचना अंबरनाथ

येथील शिलाहारकालीन (११ वे शतक) शिवालयात आहे.

**द्‍वार :** गाभाऱ्याचे प्रवेशद्‍वार त्याच्या सौंदर्यामुळे विशेष उल्लेखनीय आहे. त्याची चौकट सहा शाखांत विभागलेली आहे.

**अंतराळ :** गर्भगृहासमोर अंतराळ असून ते मंडपाचाच भाग असल्यासारखे वाटते, कारण बाजूच्या प्रवेशांच्या दिशांना अशीच रचना आहे.

**मंडप :** आतल्या रचनेमुळे सभामंडप चांदणीच्या आकारासारखा वाटतो. मध्यभागी चंद्रशिळेवरचे शोभिवंत छत आठ खांबांवर तोलून धरले आहे. प्रत्यक्ष सभा मंडप वीस खांबावर आधारलेला आहे.

**मुखमंडप :** मंडपासमोर दोन पूर्ण स्तंभ व दोन अर्धस्तंभ यावर आधारित उघडा मंडप आहे. मंडपाच्या अधिष्ठान स्तरामध्ये भव्य हत्ती शिल्पे आहेत. मुखमंडपातील स्तंभमंडपाच्या मुख्य स्तंभासारखेच विष्णुकांत प्रकारचे आहेत.

**अर्धमंडप :** मंडपाच्या उत्तर आणि दक्षिण बाजूस दोन अर्ध मंडप असून त्याची रचना व आकार मुखमंडपासारखाच आहे.

**शिल्पांकन :** देवळाच्या बाहेरील भिंतीवर अनेक देवता कोरलेल्या आहेत. त्यांचे एकावर एक असे दोन पट्टे आढळून येतात. ब्रह्मा, विष्णू, महेश आणि अष्टदिक्‌पाल ह्यांच्या बरोबरच भगवान शंकराच्या रौद्र व सौम्य प्रतिमा कोरल्या आहेत. गर्भगृहाच्या बाह्य अंगावर शिवाच्या पाच रूपांपैकी महत्त्वाची तीन रूपे उत्तरेला वामदेव, पूर्वेला तत्पुरुष आणि दक्षिणेला शिवमूर्ती अशा सुंदर देवकोष्ठात प्रस्थापित केल्या आहेत. एवढ्या मोठ्या आकारातील मूर्ती महाराष्ट्रातील कोणत्याही मंदिरात बघावयास मिळत नाही हे या मंदिराचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

शिल्पांकनाच्या बाबतीत हे मंदिर समृद्‍ध असून या मंदिरावर सुमारे ४०० पेक्षा अधिक मुख्य शिल्पे असून हजारोंच्या संख्येने लघुशिल्पे आहेत. एवढी शिल्पसमृद्‍धी मराठवाड्यातील अन्य एकाही मंदिरात आढळत नाही. या शिल्पांत केवळ संख्यात्मक आधिक्य नसून गुणात्मकताही दिसून येते. शिवाय शिल्पवैविध्य ही येथे आहे, हे विशेष होय.

या मंदिर रचनेत चालूक्य - होयसाळ शैलीचा प्रभाव जाणवतो. मंदिराची बांधकाम शैली व शिल्प शैलीच्या अवलोकनातून हे मंदिर ११ व्या शतकातले असावे, असे वाटते.

**उपक्रम :**

**सिद्‍धेश्वर मंदिर (होट्टल), नांदेड या हेमाडपंती मंदिरांची माहिती मिळवा.**





## २. हिंदू– इस्लामी व मोगल वास्तुशैली

बाराव्या शतकाच्या अखेरीस मुस्लीम आक्रमकांनी भारतात मुसलमानी सत्तेचा पाया घातला व दिल्लीत आपली राजधानी स्थापन केली. या परकीय सत्ताधीशांबरोबरच इस्लामी वास्तुकलेतील नवकल्पनांचे लोणही भारतात येऊन पोहोचले. इस्लामी वास्तुकला ही अरबी, सीरियन, बायझंटाईन, इराणी व तुर्की कलांच्या प्रभावातून उदयाला आली आहे. दिल्लीचे सुलतान व मोगल सम्राट यांनी उभारलेल्या इमारतींचे तपशीलवार बांधकाम करण्याचे काम स्थानिक कारागिरांकडेच सोपवण्याखेरीज दुसरा मार्गच उपलब्ध नव्हता; त्यामुळे प्रारंभापासूनच या नव्या शैलीवर तुरळक स्वरूपात हिंदू वास्तुकलेचा प्रभाव दिसून येतो. तथापी वास्तुसंकल्पना मात्र निर्विवादपणे इस्लामी शैलीची आहे व ते मूलतः हिंदू कलेहून अगदी भिन्न आहे. भारतात उभारल्या गेलेल्या इस्लामी वास्तूंपैकी महत्त्वाच्या बहुतेक इमारती धार्मिक स्वरूपाच्या म्हणजे मशीदी व कबरी आहेत. धर्मनिरपेक्ष वास्तूंत राजप्रासाद व दरबाराची दालने यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

इस्लामी वास्तुकलेमध्ये तीन प्रमुख शैली अस्तित्वात असलेल्या दिसतात.

१ सुलतान शैली किंवा दिल्ली शैली

२. प्रांतिक शैली


३. मोगल शैली

### सुलतान शैली किंवा दिल्ली शैली :

दिल्ली शैली ही प्रथमतः गुलाम सुलतानांच्या कारकिर्दीत १३ ते १६ व्या शतकापर्यंत प्रचलित होती. गुलाम घराण्यातील पहिला राजा कुतुबुद्दीन ऐबक याने दिल्ली हे आपले राजधानीचे शहर केले. इ.स. ११९१ मध्ये कुवत – उल– इस्लाम ही मशीद बांधली या मशिदीच्या प्रार्थनेच्या सभागृहापुढे तीन कमानी व जाळीचा पडदा उभारण्यात आला. प्रत्यक्षात या कमानी दगडांची कमानदार रांग उभारून तयार झालेल्या नाहीत, तर भिंतीप्रमाणेच दगडांची रांग बसवताना थोडे थोडे दगड पुढे आणून कमानदार आकार निर्माण केलेला आहे. या मशिदीतले बरेचसे नक्षीकाम हिंदू पद्धतीचे आहे.

गुलाम घराण्याच्या वास्तुकलेच्या प्रारंभीच्या काळातील तीनच इमारती आता थोड्या फार प्रमाणात उभ्या आहेत, त्या म्हणजे दिल्लीचा कुतुब मिनार, त्या शेजारची कुवत – उल – इस्लाम ही मशीद आणि अजमेरची 'आढई – दिन – का – झोपडा' या नावाने ओळखली जाणारी मशीद .

### कुतुब मिनार – दिल्ली :



कुतुब मिनार

**स्थळ :** दिल्ली

**कालखंड :** इ.स. ११९१

**राजवंश :** गुलाम घराणे

**शैली :** सुलतान शैली

**माध्यम :** पिवळा वाळूचा दगड, पांढरा संगमरवर

**वैशिष्ट्ये :** सुलतान शैलीतील सर्वात लक्षणीय वास्तू म्हणजे कुतुब मिनार ही होय. कुवत–उल्–

इस्लाम या मशिदीच्या आवारातच कुतुबुद्दीन ऐबकाने इ.स. ११९१ मध्ये पाया घातला. त्याच्या कारकिर्दीत या मिनाराचा फक्त पहिला मजलाच बांधला गेला. त्याचा वारस अल्तमुशने त्यावरचे तीन मजले बांधले. या बांधकामाला पंचवीस – तीस वर्षे लागली असावीत. कुवत–उल्–इस्लाम या मशिदीसमोर बांग देण्यासाठी हा मनोर बांधला. पूर्व आणि पश्चिम या दोन्ही दिशांवर परमेश्वरा चे छत्र धरणारी ही वास्तू आहे असे मात्र शिलालेखावर कोरले आहे. फिरोझ तुघलकच्या काळात सर्वात वरचा मजला बांधला गेला. इ.स. १८०३ मध्ये भूकंपामूळे या मिनारावरचा घुमट ढासळला. एका इंग्लिश इंजिनियरने तो बसवण्याचा प्रयत्न केला पण तो विद्रूप दिसल्यामुळे पुढे काढून टाकण्यात आलेला आहे. वरचा भाग तुघलक सुलतान फिरोजशहाने पुन्हा बांधून काढला मात्र तसे करताना तेवढ्याच उंचीत एकाऐवजी त्याने दोन मजले बांधले. या मिनाराचे खालील मजले लालसर पिवळ्या वाळूच्या दगडात बांधलेले आहेत. वरच्या दोन मजल्यांत पांढऱ्या संगमरवराचा वापर करण्यात आलेला आहे. या मिनाराची उंची ७१.४० मीटर आहे. मिनाराचा व्यास तळात १४.८ मीटर व शिखराजवळ तीन मीटर आहे.

मिनाराच्या आतून गोलाकृती जिना असून त्यास ३७९ पायऱ्या आहेत. प्रत्येक मजल्यावर गच्ची आहे व गच्चीत जाण्यास दरवाजे आहे.

वरच्या टोकाकडे निमुळत्या होत जाणाऱ्या या इमारतीत आडव्या आणि उभ्या रेषांचा समतोल मोठ्या कौशल्याने साधलेला आहे. याचे विधान नक्षत्राकृती असल्याने तळमजल्याची भिंत सपाट राहिलेली नाही, तळमजल्यावर हे कंगोरे एकाआड एक कोनाकृती व वर्तुळाकृती आहेत. पहिल्या मजल्यावर ते फक्त वर्तुळाकृती आणि दुसऱ्यावर फक्त कोनाकृती आहेत. तिसऱ्या व चवथ्या मजल्याला कंगोरे नाहीत. प्रत्येक मजल्याच्या गच्चीचा तळाचा भाग कमानींच्या नक्षीने नटवला आहे. याशिवाय त्यांवर कुराणांतील वचने कोरण्यात आलेली आहेत.

निमुळता आकार व उभे कंगोरे यांच्यामुळे भव्यता आणि उंची अधिक प्रमाणात जाणवते. त्याच्या उभ्या कंगोऱ्यामुळे प्रेक्षकांचे लक्ष वर खेचले जाते. या वास्तुशैलीतील कुतुब मिनार हा त्या काळातला अत्यंत भव्य कलाविष्कार होय.

## प्रांतिक शैली :

दिल्ली हे मुसलमानांच्या साम्राज्याचे प्रमुख केंद्र होते. त्यामुळे हळूहळू भारतातील वेगवेगळ्या प्रांतात मुस्लीम अंमल प्रस्थापित झाला. त्यामुळे प्रांतीय वास्तुशैली निर्माण झाल्या. दिल्लीच्या आसपासच्या प्रांतांतून दिल्ली शैलीचा प्रभाव होता. दूरच्या प्रांतांमध्ये तेथील मुस्लीम राज्यकर्त्यांनी भारतीय वास्तुकारांकडून आपल्या वास्तूंची निर्मिती करून घेतली व त्यामुळे त्यावर भारतीय परंपरांचा प्रभाव दिसू लागला. याचप्रमाणे स्थानिक हवामानाप्रमाणे आणि तेथे उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीनुसार मुसलमानी शैलीत फरक पडला.

अशा तऱ्हेने प्रांताची वैशिष्ट्ये दाखवणाऱ्या एकूण आठ शैली निर्माण झाल्या. १. पंजाब २. बंगाल ३. गुजरात ४. माळवा ५. दक्षिण ६. विजापूर ७. काश्मीर ८. जौनपूर

## पंजाब शैली

सर्वात पहिली प्रांतिक शैली येथे निर्माण झाली. मुलतान आणि लाहोर येथे प्रथमतः मुसलमान शैलीस प्रारंभ झाला. पंचनद्यांच्या या प्रदेशात दगड फारसा उपलब्ध नसल्याने पातळ विटांचा उपयोग बांधकामात दिसून येतो. प्रांतिक पद्धतीचा परिणाम येथील मुसलमानी शैलीत दिसून येतो. मुलतान येथील रूख – इ– आलमची कबर ही उल्लेखनीय वास्तू आहे.

## बंगाली शैली :

पंजाबच्या रूक्ष प्रदेशापेक्षा गंगेच्या खोऱ्यामुळे वनश्रीने नटलेल्या बंगाली प्रदेशात मुसलमानी शैलीने निराळे रूप धारण केले. गंगा आणि महानंदा यांच्या संगमाजवळ असलेल्या मालदा जिल्ह्यात ही शैली

उदयास आली. येथील नद्यांना नित्य पूर येत असल्यामुळे आणि नद्या आपले पात्र बदलत असल्यामुळे टिकाऊ स्वरूपाच्या वास्तू तेथे फारशा उभारल्या गेल्या नाहीत. बांबू व लाकडाचा वापर प्रामुख्याने केलेला आढळतो. त्यामुळे येथील मुसलमानी वास्तुकलेत फारशा वैशिष्ट्यपूर्ण वास्तू सापडत नाहीत. पांडुआ येथील आंदिना मशीद व गौर येथील दाखिला दरवाजा या दोन उल्लेखनीय वास्तू आहेत.

**गुजरात शैली :**

भारतातील सर्वोत्कृष्ट लाकूडकामासाठी गुजरात प्रसिद्ध आहे. गुजरातच्या लाकडी कोरीव कामाची बरोबरी भारतातले इतर प्रांत क्वचितच करू शकतील. येथील देवालयांतून अशा लाकूडकामाचा विपुल आविष्कार कैक वर्षे गुजराती कलावंत करत होते. मुसलमानी सत्तेत मुसलमानी वास्तुकला घडवतानाही त्याच तऱ्हेच्या लाकडी कलाकुसरीचा वापर गुजरातमधील मुसलमान इमारतींत झाला. किंबहुना गुजरात शैलीचे ते वैशिष्ट्य ठरले. अहमदाबाद, खंबायत वगैरे ठिकाणच्या मशिदींत हे उल्लेखनीय कौशल्य पहावयास मिळते.

**माळवा शैली :**

माळवा शैलीवर दिल्ली शैलीचा परिणाम दिसतो. कारण येथील मुसलमान, इमारती बांधून घेण्यासाठी दिल्लीचेच कलावंत बोलावत होते. प्रवेशद्वारापुढे बांधलेल्या पायऱ्यांची रांग, गच्ची आणि विविधरंगी फरशांचा वापर ही माळवा शैलीची वैशिष्ट्ये होत. धार आणि मंडू येथे अशा तऱ्हेच्या इमारती पहावयास मिळतात.

**दक्षिण शैली :**

गुलबर्गा, बिदर आणि गोवळकोंडा येथे निर्माण झालेली शैली ही 'दक्षिण शैली' म्हणून ओळखली जाते. येथील कलेवर प्रामुख्याने पर्शियन कलेचा परिणाम दिसतो. येथील इमारतींवर बसवण्यात आलेले घुमट खूप मोठे असून पूर्ण पर्शियन पद्धतीचे आहेत. कंगोऱ्याचे मिनार व भव्य कमानी हेही या इमारतीचे वैशिष्ट्ये आहे.

**विजापूर शैली :**

विजापूरइतके उत्कृष्ट कलात्मक सौदर्य कुठल्याच प्रांतिक शैलीत आढळत नाही. ह्याचे कारण येथे राज्य करणाऱ्या आदिलशहाची रसिक वृत्ती.विजापूरच्या परिसरांतच बांधल्या गेलेल्या अनेक इमारती अतिशय कलापूर्ण आहेत. विजापूरचा 'गोल घुमट' भारतातील उत्कृष्ट इमारतींपैकी एक ठरला आहे.

**काश्मीर शैली :**


काश्मीरमधील बऱ्याच इमारती लाकडाच्याच बांधल्या जातात. भिंती तसेच खांब लाकडातूनच केले जात, त्यामुळे येथील मुसलमानी मशिदी व थडगी लाकडाचीच बांधली गेली. काश्मीरमध्ये मोगलांनी बांधलेल्या बागा विशेषतः 'शालिमार बाग' प्रेक्षणीय स्थळ आहे. बागांची रचना मुसलमान राजवटीपासूनच प्रथमतः भारतात सुरू झाली.

**जौनपूर शैली :**

येथील शैलीवर दिल्ली शैलीचाच प्रभाव दिसतो. प्रवेशद्वारे व भरभक्कम तट हे येथील वास्तूचे वैशिष्ट्य आहे.

**गोल घुमट – विजापूर :**

**स्थळ :** विजापूर (कर्नाटक)



गोल घुमट

**कालखंड :** सुलतान महंमद आदिलशाहच्या कारकिर्दित उभारणी (इ.स. १६२६ ते १६५६)

**माध्यम :** पाषाण, विटा, चुना.

**शैली :** विजापूर शैली

**वैशिष्ट्ये :** विजापूरचा गोलघुमट इस्लामी वास्तुकलेचे व प्रांतिक शैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रांतिक शैलीतील ही वास्तू एक कबर असून तिचा आराखडा चौकोनी आहे. तिचे आतील क्षेत्रफळ १७०३.५ चौ. मी. एवढे असून त्याच्या घुमटाची उंची ७८ फुट आहे व त्याचा व्यास १४४ फुट आहे. ही इमारत चौकोनी असून तिच्या चारही कोपऱ्यात अष्टकोनी चार मिनार आहेत. हे मिनार आठ मजली असून त्यावर लहान सौंदर्यपूर्ण असे घुमट आहेत.

इमारतीच्या तळमजल्यात आदिलशहाची मूळ कबर असून इमारतीच्या जोत्याच्या पातळीवर उपासनेसाठी दुसरी कबर किंवा मकबरा बांधलेला आहे. कबरीच्या पश्चिमेकडील भिंतीमध्ये एक अर्धअष्टकोनाकृती महिरप असून तिच्या योगे मक्केकडे तोंड करून कुराणपठण करता येते.

विजापूरच्या गोलघुमटाच्या बांधकामात विजापूर शैलीची व अलंकरणाची सर्व वैशिष्ट्ये बघावयास मिळतात. विजापूरच्या गोलघुमटाच्या बांधकामात विजापूर शैलीची व अलंकरणाची सर्व वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

विजापूरच्या स्थापत्य विशारदांनी घुमटाला अधिक भव्य, घाटदार व सौदर्यपूर्ण रूप देण्याचा प्रयत्न केला. हा घुमट म्हणजे वास्तुशास्त्राच्या क्षेत्रातील एक आश्चर्यच आहे. सदर वास्तूला कोणत्याही प्रकारचा बेडौलपणा येणार नाही अशी काळजी घेऊन त्याची रचना करण्यात आली आहे. संपूर्ण वास्तूने घुमट अलगद तोलल्यासारखा वाटतो. संपूर्ण घुमट आतील बाजूने पोकळ असून त्याच्या रचनेत प्रमाणबद्धता, भव्यता आणि साधी रचना ही वैशिष्ट्ये आढळतात.

तथापि, गोल घुमट प्रसिद्ध आहे तो त्यात प्रत्ययास येणाऱ्या प्रतिध्वनींच्या नादचमत्कारामुळेच होय. या घुमटामध्ये उच्चारित आवाजाचे प्रतिध्वनी साधारणपणे दहा – बारा वेळा स्पष्टपणे ऐकू येतात. म्हणून त्याला बोलणारा घुमट या अर्थाने 'बोल घुमट' असेही म्हणतात.

या घुमटाने आच्छादलेले क्षेत्रफळ रोमच्या 'पॅन्थिऑन' या मंदिरामधील जगात सर्वात मोठ्या मानलेल्या घुमटाने आच्छादलेल्या क्षेत्रफळापेक्षाही मोठे आहे. त्याच्या पायथ्याशी उजेडासाठी सहा झरोके आहेत. घुमट क्षितिज समांतर वीट – रचनेवर बांधलेला आहे व त्यास आतून व बाहेरून चुन्याचा गिलावा दिलेला आहे. साध्या व भव्य वास्तुरचनेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून गोल घुमटाचा उल्लेख केला जातो. प्रांतिक शैलीतील ही प्रसिद्ध वास्तू आजही चांगल्या स्थितीत बघावयास मिळते.

## मोगल शैली

मोगल सम्राट हे सुसंस्कृत व कलाप्रेमी होते. त्यांना कलापूर्ण इमारती बांधण्याचा शौक होता. त्यामुळे भारतातील विविध राजधान्यांत व मोठ्या शहरात राजेशाही व भव्य इमारती उभ्या राहिल्या. मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबर आणि त्याचा मुलगा हुमायून या दोघांनाही राज्य स्थिर करण्याच्या उद्योगात नव्या संस्मरणीय वास्तू उभारण्यास फारसा वेळ झाला नाही. हुमायूनला राज्यावरून हुसकावून लावणारा अफगाण सेनानी शेरशहा सुरीयाने सत्ता काबीज करून गादी बळकावली. त्याने ससाराम येथील तलावात बांधलेली कबर प्रसिद्ध आहे. शिवाय त्याने दिल्लीत बांधलेला पुराणा किल्ला या नावाने ओळखला जाणारा किल्ला उच्च दर्जाचा आहे. सुलतान शैलीतून मोगल शैलीकडे झालेले संक्रमण त्या इमारतीत दिसून येते.

हुमायूनच्या मृत्युनंतर त्याच्या राणीने हजीबेगमने दिल्लीमध्ये त्याची एक सुंदर कबर बांधली ती एक सुरेख

रचना असून सुंदर व विशाल बगिच्यात बांधली गेलेली ती पहिलीच इमारत होय. ही कबर बांधताना बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतः बेगम आणि तिचा मुलगा छोटा अकबर हे करीत होते. या कबरीच्या कामासाठी अरबस्तान, पर्शिया व भारतातून अनेक कलावंत बोलावण्यात आले होते. त्यामुळे हिंदू आणि पर्शियन वास्तुकलेचा मधुर संगम या इमारतीत घडला.

### सम्राट अकबराची कामगिरी :

मोगल वास्तुकलेची खरी भरभराट अकबराच्या कारकीर्दीत सुरू झाली. हिंदुस्थानातील धर्मपंथांबद्दल आणि कलासंपदेबद्दल अकबराला आदर होता. भारतातील अनेक ठिकाणांहून त्याने नामवंत वास्तुकारांना बोलावले व आपल्या दरबारात ठेवले. त्याने उभारलेल्या साऱ्या वास्तूंत शक्य तो हिंदुस्थानातल्याच कलावंतांना संधी देण्याचे धोरण त्याने ठेवले होते. या देशातल्या लोकांना जे काम जमणार नाही. तेवढ्यापुरतेच तो बाहेरच्या देशातील लोकांना पाचारण करीत असे. या त्याच्या दृष्टिकोनामुळे भारतात प्राचीन काळापासून जोपासल्या गेलेल्या वास्तुविद्येचा मोगल वास्तुकलेवर अनुकूल परिणाम झाला आणि ती अलौकिक सौंदर्याने नटली. अकबर गादीवर आल्यावर त्याने भव्य वास्तूंच्या योजना आखल्या. त्याने बांधलेल्या सर्व इमारतीत लाल वाळूच्या दगडांचा वापर प्रामुख्याने केला आणि त्याच्या वैभवशाली कारकिर्दीला हा लाल रंग शोभूनही दिसला. वास्तुकलेतील विशेष कामगिरी फत्तेपूर सिक्री येथे पहावयास मिळते. फत्तेपूर सिक्रीतील बुलंद दरवाजा ही अकबराच्या वास्तुकलेतील आकांक्षांची खरी परिपूर्ती होय. या सुंदर नगरातील जोधाबाईचा महाल, बिरबलाचा वाडा, बुलंद दरवाजा हे भाग प्रेक्षणीय आहेत.

### जहांगीरकालीन वास्तू

अकबरानंतर जहांगीर सम्राट बनला. त्याला चित्रकलेची जास्त आवड होती. त्याच्या कारकिर्दीत निर्माण झालेल्या तुरळक वास्तूंत त्याने बांधलेल्या अकबराच्या कबरीचा प्रामुख्याने समावेश होतो. याच्या काळातील वास्तूंत हिंदू वास्तुकलेतील काही घटक व अलंकरण पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात आढळतात. लाल वालुकाश्माऐवजी संगमरवरी दगडाचा उपयोग अधिक प्रमाणात केला आहे.

### शहाजहानची कामगिरी

जहांगीरनंतर गादीवर आलेल्या शहाजहानची कारकीर्द म्हणजे मुसलमानी वास्तुकलेच्या अपूर्व वैभवाचा काळ. या काळात निर्माण झालेल्या वास्तू केवळ भारतालाच नव्हे तर जगाला भूषणावह ठरल्या. अकबर याने मुख्यतः लाल दगड वापरलेला दिसतो. शहाजहानने मात्र शुभ्र संगमरवराचा प्रामुख्याने उपयोग केलेला आढळतो. यामुळे जे कोरीव काम यापूर्वी फारसे शक्य नव्हते ते संगमरवराच्या नाजूक माध्यमातून सहज शक्य झाले. रत्नाचे आणि सुवर्णाचे जडावकामाचे काम संगमरवरी इमारतीत करण्यास शहाजहानने बरेच प्रोत्साहन दिले. ज्याला युरोपात 'मोझाईक' म्हणतात. अशा तऱ्हेच्या कामालाही याच काळात सुरुवात झाली.

याने अनेक मशिदी व प्रासाद उभारले. दिल्ली येथे शहाजहानाबाद या किल्ल्याची उभारणी केली तोच 'लाल किल्ला' या नावाने सुप्रसिद्ध आहे. ताजमहाल ही शहाजहानची सर्वोत्तम कामगिरी होय.

### औरंगजेब कालीन कला

शहाजहाननंतर गादीवर आलेला औरंगजेब कट्टर धर्मनिष्ठ होता. त्याला कलांची आवड नसल्यामुळे त्याचा कारकीर्दीत वास्तुकलेला उतरती कळा लागली. ह्याच्या हयातीत त्याच्या मुलाने आईच्या स्मरणार्थ बांधलेली उल्लेखनीय वास्तू म्हणजे औरंगाबाद येथील 'बिबी का मकबरा' ही वास्तू होय. ताजमहालची प्रतिकृती करण्याच्या उद्देशाने ती बांधली गेली. परंतु तिला ताजमहालाचा दर्जा व लौकीक प्राप्त झाला नाही.

## बुलंद दरवाजा – फत्तेपूर सिक्री :



बुलंद दरवाजा

**स्थान :** फत्तेपूर सिक्री

**कालखंड :** मोगल सम्राट अकबर (१६०१-०२)

**माध्यम :** तांबडा व पिवळा वालुकाश्म

**शैली :** इराणी पद्धत

**वैशिष्ट्ये :** उत्तर प्रदेशातील आग्रा जवळील फत्तेपूर सिक्री येथे उभारण्यात आलेल्या अकबरकालीन वास्तूंपैकी 'बुलंद दरवाजा' ही वास्तू विशेष उल्लेखनीय आहे.

फत्तेपूर- सिक्री येथे असलेल्या जामा मशिदीला तीन बाजूंनी प्रवेशद्वारे आहेत. त्यापैकी दक्षिणेकडील प्रवेशद्वार बुलंद दरवाजा या सार्थ नावाने प्रसिद्ध आहे. अकबराने खानदेशावरील विजयाचे स्मारक म्हणून हा दरवाजा उभारला आहे. फत्तेपूर सिक्रीच्या दक्षिणेस खानदेश असल्याने ते द्वार भव्य करण्यात आले. तो भारतातील सर्व प्रवेशद्वारांमध्ये अधिक उंच व जगातील अशा प्रकारच्या प्रचंड इमारतींपैकी एक आहे.

वर जाण्यासाठी असलेल्या पायऱ्या सोडून कमानीच्या वरच्या टोकापर्यंतची त्याची उंची १३४ फुट आहे. रस्त्यापासून पायऱ्यांसह संपूर्ण वास्तूची उंची १७६ फुट आहे. इराणी पद्धतीच्या प्रवेशद्वाराचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे.

या दरवाजाच्या दोन्ही बाजूंस दुमजल्यांची रचना केल्याने या दरवाजाची भव्यता मनास अधिकच जाणवते. त्याचे सौंदर्य व वैभवशाली डौल त्याच्या घुमटात व त्याच्या प्रचंड उंचीत सामावलेला आहे. याच्या सजावटीसाठी 'सुलेखन' पद्धती वापरून त्यात कुराण, बायबल, गीता अशा विविध धर्मांच्या श्रेष्ठ तत्त्वांची रचना केली आहेत. ही सजावट जडाव पद्धतीने केली असून त्यात अकबराचे सर्व धर्मावरील प्रेम दिसते. या वास्तूवरील वचनापैकी एक वचन असे की, ''संसाररूपी पूल ओलांडून जा. त्यावर घर बांधण्याचा प्रयत्न करू नका. एका घटकेच्या अमरत्वाची इच्छा म्हणजे कायमच्या अमरत्वाची प्राप्ती. हे आयुष्य म्हणजे एका घटकेचा खेळ, ही घटका ईश्वरचिंतनात घालवा कारण बाकी सर्व अशाश्वत आहे.''

बुलंद दरवाजा ही वास्तू भारतातील वास्तुविषयक कारागिरीचा सुंदर, कलापूर्ण, निर्दोष, भव्य व प्रमाणबद्ध असा नमुना आहे. अकबरकालीन हा दरवाजा नावाप्रमाणे भक्कम असून आजही चांगल्या स्थितीत उभा आहे.

## ताजमहाल – आग्रा :



ताजमहाल

**स्थान :** उत्तर प्रदेशातील 'आग्रा' या शहरात यमुना तीरावर उभारला आहे.

**कालखंड :** शहाजहान बादशाहाच्या काळात इ.स. १६३२ मध्ये बांधकामास सुरुवात

**माध्यम :** मकराना येथील पांढराशुभ्र संगमरवर

**शैली :** मोगल शैली

**वैशिष्ट्ये :** शहाजहान वास्तुप्रेमी होता. त्याच्या काळातील सर्वोत्तम कारागिरीचा नमुना म्हणजे 'ताजमहाल' होय. त्याची बेगम अर्जमंद बानू ऊर्फ मुमताज हिची कबर होय. मुमताजच्या स्मरणार्थ हा ताजमहाल उभारलेला आहे. यमुना तीरावर ५८० मीटर लांब व ३०५ मीटर रुंद एवढ्या भव्य आवाराला उंच तटबंदी केलेली असून त्यात लाल वालुकाश्मात बांधलेले एक प्रवेशद्‌वार, एक मशीद व मेहमानखाना अशा वास्तू आहेत.

या आवाराच्या मध्यभागी १८ फुट उंचीच्या व ३१३ चौ. फुट क्षेत्राच्या लाल दगडात बांधलेल्या प्रशस्त चबुतऱ्यावर ताजमहाल उभा आहे. संपूर्ण बांधकाम चमकदार संगमरवरी दगडाचे असून चारही कोपऱ्यांवर मिनार आहेत. प्रत्येकाची उंची १३३ फुट असूनही ते प्रमाणबद्‌ध व नाजूक भासतात. कारण ते मुख्य इमारतीच्या भव्य आकारमानाला शोभणारे आहेत. अगदी मध्यावर मुख्य कबर आहे व ती १८ चौ. फुट क्षेत्राची आहे. मधल्या अष्टकोनी दालनाची उंची ९२ फुट ३ इंच आहे. त्यावरील घुमटाचा व्यास ५८ फुट व छतापासून वर घुमटाची उंची ७४ फुट आहे. खालच्या चबुतऱ्यापासून घुमटाच्या वरच्या टोकापर्यंतची एकूण उंची १९१ फुट आहे. यावरून बांधकामाची भव्यता लक्षात येते. या घुमटाच्या मध्यवर्ती कबरीच्या सभोवती संगमरवरी दगडाच्या पडद्यात जाळीदार नक्षी कोरलेली आहे. या जाळीदार पडद्याच्या आतील बाजूस असलेल्या मकबऱ्याखाली दफनभूमी आहे.

कमी जाडीच्या संगमरवरी पडद्यात अत्यंत सफाईने व कौशल्याने कोरलेली जाळीदार नक्षी हे ताजमहालाचे एक विलोभनीय वैशिष्ट्य आहे. संगमरवरी दगडात कमी प्रतीच्या रत्नांचे नक्षीसाठी केलेले जडावाचे काम हे ही अत्यंत महत्वाचे दुसरे वैशिष्ट्य येथे आढळते प्रवेशद्‌वाराच्या कमानीच्या चौकटीवर कुराणातील वचने खोदून व जडाव काम करून लिहिली आहेत व अशा रीतीने अलंकरण म्हणूनही त्यांचा उपयोग केला आहे.

ताजमहालाचा शुभ्र संगमरवरी दगडाचा घुमट हे त्याचे सर्वात आकर्षक वैशिष्ट्य आहे. त्याच्या सभोवती चारही कोपऱ्यात लहान घुमट असलेल्या चार छत्र्या आहेत. घुमटाच्या तळाशी कमळाच्या पाकळ्या आहेत व त्यातून घुमटाचा डौलदार आकार वर येत शेवटी टोकदार होतो. त्यावर इराणी कलेचा प्रभाव दिसून येत असला तरी कमलदले व छत्र्या यातील हिंदू वास्तुकलेचा प्रभाव सहज लक्षात येण्यासारखा आहे.

नाजूकपणा व डौलदारपणा ही ताजमहालच्या सौंदर्याची दोन विशेष लक्षणे आहेत. पुढील चार घटकांमुळे हा प्रभाव विशेष जाणवतो.

१. वापरलेले साहित्य

२. छायाप्रकाशाचे नियंत्रण

३. मुक्त संकल्प

४. विरोधी घटकांच्या विशाल संकल्पना

ताजमहालाच्या बांधकामासाठी उत्कृष्ट दर्जाचा मकरानाहून आणलेला संगमरवर वापरलेला आहे. प्रकाशातील बदलामुळे दिवसभरात त्याच्या रंगात सूक्ष्म बदल होत राहतो. कबरीची मुख्य इमारत आणि तिच्यापासून अगदी सुटे, काही अंतरावरील चार मिनार या सर्वांना समान असलेल्या चबुतऱ्याने एकत्र गुंफले आहेत व त्यामुळे मुक्त संकल्पना पहावयास मिळते.

ताजमहालाच्या पुढील बाजूस प्रशस्त बगिचा आहे. तलावाच्या पाण्यात त्याचे प्रतिबिंब पडते. झाडांचा गडद हिरवा रंग आणि मागील इमारतीचा तांबडा रंग या पार्श्वभूमीवर ताजमहालाचे शुभ्र सौंदर्य विशेष खुलून दिसते. या सर्वामुळे त्याची गणना जगातील आश्चर्यांत करण्यात येते.

## 'भारतीय मंदिर रचना'

## 'नागर शैली'

**प्र.१ खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे मंदिरांच्या शैलीची सविस्तर माहिती लिहा.**

१. नागर शैली २. द्राविड शैली

अ) मंदिर रचना, ब) शिखर रचना क) माध्यम ड) वैशिष्ट्ये इ) शिल्पकलेची कलात्मक मूल्ये फ) ठिकाणे

**प्र. २ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. दगड–विटा वापरून देवालयांचे बांधकाम करण्यास ......... काळात सुरुवात झाली.
(गुप्त/महावीर/आठवे शतक/ चैत्य)

२. भुवनेश्वर येथील ......... मंदिर हे सर्वात प्रसिद्ध व महत्त्वाचे मंदिर आहे.
(कोणार्क/खजुराहो/ लिंगराज)

३. कृष्णा नदीपासून कन्याकुमारीपर्यंतच्या भूभागात ......... ही रचना शैली आढळते.
(द्राविड/नागर/वेसर)

४. दिलवाडा येथे ......... मंदिरांचा समूह आहे.
(१६/०५/१०)

**प्र. ३. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. हिंदु मंदिराचे विविध भाग कोणते ?

२. पाश्चात्य समीक्षकांनी नागर शैलीतील मंदिरांना दिलेले नाव काय?


३. त्रिरथ मंदिर रचना कशाला म्हणतात?

४. आमलक म्हणजे मंदिराचा कोणता भाग?


५. कोणार्क मंदिरातील अनेक मूर्ती कोणत्या दगडात कोरल्या आहेत?

**प्र. ४. आकृतिबंध पूर्ण करा.**


१. मंदिराचे भाग



२. दिलवाडा मंदिर समूह



३. इस्लामी वास्तुकलेच्या तीन शैली



**प्र. ५. सविस्तर टिपा लिहा.**

१. माऊंट आबू येथील जैन मंदिर

२. खजुराहो येथील कंदरिया महादेव मंदिर

**प्र.६. जोड्या लावा.**

| 'अ' | 'ब' |
| --- | --- |
| १. लूणवसही मंदिर | १. पाच मंदिरांचा समूह |
| २. दिलवाडा मंदिर | २. उभट आकाराच्या मूर्ती |
| ३. कंदारिया महोदव मंदिर | ३. राजा वीरधवल व त्याचे मंत्री |
| ४. खजुराहो | ४. मध्यप्रदेश |
| ५. सूर्यमंदिर | ५. गंगवंश |

## 'द्राविड शैली'

**प्र १ उत्तरे लिहा.**

१. द्राविड शैलीची वैशिष्ट्ये या विषयावर सविस्तर टिपणी लिहा.

२. वेरूळच्या कैलास मंदिराची रचना स्पष्ट करा.

३. मदुराई मीनाक्षी मंदिराची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्र.२. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. द्राविड शैलीचे एक प्रमुख वैशिष्ट्य .......... .

२. मदुरा हे ..........वंशाचे राजधानीचे शहर आहे.

३. 'सहस्त्रमंडपा' या प्रसिद्ध मंडपाला.......... स्तंभ आहेत.

४. मदुराई मीनाक्षी मंदिर .......... एकर जागेवर बांधले आहे.

५. 'मंदिर नगरी' म्हणून .............. मंदिराला ओळखले जाते.

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे.**

१. द्राविड शैलीत 'भूमी' म्हणजे काय ?

२. सहस्रमंडपा हा भाग कोणत्या मंदिरात अढळतो ?

३. स्वरस्तंभ कोणत्या मंदिरात आढळतो ?


४. कैलास मंदिर कोणत्या राजवंशाने उभारले ?/ निर्माण केले ?

५. कैलास मंदिरातील नाट्यमय शिल्प कोणते ?

६. द्राविड शैलीचे वेगळेपण मंदिर रचनेच्या कोणत्या भागात दिसते ?

**प्र.४ आकृतिबंध पूर्ण करा.**

द्राविड शैलीतील सुप्रसिद्ध मंदिर




## 'वासर शैली'

**प्र. १ वासर शैलीतील मंदिररचनेचे वेगळेपण थोडक्यात सांगा.**

**प्र. २ होयसाळेश्वर मंदिरातील प्रसिद्ध शिल्पांविषयी टिपणी लिहा.**

**प्र. ३ चन्नकेशव मंदिराची रचना स्पष्ट करा.**

**प्र. ४ सोमनाथपूर मंदिराच्या शिखरांचे वेगळेपण कसे व्यक्त होते.**

**प्र. ५ रिकाम्या जागा भरा.**

१. मिश्रक शैली.......... व ........... शैलींच्या मिलाफाला म्हणतात.

२. वासर शैलीच्या मंदिराचे जोते.......... असते.

३. होयसाळेश्वर मंदिरात ........... गाभारे आहेत.


४. चन्नकेशव मंदिराचे छत ...........आहे.

५. मदनिका मूर्ती ........... येथील मंदिरात आढळतात.

६. सोमनाथपूर येथील मंदिराचे बांधकाम .......... यांनी केले.

**प्र. ६ आकृतिबंध पूर्ण करा**

१. वासर शैलीतील सुप्रसिद्ध मंदिरे



## हिंदू – इस्लामी व मोगल वास्तुशैली

**प्र. १ थोडक्यात टिपा लिहा.**

१. कुतुब मिनार

२. मोगल शैली

३. गुजरात शैली

४. बुलंद दरवाजा

**प्र.२ उत्तरे लिहा.**

अ) ताजमहालाची गणना जगातील आश्चर्यांत का केली जाते ?

ब) कोणत्या चार घटकांमुळे ताजमहालचा विशेष प्रभाव जाणवतो ?

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कुवत – उल् इस्लाम या मशिदीच्या आवारात कोणता प्रसिद्ध मिनार आहे ?

२. शालिमार बाग हे प्रेक्षणीय स्थळ कोणत्या शैलीचे आहे ?

३. जैन शैलीचे वास्तू वैशिष्ट्य कोणते ?

४. पंजाब शैलीत विटांचा उपयोग वास्तुकलेसाठी का केला गेला ?

५. माळवा शैलीवर कोणत्या शैलीचा परिणाम दिसतो ?

६. ताजमहालाच्या सौंदर्याची दोन विशेष लक्षणे कोणती ?

**प्र. ४ जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| १. कुतुब मिनार | १. फत्तेपूर सिक्री |
| २. ताजमहाल | २. विजापूर |
| ३. गोल घुमट | ३. आग्रा |
| ४. बुलंद दरवाजा | ४. दिल्ली |

**प्र.६. कंसातील योग्य शब्द निवडून गाळलेल्या जागा भरा.**

(ताजमहाल, फत्तेपूर सिक्री, बोल घुमट, कुतुबमिनार, बिवी का मकबरा, मकराना)

१. ताजमहालची प्रतिकृती करण्याच्या उद्‌देशाने ............ ही वास्तू बांधली गेली.

२. शहाजहानच्या काळातील ............ ही सर्वोत्तम कामगिरी होय

३. गोल घुमटास ............ असेही म्हणतात.

४. कुतुबद्‌दीन ऐबकच्या कारकिर्दीत ............ चा पाया घातला गेला.

५. ताजमहालासाठी ............ येथील पांढराशुभ्र संगमरवर वापरण्यात आला.

**प्र.७ खाली दिलेल्या मुद्‌द्यांच्या आधारे दिलेल्या वास्तूंची सविस्तर माहिती लिहा.**

**विजापूरचा गोल घुमट, बुलंद दरवाजा**

१. स्थान


२. कालखंड

३. माध्यम

४. शैली

५ वैशिष्ट्ये

**प्र.८ आकृतिबंध पूर्ण करा..**



# २ भारतीय शिल्पकला

## १. भारतीय शिल्प

### गोल व उठाव शिल्पे –

शिल्पकार जेव्हा मातीचा, दगडाचा अथवा अशाच प्रकारच्या सपाट साहित्याचा पृष्ठभाग कमी – अधिक पुढे आणलेला दाखवतो, तेव्हा त्याला 'उठावाचे शिल्प' म्हणतात. अशा उठावाच्या शिल्पाला लांबी, रुंदी व प्रत्यक्ष खोली असते. कमी उठाव असल्यास त्याला कमी उठावाचे व हा उठाव अर्ध्याहून जास्त असल्यास उच्च उठावाचे शिल्प म्हणतात. बरहुत व सांची येथील तोरणावरील शिल्पे कमी उठावातील आहेत. गोल शिल्प हे चारी बाजूंनी पाहता येते. नटराजाची मूर्ती, मथुरेच्या उभ्या बुद्‌धाची मूर्ती अथवा कोणताही पुतळा चारी बाजूंनी पाहता येतो अशा मूर्तीला 'गोल शिल्प' म्हणतात.



त्रिमूर्ती

### त्रिमूर्ती – घारापुरी लेणी

**स्थळ :** मुंबई (मुंबईपासून ६–७ मैलावर घारापुरी बेट किंवा एलिफंटा गुहा)

**कालखंड :** आठव्या शतकाच्या उत्तरार्धातील शैव सांप्रदाय (राष्ट्रकूट राजा)

**माध्यम :** खडक

**उंची :** १८ फुट

**वैशिष्ट्ये :** मुंबईपासून सहा – सात मैल अंतरावरील घारापुरी किंवा एलिफंटा नावाचे एक बेट आहे. आठव्या शतकाच्या उत्तरार्धात शैव संप्रदायाच्या अनुयायांनी ही गुहामंदिरे कोरली. पश्चिम भारतातील गुहा मंदिरांचा हा शेवटचा उत्कृष्ट नमुना आहे. येथे अंतर्गत भागात सुमारे १० प्रचंड आकाराची प्रेक्षणीय व प्रभावी उत्थित शिल्पे आहेत. सर्व शिल्पात अत्यंत उत्कृष्ट असे जगप्रसिद्ध त्रिमूर्ती शिल्प आहे. भव्य कोनाड्यात शिवाची तीन रूपे दर्शवणारी ही मूर्ती बसवलेली आहे. उठावशिल्पातली ही मूर्ती आहे. या मूर्तीभोवती प्रदक्षिणा पथ नाही. या मूर्तीस महेशमूर्ती असेही म्हणतात. कारण शैवपंथीय ग्रंथात वर्णिलेली शिवाची तीन रूपे येथे तीन चेहऱ्यांमध्ये दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये सृष्टीचा निर्माणकर्ता वामदेव, पालनकर्ता महेश, व संहारकर्ता रूद्र अशी ही तीन रूपे दाखवली आहेत. त्याचबरोबर या मूर्तीकडे उत्पत्ती, स्थिती व लय ही तीन कार्य यातून सूचित केलेली आहे. अशा तीन मुखावरील शांत, गंभीर व रौद्र भाव दाखवले आहेत. मूर्तीचे जाड ओठ हेही या शिल्पाचे वैशिष्ट्य आहे.

### शंकर रूप –

मधले मुख शंकराचे किंवा महेशाचे असून त्याची शांत मुद्रा, भरदार वक्षस्थळ, कंठात अनेक हार, डोक्यावर उंच कीर्तीमुख (सिंहमुख) असलेला मुकुट दाखवला आहे. शिवाच्या पुढच्या हातात महाळुंग असून हात भंगलेल्या अवस्थेत आहे. मुखावर शांत, गंभीर व निर्विकार भाव आहेत.

### भैरव रूप –

डावीकडील मुख अघोर भैरवाचे आहे. मृत्यु व काळ या दोघांचाही संहार करणारा शिव. त्याचे कपाळ पुढे दाखवण्यात आलेले आहे. गरुडाप्रमाणे बाकदार

नाक व पिळदार मिश्या दाखवल्या आहेत. केसांच्या जटा व मुकुटावरील कवटी आणि सर्प ही मृत्यूची चिन्हेही दाखवली आहेत. ही मूर्ती कोनाड्यात असल्याने व या मूर्तीचा भैरव रूपाचा चेहरा छायेत असल्याने नैसर्गिक उग्रतेत अधिकच भर पडते.

### वामदेव–

उजवीकडील मुख वामदेवाचे आहे. वामदेव – उमारूप आहे. या मूर्तीच्या चेहऱ्यावर सौंदर्य व यौवनपूर्ण प्रसन्नता दिसते. हातात कमळ हे सजीवता व जीवनाचे प्रतीक म्हणून दाखवले आहे. त्याची केशभूषा व मुकुट यामध्ये पाने फुले व कमळे दाखवलेली आहेत.

या त्रिमूर्तीचे अर्धोन्मीलित डोळे, जाड ओठ, विविध प्रतीकांचा वापर व त्यातून भाव प्रकटीकरण हे सर्व दगडासारख्या कठीण माध्यमातून, अप्रतिम कोरीव कामातून व्यक्त केलेले आहे. हा शिल्पकलेचा सौंदर्यपूर्ण आविष्कार अतुलनीय आहे. भारतातील हे सर्वात मोठे उठावशिल्प आहे. हे शिल्प पेटीसारख्या खोल कोनाड्यात घडलेले असल्याने अथांग व अंधाऱ्या पार्श्वभूमीतून ही मूर्ती प्रकट झाल्यासारखी वाटते.

### गंगावतरण शिल्प – महाबलीपुरम

**स्थळ :** महाबलीपुरम

**कालखंड :** इ.स. ७ वे ८ वे शतक

**माध्यम :** टेकडीचा प्रचंड खडक

**उंची :** सुमारे २७ मीटर लांबी व ९ मीटर उंची

**वैशिष्ट्ये :** पल्लव शिल्पकारांच्या सर्वोत्कृष्ट कामगिरीचा नमुना म्हणजे, महाबलीपुरमच्या दक्षिणेकडील एका टेकडीमध्ये प्रचंड खडकात कोरलेले गंगावतरण हे प्रसिद्ध उगमशिल्प.

या प्रचंड खडकाच्या मध्यभागी खाच असून त्या खाचेचा फारच कौशल्याने उपयोग करून घेतलेला आहे. या खाचेमुळे खडकाचे दोन भाग झाले आहेत. गंगा स्वर्गातून पृथ्वीतलावर आली, तिचे पाणी या खाचेतून खाली पडत आहे हे दाखवण्यासाठी खडकाच्या वर कुंड बांधून त्यातील पाणी या खाचेतून सोडत असत. परंतु पाण्यामुळे शिल्प खराब होऊ नये म्हणून वर भिंत बांधून तो प्रवाह बंद केला गेला.

भगीरथाने तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न केले व त्याच्याकडून मिळालेल्या वरातून स्वर्गातील गंगा पृथ्वीवर आणली असा प्रसंग येथे शिल्पित केला आहे. खडकाच्या अरुंद खाचेत हात जोडून उभे असणारे नागराज, नागराणी आणि जलचर दिसतात. याच्या डाव्या बाजूस खडकावर दाढीमिशा वाढलेला भगीरथ हात वर करून एका पायावर उभे राहून तप करीत आहे. त्याच्यासमोर भगवान शंकर प्रसन्न होऊन उभे आहेत असे दृश्य कोरले आहे. हा प्रसंग पाहण्यासाठी दोन्ही बाजूला आकाशगामी गंधर्व, अप्सरा, देवदेवता आहेत आणि त्यांची तोंडे मधल्या खाचेकडे आहेत. याशिवाय वेगवेगळे प्राणी व स्त्री पुरुषही जमले आहेत. त्यासाठी पाच- सहा फुटी आकाराच्या शंभराहून अधिक मानवी आकृत्या कोरलेल्या आहेत. खाचेच्या उजव्या बाजूस



गंगावतरण शिल्प

हत्तीचे मूळ आकारातील एक कुटुंब दाखवले आहे. दुसऱ्या बाजूस अशाच प्रकारे बैल, गाय, हरीण यांचे चित्रण केले आहे. खाचेजवळ एक मांजर दोन पायावर उभे राहून तपश्चर्या करताना दाखवली आहे. गुहेत बसलेले वाघ-सिंहही कोरले आहेत. हरणांच्या समूहातील एक हरीण खुराने नाक खाजवतानाही कोरला आहे. शिल्पकाराची सूक्ष्म निरीक्षणशक्ती यातून प्रत्ययास येते. खडकांच्या खालच्या बाजूला अनेक लोक गंगेला हात जोडून वंदन करीत आहेत तर काही गंगाजल भरून घेत आहे असे शिल्पित केलेले आहे.

प्राचीन भारतीय शिलापद्धतीप्रमाणे समूहातील आकृत्यांचे अंशाच्छादन न करता त्या एकावर एक रांग काढून दाखवल्या आहेत. काहींच्या मते या शिल्पात अर्जुन पाशुपत अस्त्रासाठी तपश्चर्या करतो आहे. असा प्रसंग शिल्पित केला आहे. म्हणून त्याला अर्जुनाची तपश्चर्या असेही नाव पडले आहे.

या शिल्पाच्या बाजूला एका स्वतंत्र लहान दगडात एक माकडाने शिल्प कोरलेले आहे.



**गंगावतरण शिल्प**

**नटराज – तंजावर**

**स्थळ :** तंजावर (सध्या झुरिच येथील राईट बर्ग म्युझियम.)

**कालखंड :** चोलवंश इ.स. ११ वे १२ वे शतक

**माध्यम :** ब्रॉंझ.

**उंची :** ८२ सेंमी (३२.२५इंच)

**वैशिष्ट्ये :** ही प्रसिद्ध व नाट्यपूर्ण मूर्ती, नृत्याची अधिष्ठात्री देवता म्हणून शिवाचे नटराज रूप समजले जाते. तांडवनृत्यात मग्न असलेल्या नटराजाचे रूप मोहक व लयबद्ध आहे. सुंदर व प्रमाणबद्ध शरीररचना, मुर्तीचा नृत्यातील जोरदार आवेश, अंग प्रत्यंगाचा रेखीवपणा, बोटांचे लयपूर्ण शिल्पांकन या सर्वांमधील लयदार रेषांमुळे शिल्पामध्ये एक प्रकारचा आवेश, सजीवता व विलक्षण चैतन्य निर्माण झालेले आहे. तोल साधण्याचे अप्रतिम



**नटराज**

कौशल्य, शरीराचे नैसर्गिक सौंदर्य या वैशिष्ट्यांमुळे तांडवनृत्य करणाऱ्या शिवाचे शिल्प अवर्णनीय वाटते.

या चतुर्भुज मूर्तीच्या एका हातात कडकडणारे डमरू, दुसऱ्या हातात धगधगणारी अग्नी, तिसरा हात अभयदर्शक मुद्रा व चौथा हात क्रियादर्शक आहे. उजव्या पायाने अज्ञानरूपी राक्षसाला चिरडले आहे. डावा पाय नृत्याच्या आविर्भावात वर उचलेला आहे. भोवताली अग्नीज्वालांचे वलय आहे. नटराजाचे शरीर, वस्त्र, केशकलाप, अंगावरील सर्प, मोजके अलंकार या सर्वांच्या लयदार शिल्पांकनामुळे हे शिल्प आकर्षक वाटते. मोहक देहयष्टी, चापल्य, नृत्याचा पवित्रा, शिल्पाचा तोल, एकंदर मांडणी यामुळे हे शिल्प अद्भुत वाटते. अशा प्रकारची नटराजाची अनेक शिल्पे आढळतात. परंतु तंजावरचे शिल्प अद्वितीय आहे.

## २. भारतीय शिल्पकार

### विनायक पांडुरंग करमरकर

(जन्म : २ ऑक्टोबर १८९१, मृत्यू-१३ जून १९६७)



विनायक पांडुरंग करमरकर

हे आधुनिक काळातील प्रसिद्ध शिल्पकार आहेत. त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात कुलाबा जिल्ह्यातील सासवणे गावी झाला. लहानपणी त्यांना मातीच्या मूर्ती, गणपती, इतर देवदेवतांच्या मूर्ती, खेळणी तयार करण्याची आवड होती. अलिबागचे कलेक्टर ऑटो रॉथफील्ड यांना त्यांच्या कलागुणांची खात्री पडली. त्यांनी त्यांना जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई येथे कलाशिक्षण घेण्यास पाठवले. तिथे त्यांनी शिल्प कलेतील प्रथम क्रमांकाने पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी रॉयल ॲकॅडमी ऑफ लंडन येथे शिल्पकलेचे उच्च शिक्षण घेतले.



छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा, पुणे



शिल्प- हमजोली

इ.स. १९१६ पासून कलकत्ता, बडांदेव व अखेरीस मुंबई येथे त्यांनी शिल्प व्यवसाय केला.

भारतातील वास्तववादी शिल्पशैलीत त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. इ.स.१९२४ मध्ये ईडन गार्डन सोसायटी ऑफ आर्टिस्टच्या वतीने आयोजित प्रदर्शनात 'शंखध्वनी' ही कलाकृती प्रदर्शित केली. पुण्यातील अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा ब्रांझमधील साडेतेरा फुट उंचीचा भव्य पुतळा त्यांनी घडवला. भारतातील हा पहिलाच ब्रॉँझमधील भव्य पुतळा होय. ते अखिल भारतीय शिल्पकार संघाचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांनी मत्स्यगंधा, हमजोली, अनेक व्यक्तिशिल्पे, धीवरकन्या, कोकरू, भक्ती, विसावा, गवळण, प्रवासी, तल्लीनता, ग्रीष्म ऋतु इत्यादी अनेक शिल्पे विविध माध्यमांत तयार केली. शिल्पातील लय, सजीवता व सादृश्यता ही त्यांच्या शिल्पाची वैशिष्ट्ये आहेत. सन १९६८ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्‍मश्री' किताब देऊन सन्मानित केले.

### गणपतराव म्हात्रे

(जन्म : १० मार्च १८७६, मृत्यू-३० एप्रिल १९४७)

या थोर शिल्पकाराचा जन्म पुणे येथे झाला. गणपतराव यांच्यातील कलागुण त्यांना त्यांच्या मातोश्रींकडून लाभले असावेत. त्यांच्या मातोश्री मातीची सुंदर खेळणी व बाहुल्या तयार करत. मातीशी खेळता खेळता त्यांचा संबंध गिरगावातील प्रसिद्ध



गणपतराव म्हात्रे

गणेश मूर्तीकार गोखले यांच्याशी आला. गोखले यांच्या सान्निध्यात गणपतरावांना हळूहळू शिल्पकलेची गोडी लागली व थोड्याच अवधीत ते स्वतः उत्तम मूर्तीकार बनले. तथापि केवळ गणपतीच्या मूर्ती करीत बसणे त्यांना पसंत नव्हते. म्हणून शिल्पकलेचे पद्धतशीर शिक्षण घेण्याकरता ते मुंबईच्या प्रख्यात कलाशाळेत, जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल झाले.

१८९१ साली शिल्पकलेतील अखेरची परीक्षा ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्या वेळचे प्राचार्य ग्रिफिथ्स यांनी म्हात्रे यांना कलाशाळेत शिक्षक होण्यासाठी पाचारण केले. पण ते त्यांनी सविनय नाकारले. गिरगावामध्ये मंगलवाडीत स्वतःचा स्टुडिओ स्थापन केला व स्वतंत्रपणे कामास सुरुवात केली.

म्हात्रे हे कदाचित पहिलेच भारतीय शिल्पकार असावेत की, ज्यांच्या कलाकृती आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात मानाने झळकल्या. १९०२ पासून त्यांच्या यशाची कमान चढतच गेली व बऱ्याच काळपर्यंत त्यांना प्रतिस्पर्धी निर्माण झाला नाही. १९०२ साली त्यांच्या पार्वती – शबरी या शिल्पाकृतीस दिल्ली दरबार प्रदर्शनात सुवर्णपदक मिळाले. त्यापाठोपाठ त्यांच्या सरस्वती या शिल्पाकृतीचा फ्रान्समध्ये जागतिक कला प्रदर्शनात मोठा गौरव करण्यात आला. लंडनमधील मॅगझिन ऑफ आर्ट या मासिकाने या शिल्पाकृतीवर स्तुतीसुमने उधळली आहेत. अमेरिकेत शिकागो येथील जागतिक कलाप्रदर्शनातही त्यांच्या कलाकृतीस मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.



शिल्प–मंदिर पथगामिनी(मंदिराकडे)

'To The Temple' किंवा 'मंदिर पथगामिनी' हे म्हात्रे यांचे शिल्प एक अलौकिक व परिपूर्ण कलाकृती आहे. एक मध्यम बांध्याची, सुंदर सौष्ठव असलेली नवपरिणीता या शिल्पात साकारलेली आहे. नटूनथटून, सालंकृत अशी ही शालीन स्त्री एका हातात पूजेचे साहित्य व दुसऱ्या हातात फुलपात्र घेऊन डौलदारपणे मंदिराकडे जात आहे. तिच्या चेहऱ्यावरील निरागस भाव पाहणाऱ्याला जागच्या जागी खिळवून टाकेल, असा आहे. ही एकच शिल्पाकृती पाहिली तरी, त्यावरून म्हात्रे यांच्या श्रेष्ठ कलागुणांचा प्रत्यय येतो.

भारतीय शिल्पकलेच्या क्षेत्रात रावबहादूर म्हात्रे हे एक अजरामर असे नाव आहे. पाश्चात्य कलेच्या इतिहासात ज्याप्रमाणे मायकेल अँजेलो या शिल्पकाराचे विशेष असे स्थान आहे. त्याचप्रमाणे भारतीय कलेच्या इतिहासात म्हात्रे यांना स्थान आहे आणि योगायोग असा की, या दोन्हीही थोर व प्रतिभावंत कलाकारांनी आपल्या श्रेष्ठ शिल्पाकृती आपल्या वयाचे पंचविसावे वर्ष ओलांडण्यापूर्वीच घडवल्या. कलेच्या इतिहासातील 'पिएता' नावाची अमर कलाकृती मायकेल अँजेलो याने वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी घडवली तर 'मंदिर पथगामिनी' ही शिल्पाकृती म्हात्रे यांनी अशाच कोवळ्या वयात पूर्ण केली. या एकाच शिल्पाकृतीने म्हात्रे अगदी लहान वयात श्रेष्ठ शिल्पकार बनले. त्या काळातील गाजलेले चित्रकार राजा रविवर्मा हेही शिल्पाकृती पाहून

कौतुक केले. त्यांनी असे म्हटल्याचे सांगतात की, इतकी सुंदर शिल्पाकृती या पूर्वी झाली नाही व पुढे होईल की नाही याविषयी शंका वाटते .

या शिल्पाकृतीने भारतीय शिल्पकलेच्या क्षेत्रात फार मोठा इतिहास घडवला असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. २६ नोव्हेंबर १८९४ च्या बॉम्बे गॅझेटमध्ये या शिल्पाकृतीचा गौरव केला आहे. यावरून या शिल्पाकृतीची श्रेष्ठता ध्यानी येते. त्यानंतरही या शिल्पाकृतीने अनेक विक्रम निर्माण केले. १८९६ साली या शिल्पाकृतीसाठी म्हात्रे यांना रौप्यपदक देण्यात आले. १९०४ साली इंडियन नॅशनल काँग्रेसच्या औद्योगिक प्रदर्शनात याच शिल्पाकृतीस सुवर्णपदक मिळाले. एवढेच नव्हे तर अनेक पाश्चात्य वृत्तपत्रांतून या शिल्पाकृतीची मुक्त कंठाने स्तुती करण्यात आली. मॅगझिन ऑफ आर्ट, लंडन या मासिकातही म्हात्रे यांचा To The Temple ची नोंद आढळते.

अशा या जागतिक कीर्ती मिळवणाऱ्या शिल्पकाराकडे साहजिकच भारतीय संस्थानिकांचे लक्ष वेधले. अनेक संस्थानिकांची शिल्पाकृतींची कामे एका मागोमाग म्हात्रे यांच्याकडे येऊ लागली. विशेषतः भव्य आकाराच्या ब्राँझच्या शिल्पाकृती बनवण्याची एक नवी परंपरा म्हात्रे यांनी निर्माण केली. कोल्हापूरचे राजपुत्र शिवाजीराव यांचा भव्य अश्वारूढ असा ब्रॉन्झचा पुतळा प्रथमतः भारतात ओतवण्यात आला. त्यानंतर बडोदे, ग्वाल्हेर, रतलाम आदी संस्थानांत छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ पुतळे म्हात्रे यांनी आपल्या स्टुडिओत घडवले. मुंबईतील न्यायमूर्ती रानडे यांचा, राणी व्हिक्टोरिया यांचा अहमदाबाद येथील पुतळा, म्हैसूरच्या महाराजांचा तसेच ग्वाल्हेर संस्थानातील राजे आदींचे पुतळेही त्यांनी तयार केले. राणा प्रतापसिंह, नाना फडणीस, राणा रणजितसिंह यांचे प्लॅस्टरचे भव्य पुतळेही त्यांच्याच हातून घडले आहेत. डॉ. तैमूलजी नरिमन, नसरवानजी वाडिया, एन. जे. रुस्तमजी वगैरेंचे संगमरवरी अर्धपुतळे त्याचप्रमाणे लॉर्ड सिडनेहम, पंचम जॉर्ज आदी पाश्चात्य व्यक्तींचे पुतळेही त्यांनी तयार केले आहेत. सत्यनारायण, पार्वती, दत्तात्रय आदी देवादिकांच्या मूर्तीही त्यांच्याकडून तयार करून घेण्यात आलेल्या आहेत. त्यांनी तयार केलेल्या पुतळ्यांची संख्या जवळजवळ दिडशेपर्यंत आहे. त्यांच्या प्रत्येक पुतळ्यातून शिल्पकलेतील काहीतरी नवीन पाहावयास मिळते.

या थोर भारतीय शिल्पकाराचे स्थान भारतीय कलेच्या इतिहासात त्यांच्या शिल्पाकृतींद्वारा अमर झाले आहे. म्हात्रे यांच्या कलाकृतींमधून अनेक कलावंतांनी स्फूर्ती घेतली आहे. केवळ शिल्पकार म्हणूनच नव्हे तर कलाक्षेत्रातील एक तज्ज्ञ म्हणून त्यांचे नाव घेता येईल. शिल्पकलेतील अनेक तंत्रे त्यांनी आत्मसात केली होती. मातीचे काम, धातूचे ओतकाम, दगडावरील खोदकाम इत्यादी अनेक माध्यमांतून म्हात्रे यांची कला प्रगट झाली आहे. त्यांची कला नयनमनोहर तर आहेच ; परंतु तितकीच शास्त्रशुद्धही आहे. म्हणूनच ती कोणत्याही काळात श्रेष्ठ ठरणारी आहे.

रावबहादूर म्हात्रे यांचे दुसरे वैशिष्ट्य असे की, त्यांनी शिल्पशास्त्रातील बऱ्याच गोष्टींचा सखोल अभ्यास केला होता. त्यांची प्रत्येक शिल्पाकृती प्रमाणबद्ध व तंत्रदृष्ट्या निर्दोष असे. पन्नास – साठ वर्षांपूर्वी त्यांनी घडवलेल्या ब्राँझच्या ओतकामाच्या मूर्ती आजही सतेज दिसतात. धातूच्या ओतकामाचा शास्त्रशुद्ध अनुभव असल्याशिवाय अशा प्रकारची सफाईदार कामे सर्वथा अशक्य आहेत. अशा चिकित्सक बुद्धीच्या या शिल्पकाराचे संशोधन अखेरपर्यंत चालू होते. ब्रिटिश राजसत्तेतसुद्धा त्यांच्या गुणांची कदर झाली व राजदरबारी १९२९ साली त्यांनी रावबहादूर असा मानाचा किताब बहाल करण्यात आला.

अशा या गुणी शिल्पकाराने सतत काम करत राहून ३० एप्रिल १९४७ रोजी जगाचा निरोप घेतला. भारतीय कलातिहासात आपले नाव अमर करून ठेवणाऱ्या या श्रेष्ठ शिल्पकाराची जन्मशताब्दी १९७६ मध्ये साजरी करण्यात आली. या गुणी शिल्पकाराच्या शिल्पाकृती नव्या कलावंतांना बऱ्याच काळापर्यंत स्फूर्ती देत राहतील यात शंका नाही.

## राम वनजी सुतार – शिल्पकार

(जन्म : १९ फेब्रुवारी १९२५)




शिक्षण – जी. डी. आर्ट, शिल्पकला, प्रथम श्रेणीत प्रथम, सुवर्णपदक, १९५३ सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई

महाराष्ट्रतील धुळे जिल्ह्यात गोंदूर या गावी राम सुतारांचा जन्म झाला. त्यांना मातीची खेळणी बनवणे, चित्रे काढणे वा लाकडी कोरीव काम करणे आवडत असे. ही बाब चाणाक्ष चित्रकला शिक्षक श्रीराम जोशींनी हेरली व त्यांना कलेकडे वळवले. मुंबईच्या जगप्रसिद्ध सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिल्पकलेला प्रवेश घेण्यापासून शिक्षण पूर्ण होईपर्यंत जोशी सरांनी त्यांना मदत केली. ते नेहमीच राम सुतारांना गुरूस्थानी राहिले. सन १९५४-५८ अशी चार वर्षे त्यांनी पुरातत्व खात्यात 'मॉडेलर' म्हणून नोकरी केली. त्या काळात त्यांनी वेरूळ अजिंठा शिल्पांच्या डागडुजीची कामे केली.

वेरूळच्या नोकरीत ते काही काळ चाळीसगावला जगप्रसिद्ध टेबलटॉप छायाचित्रकार केकी मूसांच्या सहवासात राहिले. सन १९५८ मध्ये त्यांना दिल्लीत केंद्र शासनाच्या इन्फर्मेशन ब्रॉडकास्टिंग विभागात टेक्निकल असिस्टंट म्हणून नोकरी मिळाली. दीड वर्षांतच तेथील नोकरीचा राजीनामा देऊन १९५९ पासून स्वतंत्र शिल्पकार म्हणून ते दिल्लीत छोटी मोठी कामे करू लागले. सन १९६० मध्ये राम सुतारांना मध्यप्रदेश- राजस्थान सीमेवरील चंबळ नदीवरील गांधी सागर डॅमवर ४५ फुट उंचीचे चंबळ नदीचे स्त्री रूपातील सिमेंट कॉंक्रिटमधील शिल्प घडवण्याची संधी मिळाली. या शिल्पामुळे त्यांना भरपूर प्रसिद्धी मिळाली.

गेल्या ७० वर्षांत राम सुतारांनी दगड, सिमेंट, ब्रॉंझ, फायबर अशा विविध माध्यमांत शेकडो शिल्पे साकारली. त्यात व्यक्तिशल्पे, स्मारकशिल्पे तसेच म्यूरल्स् आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, पृथ्वीराज चौहान, संत तुकाराम, संत कबीर, महाराजा रणजितसिंह, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस, विवेकानंद, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, लालबहादूर शास्त्री, पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयप्रकाश नारायण, दिनदयाल उपाध्याय, राष्ट्रपिता महात्मा गांधी अशा महनीय व्यक्तींची शिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. संसद भवन दिल्ली येथील प्रवेशद्वारासमोर पद्मासनात ध्यानस्थ अवस्थेत बसलेले १६ फुट उंचीचे महात्मा गांधी हे ब्रॉंझ शिल्प अध्यात्मिक भावमुद्रेसाठी नावाजले गेले. जगभरातील १५० हून अधिक देशात सुतारांची गांधीजींची शिल्पे पोहोचलेली आहेत. हरियाणातील ब्रम्हसरोवर कुरुक्षेत्र येथील कृष्णअर्जुन हे ६० × ३५ फुट लांबी व उंचीचे ब्रॉंझ शिल्प भव्यता आणि भावपूर्ण आविष्करणासाठी ओळखले जाते. राम सुतारांचा दिल्ली जवळील नोएडा, सेक्टर -६३ येथे स्टुडिओ व जवळच दररोज १००० किलो धातूचे कास्टिंग करण्याची क्षमता असलेली भव्य फाऊंड्री आहे. तसेच साहिबाबाद [गाझियाबाद] येथे 'आनंदवन' या नावाच्या सहा एकर प्रशस्त जागेत त्यांनी बनवलेल्या आजवरच्या सर्वच शिल्पाकृतींच्या प्रतिकृतींचे कलात्मक शिल्पोद्यान उभारलेले आहे.

त्यांच्या कलेचा गौरव म्हणून शासनाने पद्मश्री (१९९९), पद्मभूषण (२०१६), टागोर अवॉर्ड (२०१६) तसेच बॉम्बे आर्ट सोसायटीचा (२०१०) रूपधर जीवगौरव पुरस्कार देऊन केलेला आहे. त्यांच्या ''स्टॅच्यू ऑफ युनिटी'' या जगप्रसिद्ध व्यक्तिशिल्पाचे रसग्रहण पुढीलप्रमाणे,



**स्टॅच्यू ऑफ युनिटी**

**प्रकार –** व्यक्तिशिल्प

**उंची –** १८२ मी (५९७ फुट)

**आधारासहीत उंची** – २४० मी. (७९० फुट)

**माध्यम –** लोह, काँक्रिट व पितळ

**निर्मिती वर्ष –** इ.स. २०१३– २०१८

**स्थळ –** नर्मदा सरोवर, गुजराथ

**कलात्मक वैशिष्ट्ये –** स्वातंत्र्यलढ्यातील महान लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे हे पूर्णाकृती शिल्प आहे. जगातील सर्वात उंच शिल्प म्हणून ते ओळखले जाते. एकतेचे प्रतीक म्हणून या भव्यदिव्य शिल्पाची निर्मिती प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांनी केली आहे. भारतातील सहा लाख ग्रामीण लोकांकडून ५००० मेट्रिक टन लोखंड संग्रहीत करून त्याचा उपयोग या शिल्पात केलेला आहे. या शिल्पाचा मुख्य सांगाडा लोखंड व त्यावर पितळेचे लेपन आणि खालील चबुतरा व काही बाबींसाठी काँक्रिट वापरले आहे. या संपूर्ण शिल्पाला स्मारकाचे स्वरूप दिले आहे. त्यात बगिचा, सरदार पटेलांचे कार्य दर्शवणारे प्रशस्त संग्रहालय आहे. येथे दररोज संध्याकाळी लेजर शोचे आयोजन केले जाते. त्यातून देशाची एकता, अखंडता व देशप्रेम यांचा संदेश दिला जातो.

**उपक्रम : आपल्या परिसरातील शिल्पकाराची माहिती फोटोसह लिहा.**

# माझा अभ्यास

## 'भारतीय शिल्पकला'

**प्र. १ सविस्तर टिपा लिहा.**

१. घारापुरी येथील त्रिमूर्ती

२. पल्लव शिल्पकलेचा नमुना असलेले गंगावतरण शिल्प

३. चोलकालीन नटराज मूर्तीची आकर्षक रचना

४. गंगावतरण शिल्पाची मांडणी.

**प्र. २ रिकाम्या जागा भरा.**

१ पश्चिम भारतातील गुहा मंदिराचा शेवटचा उत्कृष्ट नमुना म्हणजे ........... हे शिल्प होय.


२. त्रिमूर्ती ...... , ....... व .......... ही तीन कार्ये सूचित करते.

३ नटराजाची मूर्ती सध्या ........... या ठिकाणी आहे.


४. गंगावतरण शिल्प .......... येथे आहे.

**प्र. ३ आकृतिबंध पूर्ण करा.**

१.




२.




## 'भारतीय शिल्पकार'

**प्र.१ योग्य जोड्या जुळवा**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. वि. पां. करमरकर | स्टॅच्यू ऑफ युनिटी |
| २. रावबहादूर म्हात्रे | मत्स्यगंधा, हमजोली |
| ३. राम वनजी सुतार | मंदिर पथगामिनी |

**प्र. २ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. छत्रपती शिवाजी महाराजांचा ब्रांझमधील भारतातील पहिलाच भव्य पुतळा घडवणाऱ्या प्रसिद्ध शिल्पकाराचे नाव काय?

२. चंबळ नदीचे स्त्री रुपातील शिल्प कोणत्या माध्यमातील आहे?

३. इंग्रज सरकारने रावबहादूर ही पदवी कोणत्या महान शिल्पकाराला बहाल केली?

४. मंदिर पथगामिनी हे शिल्प कोणत्या संग्रहालयात पहावयास मिळते?

५. प्रसिद्ध शिल्पकार श्री. करमरकर यांच्या शिल्पाची तीन वैशिष्ट्ये कोणती?

**प्र. ३ टिपा द्या.**

१. वि.पा. करमरकर ३. राम वनजी सुतार

२. रावबहादूर म्हात्रे

**प्र.४. रसग्रहणात्मक सविस्तर टिपा लिहा.**

मंदिर पथगामिनी (मंदिराकडे)

**प्र. ५ दोन प्रसिद्ध शिल्पांची नावे लिहा.**

१. वि.पा. करमरकर

१. .......... २. ..........

२. रावबहादूर म्हात्रे

१ ............ २. ..........

३. राम वनजी सुतार

१. .......... २. ..........

# ३ भारतीय चित्रकला

## १. लघुचित्र शैली

### राजस्थानी लघुचित्र शैली

इ.स. १५ व १६ व्या शतकात राजस्थानातील जोधपूर, उदयपूर, बुंदी, कोटा, बिकानेर इत्यादी लहान राजपूत राज्यांमधून एका वैशिष्ट्यपूर्ण चित्रशैलीचा प्रारंभ झाला. ती शैली राजस्थानी शैली या नावाने प्रसिद्ध झाली. राजपूत राजे आपल्या दरबारी चित्रकार ठेवत असत. त्यांच्याकडून आपल्या आवडीनुसार चित्र निर्मिती करून घेत. त्यांचेच अनुकरण करून पुढे राज्याचे प्रधान, सरदार व राज्यांतील श्रीमंत लोक यांनीही आपल्या पदरी चित्रकार ठेवले. या पद्धतीमुळे या शैलीमध्ये दोन प्रकारची चित्र निर्मिती झाली.

(१) राजदरबारी चित्रकारांची उच्च दर्जाची चित्रे

(२) सामान्य चित्रकारांची कमी दर्जाची चित्रे. यातील दरबारी चित्रकारांना सर्व सुखसोयी होत्या, त्यांना इतर राज्यांकडून भेट रूपाने आलेले उत्कृष्ट चित्र नमुने बघावयास मिळत असत. त्यामुळे या चित्रांचा दर्जा व त्यात सफाईदारपणा अधिक आहे. त्याउलट सामान्य चित्रकारांची चित्रे कमी दर्जाची असून त्यात साधे सरळ चित्रण व लोककलेचे स्वरूप होते. कारण या चित्रकारांना फारशा सुखसोयी नव्हत्या. या दोन्ही प्रकारांपैकी राजदरबारी चित्रे मुसलमानी आक्रमण आणि आपापसातील युद्धांमुळे नष्ट झाली. परिणामी राजस्थानी शैलीतील आज शिल्लक राहिलेली चित्रे ही दुसऱ्या प्रकारातील म्हणजेच सामान्य दर्जाची आहेत.

राजस्थानात याच काळात धार्मिक व सामाजिक परिवर्तन झाले. त्यात कबीर, तुलसीदास, चैतन्य, मीराबाई, सूरदास इत्यादी अनेक संत होऊन गेले. त्यांच्या भक्तिवाङ्मयाचा प्रसार राजस्थानात झाला. राधा-कृष्ण आणि वैष्णव भक्तिसंप्रदाय यांवर अनेक काव्यसंग्रह लिहिले गेले. त्या काव्यसंग्रहांच्या सजावटीसाठी प्रसंगानुसार अशी चित्रनिर्मिती करण्यात आली. रामायण, महाभारत, गीतगोविंद, भागवत पुराण इत्यादी ग्रंथांबरोबर भारतीय संगीतावर आधारित 'रागमाला' चित्रे, सर्व ऋतुंचे महत्त्व विशद करणारे 'ऋतुचक्र' ही चित्रमाला, बारा महिन्यांवर आधारित 'बारामास' चित्रे, अशा विविध विषयांवर या शैलीत चित्रनिर्मिती झाली. या चित्रांमध्ये तत्कालीन लोकजीवन, धार्मिक रूढी व परंपरा यांचे प्रतिबिंब पहावयास मिळते. राजस्थानी चित्रशैलीत काव्यातील कोमलता, प्रतिमा व कल्पना-विलास यांचे रम्य व मनोवेधक दर्शन घडते. या शैलीत शुद्ध व तेजस्वी जलरंगांचा वापर आढळतो. मुख्य विषयाची भिन्न भिन्न पातळीवर गटवार विभागणी करून मांडणी केलेली आढळते. गडद रंगाच्या पार्श्वभूमीवर प्रवाही व जोरदार रेखांकनाद्वारे मानवाकृती व त्यांच्या लयबद्ध हालचालींचे प्रभावी चित्रण केलेले आहे. स्त्री-पुरुषांच्या आकृत्या काहीशा ठेंगण्या असल्या तरी मोहक व सुंदर आहेत. विशाल मत्स्याकृती डोळे, उंच कपाळ, धारदार नाजूक नाक, लांब हात, लयबद्ध व नाजूक हालचाली व त्यातून व्यक्त होणारा भावनेचा उत्कृष्ट आविष्कार उल्लेखनीय आहे. या चित्रांमधून राजस्थानातील सुखी व समृद्ध जीवन बघावयास मिळते.

### राजस्थानी शैलीची वैशिष्ट्ये

राजपूत चित्रशैलीत काव्यातील कोमलता व पुराणातील धार्मिकता दिसून येते. टवटवीत रंग व ओघवती जोमदार रेषा हे या शैलीचे वैशिष्ट्य आहे. या चित्रशैलीतील चित्रे मुख्यतः आनंददायक वाटतात.

समृद्धी हे हिचे वैशिष्ट्य. कमळांनी भरलेली सरोवरे, काळ्या आकाश मेघांना उधळून टाकणाऱ्या सर्पाकृती विद्युतरेखा, पक्षी आणि फुलाफळांनी बहरलेले बगीचे, हरणे, मोर आणि बगळ्यांच्या रांगा, दीपमाला, दासदासी आणि राजपूत शैलीतील दुर्ग, प्रासाद मंदिरे, सामान्य घरातील चौक, पडव्या असे समृद्ध जीवन या चित्रांतून व्यक्त झाले आहे. राजस्थानी स्त्रियांच्या रंगीबेरंगी पोषाखांनी ही चित्रे नटलेली आहेत.

त्यांचे विशाल नेत्र, अजानबाहु, नारी सौंदर्य यांनी ती नटली आहेत. रामायण, महाभारत, मतिराम केशव, देवबिहारी, पद्मावत आणि मीरेचे कवन यातील काव्यकल्पना, रागरागिण्या, ऋतुवर्णन आणि बारामास या सर्व काव्य विषयांना राजपूत चित्रकारांनी चित्रस्वरूप दिले आहे.



राजस्थानी शैली : अश्वारुढ योद्धा

## मोगल लघुचित्र शैली

### पार्श्वभूमी

मोगलांच्या राजसत्तेमुळे भारतीय चित्रकलेत एक नवे पर्व सुरू झाले. मोगल राजांनी भारतात प्रवेश करताना इराणमधील कलावंत बरोबर आणले होते. या इराणी शैलीचा भारतीय कलेवर परिणाम होऊन मोगल चित्र शैली निर्माण झाली. मोगल सम्राटापैकी बाबर व त्याचा मुलगा हुमायून या दोन्ही सम्राटांना चित्रकलेची आवड होती. पण राज्य स्थिर करण्याच्या उलाढालीत चित्रकलेच्या विकासाकडे त्यांना लक्ष पुरवता आले नाही. हुमायूनचा मुलगा अकबर याच्या कारकिर्दीत मात्र चित्रकलेच्या विकासाला खरा आरंभ झाला.



अकबरकालीन चित्रकला

### अकबरकालीन चित्रकला (इ.स. १५५६ ते इ.स. १६०५)

अकबराने मोगल चित्रकलेचा पाया घातला. तो उदारमतवादी व कलाप्रेमी राजा होता. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमातीतील चित्रकारांना त्याने आपल्या दरबारात आश्रय दिला. शंभराहून अधिक चित्रकार त्याच्या दरबारी होते.

ते निसर्ग चित्रणाच्या बाबतीत प्रवीण होते. इराणी चित्रकार बाह्य सौंदर्याचे चित्रीकरण करण्यात श्रेष्ठ होते, तर भारतातील चित्रकार अंतःर्गत सौंदर्याचे दर्शन घडवण्यात श्रेष्ठ होते. इराणी चित्रशैलीत उत्तम भावनाविष्कार होता. या दोन्हीचा मिलाफ मोगल शैलीत झाला.

### ग्रंथसजावट

अकबराच्या काळात सचित्र ग्रंथ आणि व्यक्तिचित्रे निर्माण झाली. सचित्र ग्रंथनिर्मितीच्या बाबतीत इराणी चित्रकार अधिक कुशल होते. एकाच ग्रंथावर तीन चित्रकार काम करीत. एक लिखाण लिही, दुसरा चित्र काढी, तर तिसरा रंगकाम करी. त्यामुळे अक्षरलेखन, चित्रांची मांडणी अणि रंगसंगती तिन्ही बाबतीत इराणी सचित्र ग्रंथाचा दर्जा उच्च प्रतीचा असे. अकबराच्या ग्रंथालयात चोवीस हजारांहून अधिक हस्तलिखित ग्रंथ चित्रबद्ध करण्यात आले होते. हिंदूंच्या अनेक धार्मिक ग्रंथांचाही त्यात समावेश होता. शाहनामा, अकबरनामा, राज्यनामा (महाभारताचा अनुवाद), अयारदानिश (पंचतंत्राचा अनुवाद), हरिवंश, योग वासिष्ठ्य, कथासरितसागर वगैरे ग्रंथ या संग्रहात होते.

### व्यक्तिचित्रे

अकबराने व्यक्तिचित्रे काढण्यास प्रोत्साहन दिले. व्यक्तिचित्रणासाठी तो स्वतः चित्रकारापुढे बसत असे व दरबारातील इतर व्यक्तींनाही बसावयास लावी. एखाद्या व्यक्तीचे हुबेहूब साम्य आणण्याचा प्रयत्न यामुळे चित्रकार करू लागले. त्यामुळे वास्तववादी चित्रणाचा त्यांच्या अभ्यास वाढला. अकबराच्या काळात पाश्चिमात्य देशातील चित्रकारांनी काढलेली चित्रे दरबारात घेऊन येत व त्या चित्रांच्या परिणामामुळे छायाप्रकाशाचा थोडासा आभास व सूक्ष्मछटा दाखवण्याचा प्रयत्न मोगलकालीन कलावंत करू लागले.



अकबरकालीन व्यक्तिचित्र

अकबराच्या काळात अनेक चित्रांवर दोन चित्रकारांचे चित्रकाम दिसून येते. त्यातील एक चित्रकार तऱ्हा म्हणजे रेखाटन करी व दुसरा अंमल म्हणजे रंगकाम करी. अकबराच्या दरबारात अनेक चित्रकार प्रसिद्ध पावले होते. त्यातील काहींची नावे पुढीलप्रमाणे आहेत. दासवत, बसवत, केशव, लाल, मुकुंद, मुकीन, फरुखबेग मार्थी वगैरे चित्रकारांची नावे अकबरकालीन चित्रांच्या मागे कारकुनांनी लिहून ठेवलेली आढळतात. त्यावरून एकाच चित्रावर अनेक चित्रकार काम करीत असत, हे सिद्ध झाले आहे.

### जहांगीरकालीन चित्रकला
### (इ.स. १६०५ ते इ.स. १६२७)

### निसर्गाचे चित्रीकरण

अकबरापेक्षा जहांगीराच्या काळात मोगली शैली अधिक बहरास आली. जहांगीरइतका पैसा चित्रकलेवर कोणी खर्च केला नसेल. अकबर बादशहा अध्यात्मप्रेमी होता, जहांगीर बादशहा सौंदर्यप्रेमी. अकबराच्या काळात ग्रंथसजावटीकरता चित्रण अधिक झाले तर जहांगीरच्या काळात चित्रविषयासाठी स्वतंत्रपणे चित्रे निर्माण होऊ लागली.



जहांगीरकालीन चित्रकला



जहांगीरकालीन चित्रकला

पशुपक्षी आणि फुलांची स्वतंत्र चित्रे जहांगीराने काढून घेतली. केवळ गुलाबपुष्पाच्या दीडशेहून अधिक जाती जहांगीरच्या चित्रसंग्रहात चित्रित झालेल्या आढळतात. जहांगीरने तयार करून घेतलेला फुलांचा संग्रह वनस्पतीशास्त्राचा एक अमूल्य ठेवा मानला जातो. जहांगीर शिकारीस निघाला अगर युद्धासाठी निघाला तरी चित्रकारांचा एक ताफा तो बरोबर घेऊन जाई आणि निसर्गात आढळणारा कोणताही वैशिष्ट्यपूर्ण प्राणी अगर फूल तो आपल्या चित्रकारांकडून चित्रित करून घेई. नाना तऱ्हेच्या पशुपक्ष्यांची आणि फुलांची चित्रे रंगवून घेऊन निसर्ग सौंदर्याचा जणू खजिनाच जहांगीरने चित्रात जतन करून ठेवला. केवळ निसर्ग सौंदर्य हाच या चित्रांचा विषय असल्याने भारतीय चित्रकलेत निसर्गाने सूक्ष्मदर्शन घडू लागले व त्यानंतरच्या कांग्रा शैलीवर त्याचा परिणाम झाला.

परदेशातील अनेक चित्रकारांची चित्रे जहांगीर विकत घेत असे. त्यांच्या अभ्यासानेही मोगल चित्रकलेत सफाईदारपणा व वास्तवता यांचा विकास घडला. अबुलहसन, लाल, सावळा, मुहंमद नादिर, फरुखबेग, महंमद मुरार वगैरे निपुण चित्रकार जहांगीरच्या दरबारात होते. अबुल हसन हा त्यांचा सर्वात आवडता चित्रकार होता व 'नादिरउलजमा' म्हणजे या युगाचे आश्चर्य अशी जहांगीरने त्यास पदवी दिली होती.

जहांगीरनंतर गादीवर आलेल्या शहाजहान याने चित्रकलेपेक्षा वास्तुकलेला अधिक आश्रय दिला व त्यानंतर गादीवर बसलेला औरंगजेब हा कलेचा द्‌वेष्टा होता. त्यामुळे जहांगीरच्या कारकीर्दीनंतर मोगल चित्रकलेचा ऱ्हास झाला.

### मोगल व राजपूत चित्रकलेची तुलना

मोगल शैलीचा मूळ आधार इराणी शैलीत होता व इराणी शैलीचा भारतीय शैलीशी संयोग होऊन मोगल शैली जन्माला आली. राजपूत शैली मात्र शुद्‌ध भारतीय स्वरूपाची होती. या दोन्ही शैलींचा विकास एकाच काळात झाला. मात्र राजपूत शैलीतील विषय आणि प्रतीके खास भारतीय आहेत. मोगल शैलीतील चित्रे राजविलास व राजदरबार दाखवणारी आहेत. उलट राजपूत शैलीतील चित्रे कल्पनाप्रधान आणि तत्कालीन लोककल्पना दाखवणारी आहेत. मोगल कलावंतांनी राजविलास चित्रित केले तर राजपूत कलावंतांनी लोकजीवन रंगवले. मोगलशैलीत राजउद्‌यान, राजपरिवार, राजदरबार, युद्‌ध यांची दृश्ये दिसतात. राजपूत शैलीत लोककथा, धार्मिक रितीरिवाज, वस्त्र बनवणारा विणकर, वस्त्र रंगवणारा रंगारी, रात्री



चित्र : मोगलशैली



चित्र : मोगलशैली

शेकोट्यांजवळ बसलेले शेतकरी असेच विषय चितारले गेले. राजविलासापेक्षा कृष्णलीलातच ते रंगले. मोगल चित्रकलेतील आकार एकमेकांपासून अलग वाटतात. पण राजपूत कलेत एक प्रकारची गती आणि ओघ यामध्ये हे आकार गुंतल्यासारखे भासतात. मोगल चित्रशैलीचा आरंभ छोट्या चित्रांनी झाला तर राजपूत



चित्र : राजपूत शैली

चित्रशैलीचा आरंभ भित्तीचित्रांनी झाला. मुघल शैलीत कलमाचा बारकावा आणि रंगछटांची नाजूकता अधिक होती. उलट राजपूत शैलीत रंगरेषांचा जोमदारपणा अधिक भासतो. राजपूत चित्रशैलीवर तुळशीदास, सुरदास आणि मीरा या संतकवींच्या काव्यांचा मोठा परिणाम दिसून येतो. राजपूत चित्रकारांची नावे चित्रावर आहेत. राजपूत चित्रे उत्तर भारत, राजस्थान, पंजाब,



चित्र : राजपूत शैली

हिमाचल प्रदेश इत्यादी शहरांपुरतीच मर्यादित राहिलेली दिसतात. राजपूत चित्रे अनेकदा भिंतीवर काढलेली दिसतात. तशी मोगलचित्रे दिसत नाही.

### पहाडी लघुचित्र शैली (कांग्रा चित्रशैली)

#### हिमालयाच्या कुशीत फुललेली कलापुष्पे :

औरंगजेब बादशाह धर्माचा कडवा अनुयायी होता. त्याला कलेची रुची नव्हती. त्याने चित्रालये बंद केली आणि चित्रकारांना घालवून दिले. बिहार, बंगाल, राजपुताना, हिमालयाच्या पहाडातील राज्ये अशा विविध राजांच्या आश्रयाला हे चित्रकार निघून गेले. त्यातील काही चित्रकार हिमालयाच्या पहाडातील राजपूत राजांच्या आश्रयाला गेले. त्या चित्रकारांनी निर्माण केलेली कला, पहाडी कला या नावाने ओळखली जाते. मोगल दरबारातील कुंद वातावरणातून हिमालयातील स्वच्छ आणि निरोगी हवेत कला येऊन पोहोचली. मोगल दरबारातील कलावंतांना राजाच्या खुशामतीसाठी चित्रे काढावी लागत. पण हे बंधन पहाडी कलेत सुटले.

अकराव्या शतकात वैष्णव धर्माचा मोठा प्रसार झाला. कवी जयदेव चैतन्य, सूरदास, केशवदास, मीराबाई या सर्व प्रतिभासंपन्न कवींनी विष्णूभक्तीचे गुणगान केले. पहाडी कलेवर या काव्याचा मोठा परिणम दिसून येतो. पहाडी चित्रकलेत कृष्णलीलेवर आधारित अनेक चित्रे काढलेली दिसतात. जयदेवाचे गीतगोविंद, बिहारीचे बिहारी सतसई, भागवत पुराण, रामायण, महाभारत इत्यादी विषयावर चित्रे आढळतात. या

व्यतिरिक्त संगीतातील रागरागिण्या व ऋतू या विषयांवर काढलेली चित्रे आढळतात.

सर्व चित्रे लघु आकाराची आहेत. केवळ राजदराबारातच ही चित्रे राहिली नाहीत तर सामान्य माणसाच्या घरातून ही चित्रे गेली. आज अस्तित्वात असलेल्या पहाडी चित्रांची संख्या पन्नास हजारांच्या घरात आहे. पहाडी चित्रकारांच्या चित्रशाळा होत्या व गुरुकुलांच्या व्यवस्थेप्रमाणे तेथे शिकवण्याचे वर्ग चालत. एका रेखाटनावरून अनेक चित्रे तयार केली जात. मूळ रेखाटन हरणाच्या चामड्यांवर काढलेले असे व त्यावर रंगांची नावे लिहिलेली असत. फुले, फळे यांपासून चित्रकार स्वतः रंग तयार करत. हातकागद तयार केला जाई व तो 'सियालकोटी' या नावाने प्रसिद्ध असे. हा कागद शुभ्र पांढरा नसे; तो फिकट बदामी रंगाचा असे. प्रथमतः तांबड्या रंगाने रेखाकृती काढली जाई; नंतर संपूर्ण कागदावर पांढरा रंग देऊन किंवा कागद घोटून कागदाची चकाकी वाढवली जाई. नंतर काळसर भुरकट रंगाने रेखाकृती काढण्यात येई. पहाडी चित्रकला ही काश्मीरच्या खोऱ्यात वेगवेगळ्या राजघराण्यांकडे आश्रयार्थ राहिलेल्या वेगवेगळ्या कलावंतामुळे निर्माण झाली. बसौली, गुलेर, कांग्रा, चंम्बा, मंडी, जम्मू, विलासपूर, कुलू आणि गढवाल अशा विविध कलमांचा पहाडीकलेत समावेश होतो. त्यात बसौली, कांग्रा व गढवाल या प्रमुख शैली मानल्या जातात. यानंतरच्या काळात पहाडी प्रदेशावर शीखांचे राजकीय वर्चस्व होते. शिकारचित्रे, दरबारचित्रे, व्यक्तीचित्रे अशा विषयांना जास्त प्राधान्य देऊन निर्मितीचा दर्जा घसरत गेला. पुढे इंग्रज अधिकाऱ्यांची व्यक्तिचित्रणे दिसू लागली व अखेरीस पहाडी चित्रकलेचे सुंदर रूप संपुष्टात आले. लाहोरच्या किल्ल्यातील भित्तीचित्रे व शाही बुरुजाचे नक्षीकाम शीखांच्या काळात झाले होते. राजा रणजीतसिंगाचा मुलगा दिलीपसिंग चित्रकलेचा भोक्ता होता.



कांग्रा चित्रशैली



कांग्रा चित्रशैली

सकृतदर्शनी विविध शैली आणि त्यांची कलमे विविध राजघराणी आणि विविध काळ यांत पहाडी शैलीतील कला प्रवाह बहरत गेला. विविध कला प्रवाहातून पहाडी शैलीची फुललेली कलापुष्पे याच्या मूळाशी समधर्मपणा होता, हे या सर्व कलमांच्या इतिहासातून दिसून येईल.

## कांग्रा चित्रशैली

कांग्रा चित्रशैली पहाडी शैली या नावानेच ओळखली जाते. कांग्राचा पराक्रमी राजा संसारचंद्र (इ.स १७७५ ते १८२३) याने चित्रकलेला फार मोठा आश्रय दिला व त्यामुळे कांग्रा चित्रशैलीची भरभराट झाली. मांडकु आणि नैनसुख या चित्रकारांची बरीच कामे कांग्रा चित्रशैलीत आढळतात. त्यात मांडकुचे नाव

विशेष मोठे आहे. राजा संसारचंद्रामुळे केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही ही चित्रे गेली. सदर चित्रशैलीतील निसर्गचित्रण मनोहर आहे. हिमालयातील शिखरे, पशुपक्षी, ऋतु आणि मोसम, मेघ आणि बिजली, सूर्योदय आणि सूर्यास्त, पाऊस आणि थंडी या साऱ्यांचे उत्कृष्ट चित्रण या चित्रांत आढळते. ४ एप्रिल १९०५ रोजी या पहाडात मोठा भूकंप झाला आणि या भूकंपात येथील चित्रकार आणि त्यांची चित्रे भूमीत गडप झाली. अन्य प्रांतात केलेल्या चित्रांवरून कांग्रा चित्रशैलीची कल्पना येते.



चित्र : सरस्वती

## २. चित्रकार

### राजा रविवर्मा :

(जन्म : २९ एप्रिल १८४८ मृत्यु : २ ऑक्टोबर १९०६)



राजा रविवर्मा

यांचा जन्म केरळ राज्यातील त्रावणकोर संस्थानामध्ये किलमन्नूर या गावी झाला. त्यांच्या घरात विद्येला मान होता. आई उमांबा नृत्यनिपुण होती. वडील श्रीकान्तन भट्टभिरीपाद संस्कृत पंडित होते. त्रावणकोर संस्थानातील महाराजांच्या बहिणीशी त्यांचा विवाह झाला. सुरुवातीला खडू व कोळसा वापरून ते चित्रे काढत. त्यांनी जलरंगात चित्रे काढण्याचा अभ्यास केला. पाश्चात्य पद्धतीने तैलरंगाचा वापर करून चित्रे निर्माण करून, त्यांनी स्वतःची शैली निर्माण केली. इ.स. १८६८ मध्ये थिओडोर जेन्सन या इंग्लिश चित्रकाराने त्रावणकोरच्या राजघराण्यातील व्यक्तींची तैलरंगात चित्रे काढली. ते काम पाहण्याची त्यांना संधी मिळाली. त्यांनी नंतरच्या काळात अनेक व्यक्तिचित्रे व इतर प्रकारची चित्रे तैलरंगात रंगवली.

इ.स. १८७३ च्या मद्रास येथील प्रदर्शनात 'एक नायर स्त्री' या चित्राला सुवर्णपदक मिळाले. व्हिएन्ना येथील प्रदर्शनातही याच चित्राला सुवर्णपदक मिळाले. शकुंतला पत्रलेखन या चित्रालाही १८७४ मध्ये सुवर्णपदक मिळाले. इ.स. १८८१ मध्ये बडोद्याचे



चित्र : क्लासिकल इंडियन पेंटिंग

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्याकडून अनेक चित्रे काढून घेतली.

भारतीय विषयावरील चित्रण, उत्कृष्ट, संयोजन, वातावरणातील त्रिमितीय आभास, प्रमुख विषयास महत्व, छाया प्रकाशाचा परिणामकारक वापर, तैलरंगाचा प्रभावी वापर, यथादर्शन तंत्राचा वापर, मुख्य विषयाच्या मांडणीतील बारकावे, पोशाख-अलंकार यातील तपशील, चेहऱ्यावरील भावदर्शन, प्रमाणबद्धता, स्त्री-पुरुषांचे सुडौल रेखांकन या दृष्टीने राजा रविवर्मा यांची चित्रे उल्लेखनीय आहेत. देवतांची, स्त्रियांची वस्त्रे, महाराणीची नऊवारी वस्त्रे महाराष्ट्रीयन पद्धतीने दाखवली आहेत. त्यांच्या चित्रांचे विषय



चित्र : शकुंतला पत्र-लेखन

प्रामुख्याने व्यक्तिचित्र, रामायण, महाभारत यातील प्रसंग, पौराणिक कथांचे प्रसंग असे आहेत.

राजा रविवर्मा यांनी रंगीत चित्रे छापण्याचा भारतातील पहिला छापखाना लोणावळ्याजवळ मळवली येथे सुरू केला. त्यासाठी त्यांनी जर्मनीमधून लिथो प्रेस आणला. त्यांनी तयार केलेली देवादिकांची, पौराणिक प्रसंगावरील चित्रांच्या छापील प्रती भारतात घरोघरी दिसू लागल्या. अत्यंत कमी किंमतीतल्या या चित्रांमुळे राजा रविवर्मा यांचे नाव सामान्यांना माहीत झाले. नल-दमयंती, राधा-माधव, विश्वामित्र-मेनका, सीता स्वयंवर, सैरंध्री, शंतनु-मत्स्यगंधा, कृष्णजन्म, द्रौपदी वस्त्रहरण, लक्ष्मी, सरस्वती, कृष्णशिष्टाई, शकुंतला पत्रलेखन इत्यादी विषयावरील त्यांची चित्रे प्रसिद्ध आहेत. त्यांची मूळ चित्रे त्रिवेंद्रम, म्हैसूर, बडोदा, उदयपूर, हैद्राबाद, औंध, नवी दिल्ली येथील प्रासादांत व चित्रसंग्रहालयांत पाहावयास मिळतात.

**सैरंध्री**

**प्रकार – चित्राकृती**

**माध्यम – तैलरंग**

**कालखंड – इ.स. १८८५**

**कलावंत – राजा रविवर्मा**



चित्र : सैरंध्री

भारतातील प्रसिद्ध चित्रकार रविवर्मा यांनी हे चित्र रंगवलेले आहे. भारतीय पुराणातील अनेक कथा प्रसंगांवर राजा रविवर्मा यांनी चित्रे रंगवलेली आहेत. या चित्रात पांडवांच्या अज्ञातवासातील एक प्रसंग कोरलेला आहे. या काळात पांडव विराट राजाच्या राज्यात राहात होते. द्रौपदी ही 'सैरंध्री' या नावाने राणीच्या महाली दासी म्हणून काम करीत होती. राणीचा भाऊ किचक याने द्रौपदीचा अपमान केला. त्यामुळे द्रौपदी म्हणजेच 'सैरंध्री' रागाने, अपमानाने महालाबाहेर पायऱ्या उतरून जात आहे व द्वारपाल तिच्याकडे रोखून पाहात आहे. असा प्रसंग चित्रात दाखवला आहे.

**वैशिष्ट्ये** – सैरंध्रीने चेहरा झाकून घेतलेला असला तरी त्यातूनही तिचा अपमानित, रागाने लाल झालेला चेहरा जाणवतो. सैरंध्री व पहारेऱ्यांच्या चेहऱ्यावरील भावदर्शन उत्कृष्ट आहे. महालाच्या बाहेरील पायऱ्यांचे

यथार्थदर्शन, सैरंध्री व पहारेकऱ्यांच्या अंगावरील वस्त्रे, छायाप्रकाश यांचे रंगलेपन उत्कृष्ट आहे. चित्राची मांडणी, रचना या दृष्टीने हे चित्र अप्रतिम आहे.

**नंदलाल बोस:**

(जन्म : ३ डिसेंबर १८८३ मृत्यु : १६ एप्रिल १९६६)



नंदलाल बोस

यांचा जन्म बिहार राज्यातील खरगपूर, पश्चिम बंगाल या ठिकाणी झाला. अवनिंद्रनाथ टागोर यांच्या शिष्यांमधील ते होतकरू व हुशार शिष्य होते. १९११ मध्ये त्यांनी अजंठा येथे राहून या लेण्यांमधील चित्रांचा बारकाईने अभ्यास केला व काही चित्रांच्या प्रतिकृती तयार केल्या. सुरुवातीच्या काळात राफाएल, रविवर्मा यांच्या चित्रांच्या प्रतिकृती तयार केल्या. नंदलाल बोस यांना भारतीय पारंपरिक चित्रशैली व जीवन यांविषयी आदर होता. बाघ लेण्यामधील चित्रांचाही त्यांनी अभ्यास केला व येथील चित्रांच्या प्रतिकृती ग्वाल्हेर संस्थानासाठी तयार केल्या. त्यांच्या चित्रावर अजंठा व बाघ शैलीचा प्रभाव अधिक दिसून येतो. १९०७ मध्ये त्यांनी काढलेल्या 'सती' या चित्राने त्यांना लौकीक मिळवून दिला. रविंद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेल्या 'विश्वभारती' या संस्थेच्या कला भवन या शाखेचे ते प्रमुख होते. १९२४ मध्ये त्यांनी रविंद्रनाथ टागोर यांच्याबरोबर चीन व जपान या देशांना भेट दिली.



चित्र : अ लेडी आर्टिस्ट

नंदलाल बोस यांनी ३० वर्षांहून अधिक काळ कलेचे अध्यापन कार्य केले. त्यांच्या कलानिर्मितीत प्राचीन भारतीय परंपरा, राष्ट्रीय विचारसरणी व आधुनिक तंत्र हे तीन प्रवाह दिसतात. १९३० मध्ये त्यांची महात्मा गांधीशी भेट झाली. हरिपूरच्या काँग्रेस अधिवेशनाची सजावट त्यांच्याकडे सोपवण्यात आली होती. त्यामुळे त्यांची राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ झाली. या अधिवेशनात बहुजन समाजातील लोकांना आकर्षक वाटतील अशी हरिपूर पोस्टर्स नावाची ६० पोस्टर्स त्यांनी तयार केली. त्यामध्ये भारतीय लोकजीवनातील शेतकरी, कारागीर, लोकसंगीतकार असे चित्रण आढळते. शांतीनिकेतनमधील चित्रभवनाच्या भिंतीवर त्यांनी भित्तीलेप चित्रे (म्यूरल्स) रंगवली. शिवाचे विषप्राशन, शिवविलाप, शिवतांडव, उमेची तपश्चर्या, युधिष्ठिराची स्वर्गयात्रा, दुर्गा, यम आणि सावित्री,



चित्र : सती

कैकयी, अहिल्या, कर्ण, कृष्ण आणि अर्जुन, गांधारी, गुरुवर्य अवनिंद्रनाथ टागोर यांचे व्यक्तिचित्र, दांडीमार्च इत्यादी चित्रे प्रसिद्‌ध आहेत. बुद्‌धाचे पुनरागमन हे त्यांचे चित्र विशेष प्रसिद्‌ध आहे.

त्यांच्या चित्रांत जलरंगातील वॉश पद्‌धत वापरलेली दिसते. अजंठा, बाघ शैलीत रेखाटन, नाजूक रेषा, सपाट पारदर्शक परंतु आल्हाददायक रंग, ओघवत्या लयदार नाजूक अलंकारिक रेषा, अलंकारिकपणा, विविध पद्‌धतीच्या निसर्गचित्रात वापरलेली रंगीत शाई/काही चित्रात पाश्चात्य कलेचा प्रभाव, पेन्सिल, पेन अँड ईंक, ब्रश, क्रेयॉन, टेंपरा अशा विविध माध्यमांचा वापर ही त्यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या चित्रप्रणालीत देशी रंग, देशी कागद आणि देशी तंत्र यांचाच वापर असे. त्यांना बनारस, कलकत्ता, रविंद्रभारती या विद्यापीठांनी डी.लिट, भारत सरकारने १९५४ मध्ये पद्‌मविभूषण पदवी देऊन सन्मानित केले आहे.

**अमृता शेरगिल:**

(जन्म : ३० जानेवारी १९१३ मृत्यु : ५ डिसेंबर १९४१)



अमृता शेरगिल

भारतीय चित्रकलेला आधुनिकतेचे वळण व दिशा देणाऱ्या अमृता शेरगिल या पंजाबी चित्रकर्तीचा जन्म हंगेरी येथील बुडापेस्ट या शहरी झाला. तिने पॅरीस येथे ३ वर्षे पाश्चात्य चित्रशैलीचा अभ्यास केला. या



चित्र : ब्रम्हचारी

काळात तिने ६० हून अधिक चित्रे रंगवली. अनेक चित्रांना पारितोषिके मिळाली. इ.स. १९३४ मध्ये ती भारतात आली. भारतभर फिरून तिने भारतीय कलेचा अभ्यास केला. भारतीय शिल्पकला, अजंठा येथील चित्रकला, राजस्थानी, बसौली या लघुचित्र शैलीचा तिच्या चित्रात प्रभाव दिसून येतो. तिच्या शैलीवर व्हॅन गॉख व पॉल गोगॅ या दृकप्रत्ययवादी कलावंतांचा प्रभाव होता. पाश्चात्य कला व पारंपरिक शैली यांचा उत्कृष्ट समन्वय तिच्या चित्रातून दिसतो. तैलरंगाचा प्रभावी वापर, मानवी आकारांची साधी मांडणी, ठसठशीत व जोरदार आरेखन, शुद्‌ध व वेधक रंगयोजना, चित्रातील आकारांची मांडणी, अवकाश विभाजन, समतोल आकृतिबंध गडद व उजळ रंगछटाबरोबर करड्या रंगांचा वापर ही त्यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये आहेत. विविध व्यक्तिचित्रे, स्वत:ची व्यक्तिचित्रे, तीन युवती, मदर इंडिया, द बेगर्स, नवरी अशा विविध विषयांची त्यांची चित्रे प्रसिद्‌ध आहेत. अनेक ठिकाणी त्यांच्या चित्रांची प्रदर्शने झाली. भारतीय चित्रकलेला नव्या परिवर्तनाची दिशा देणारी ही प्रतिभावान चित्रकर्ती वयाच्या २९व्या वर्षी दि. ५ डिसेंबर १९४१ रोजी एका छोट्याशा आजाराने कलाविश्व सोडून गेली. त्यांची बहुतेक चित्रे नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट दिल्ली व काही खासगी संग्रहालयांत आहेत.

**तीन तरुण मुली**

**माध्यम : तैलरंग, कॅनव्हॉस**

**कलाकार : अमृता शेरगिल**

**कालखंड : १९३४ – १९४१**

**वैशिष्ट्ये :** भारतीय चित्रकलेला आधुनिकतेचे वळण देणाऱ्या स्त्री चित्रकर्ती अमृता शेरगिल यांचे हे प्रसिद्ध चित्र आहे. पाश्चात्य चित्रशैली व भारतीय पारंपरिक चित्रशैली यांच्या अभ्यासातून ग्रामीण जीवनाचा परिणाम त्यांच्या चित्रातून व्यक्त होत होता.



चित्र : तीन तरुण मुली

अशाच शैलीतून 'तीन तरुण मुली' हे चित्र साकारले आहे. मुलींच्या शरीराचे आरेखन, एका बाजूने व तीन चतुर्थांश चेहरे रंगवण्याची पद्धत, चेहऱ्यावरील हताश व निराश भावदर्शन, डोळ्यांच्या विशिष्ट रचना, तांबड्या रंगांची वस्त्रे परिधान केलेल्या ग्रामीण मुली, उत्कृष्ठ रचना व रंगयोजना या सर्व वैशिष्ट्यांमुळे हे चित्र विशेष प्रसिद्ध झाले आहे.

## एन. एस. बेंद्रे (नारायण श्रीधर बेंद्रे)

(जन्म : २१ ऑगस्ट १९१० मृत्यु :१९ फेब्रुवारी १९९२)



एन. एस. बेंद्रे

**कलाजीवन –**

यांचा जन्म इंदूर, मध्यप्रदेश येथे झाला. आग्रा विद्यापीठ पदवी (१९३३) त्यांचे सुरुवातीचे कलाशिक्षण स्टेट स्कूल ऑफ आर्ट, इंदोर येथे श्री. डी. डी. देवळालीकर यांच्या हाताखाली झाले. इ.स. १९३४ मध्ये गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे कॉलेजमधून त्यांनी पेंटिंग डिप्लोमा घेतला.

इ.स. १९३६ ते १९३९ या काळात गव्हर्नमेंट ऑफ काश्मीरमध्ये चित्रकार व पत्रकार म्हणून काम केले. त्या काळात काश्मीर खोऱ्यातील निसर्गाची रेखाटने केली. त्यामुळे त्यांच्या चित्रात आल्हाददायक रंग व रम्य निसर्गाचा प्रत्यय येतो. नंतर त्यांनी मुंबई येथे स्वतंत्र चित्रकार म्हणून काम सुरू केले. व्यक्तिचित्रे, म्युरल भित्तिचित्रे, कथाचित्रे केली. कला दिग्दर्शक म्हणून मद्रासमध्ये काम केले.



चित्र : पाऊंडिंग व्हीट

इ.स. १९५२ मध्ये भारत सरकारतर्फे चीनमध्ये गेलेल्या सांस्कृतिक मंडळात प्रतिनिधी म्हणून सहभाग होता. बडोदा स्कूल ऑफ आर्ट, बडोदा येथे पेंटिंग विभागाचे ते विभागप्रमुख होते. त्यांच्या हाताखाली अनेक मान्यवर चित्रकार निर्माण झाले.

**चित्रशैली व वैशिष्ट्ये –** उत्कृष्ट निसर्गचित्रकार व रचनाकार आणि प्रामुख्याने रंगसम्राट म्हणून प्रसिद्ध आहेत. भारतीय लघुचित्रशैलीचा प्रभाव दिसतो. इ.स. १९४७-४८ मध्ये अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, बेल्जियम या देशांना भेटी दिल्या. त्या वेळी आधुनिक कलेचा त्यांच्यावर प्रभाव पडला, पण हा पाश्चात्य



चित्रकार : एन. एस. बेंद्रे

संस्कार पचवून त्यांनी आपली स्वतःची नावीन्यपूर्ण शैली निर्माण करून कलाक्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले. दैनंदिन जीवनातील मार्मिक विषयांपासून ते अप्रतिरूप चित्रणापर्यंत त्यांनी नवेनवे प्रयोग यशस्वीपणे केले. त्यांनी आपल्या कल्पनेला रंग, रेषा, आकार यांच्या एकाच चाकोरीत कधीच बंदिस्त केले नाही. प्रयोगशीलता, रम्य कल्पनाविलास, मोजक्या भावपूर्ण रंगाची मोहक रचना, आकारांची तालबद्‌ध आकर्षक मांडणी केली. संवेदनाशील मनाच्या ह्या चित्रकाराने आपल्या चित्रांतून भावनांचा मुक्त आविष्कार घडवला. मोहक आकार, आनंददायी रंगयोजना, प्रतीकात्मक आकार, रंग आणि रंगलेपनाची नवी किमया ही यांच्या चित्रांची खास वैशिष्ट्य होत. चित्रांतील आकार, त्यांचे एकमेकांशी प्रमाण, आकारातील साधेपणा, आकर्षक पार्श्वभूमी, कधीकधी आकृती लहान काढून छोट्या चित्रात भव्यता निर्माण करण्याची किमया त्यांच्यात होती.

'मी या मातीशी निगडीत आहे. मी चालतो, खातो या मातीवर. मी या मातीशिवाय दुसरा कुठलाही विचार करीत नाही, मी स्वप्न चित्रे रंगवत नाही. जे काही या जगात मी अनुभवतो, ते मी रंगवतो. इतर गोष्टी माझ्याकरता महत्त्वाच्या नाहीत'. १९९० ते १९९२ मध्ये रंगवलेल्या चित्रविषयक भूमिकेबद्‌दल त्यांनी काढलेले हे उद्‌गार त्यांच्या चित्र शैलीविषयी पुरेसे बोलके आहेत.

बेंद्रे यांनी वास्तवतेचे भान कधीही सोडले नाही. पण वास्तवातील कुरूपता, दुःख, दारिद्र्य, शोक, अतिभावनिक उद्रेक इत्यादी घटकांपेक्षा वास्तवातील सुंदर आनंददायी, आल्हाददायक, प्रसन्न असे रूपच आपल्या कुंचल्यातून साकार केले. ' मी चित्र रंगवतो कारण मला त्यातून आनंद मिळतो. सुख मिळते. त्याचप्रमाणे ते इतरांनाही देण्याचा मी प्रयत्न करतो.' असे ते म्हणतात.

इंदूर ही जन्मभूमी असलेल्या बेंद्रे यांच्यावर जवळच असलेल्या माळवा या निसर्गरम्य परिसराचाही परिणाम होणे साहजिकच होते. बेंद्रे यांनी देशात व परदेशात आयुष्यभर खूप भटकंती केली. त्यातूनच त्यांना चित्रासाठी नित्य जीवनातील विषय मिळत. शांतीनिकेतनमध्येही ते काही काळ होते. नंदलाल बोस यांचा सहवास त्यांना लाभला.

भारतीय लघुचित्रातील अतिशय मोहक व हळुवार रंगसंगती, पाश्चात्य उत्तर दृकप्रत्ययवादी रंगलेपन तंत्र, त्याचबरोबर क्युबिझम, फॉव्हिझम या पाश्चात्य चित्रशैलीतील रंगलेपन तंत्र, रंगसंगती यांचा प्रभाव त्यांच्या एकूण चित्रनिर्मितीच्या कारकिर्दीत टप्प्याटप्प्यांवर दिसून येतो. अशा प्रयोगशीलतेतून त्यांची स्वतःची शैली घडवली.

## प्रसिद्ध कलाकृती

**थॉर्न :** हे १९५५ मध्ये बडोदा विद्यापीठात पेंटिंग विभागाचे प्रमुख झाल्यानंतर नॅशलन अॅवॉर्ड लाभलेले चित्र. भारतीय व पाश्चात्य शैलीचा मिलाफ यात दिसतो. पायातील काटा काढणारी युवती. फांदीचा आधार घेऊन उभी असलेली त्रिभंग अवस्थेतील ही पोज; भारतीय खजुराहो शिल्पशैलीची आठवण करून देते. स्त्रीच्या शरीराचा कमरेपर्यंतचा भाग समोरून दिसतो तसा व कमरेखालचा मागील पार्श्वभाग हा पुढे दाखवून खजुराहोच्या 'सुरसुंदरी' शिल्पाशी साधर्म्य साधले आहे. स्त्री, आकृती, झाड व मागील डोंगर या सर्व घटकांचे घनवादी शैलीत विभाजन करून द्विमिती व त्रिमितीचा भाग साधला आहे. लाल, पिवळा व निळा या प्राथमिक तेजस्वी रंगाचा वापर यात केला आहे.

या घनवादी शैलीतील दुसरे चित्र 'सूर्यफूल'. मात्र या घनवादी शैलीत बेंद्रे यांचे मन रमले नसावे. पाश्चात्य प्रभावातून अनेक कलाकार बाहेर पडले व स्वतःचीच शैली ज्यांनी निर्माण केली त्यात बेंद्रे हे अग्रगण्य होते. त्याचे समकालीन चित्रकार हुसेन, हेब्बर यांनीही आपापल्या वाटा शोधल्या.

या चित्रात तीन सूर्यफूले एका फुलदाणीमध्ये ठेवलेली दाखवलेली आहेत. हे चित्र पूर्ण वास्तववादी नाही. घनवाद व भावाविष्कारवाद्यांचा एकत्रित प्रयोग आहे. बेंद्रे यांनी जे काही विविध वादांचे प्रयोग केले, त्या प्रयोगमालिकेतील एक चित्र. सूर्यफुलाच्या पिवळ्या पाकळ्यामधल्या परागकणांचा गोलाकार मोठा गडद तांबूस रंगाचा. फुलांच्या मागे निळ्या – करड्या रंगाचे पतंगाकृती आकार. खाली फुलदाणी, फुलांचे व फुलदाणीचे विषमतोलामध्ये रेषांनी केलेले विभाजन. या सर्व गोष्टी मिश्रशैलीतून निर्माण झालेल्या आहेत. फुलांच्या पार्श्वभूमीवर निळ्या रंगाचा वापर केल्यामुळे फुलांना उठाव मिळाला आहे. उत्कृष्ट संयोजन, रंगयोजना हे या चित्राचे विशेष. पाश्चात्य कलेच्या प्रभावाखाली निर्माण झालेली बेंद्रे यांची ही कलाकृती होय.

## रंग

'रंगसम्राट' म्हणून ओळखले जाणारे बेंद्रे. यांच्या चित्रातील रंग मनाला भुरळ पाडतात. रंगलेपनातील हळुवारपणा, सहजता, नवनवीन पद्धती, तंत्र हा महत्वाचा गुण त्यांच्याकडे होता. त्यांच्या चित्रातील मूळ रंग कधीच भडक वाटत नाहीत, भासत नाहीत. मूळ रंगाचा वापर करताना त्याची तेजस्विता दुसरा रंग अल्पप्रमाणात मिसळून त्याचा तेजस्वीपणा, भडकपणा कमी करत. त्यामुळे रंगाला एक प्रकारचे गहिरेपण निर्माण होत असे. मंद – मधुर रंग चित्रातील वातावरण आल्हाददायक करतात. रंगलेपनातील 'कंपन' हा आणखी एक खास भाग. हे रंगातील 'कंपन' (व्हायब्रेशन) रंगलेपनातील विविध पद्धती तंत्राने मिळवत. त्यामुळे चित्र एक चैतन्यमय, संवेदनशील आकृती बने. रंग एकमेकांवर देऊन तर एकावर दुसरा रंग लावून, ब्रशच्या फटकाऱ्याद्वारा पण फटकारेही हळुवार, तर कधीकधी ठिपक्यांनी, तर कधी रेषेने रंगलेपन करून हे कंपन साधत. चित्रात एकसंधपणा प्राप्त करत. चित्रातील गडद आणि उजळ रंगांची तोलयुक्त मांडणी वैशिष्ट्यपूर्ण असते.

## पारितोषिके

इ.स. १९४१ सुवर्णपदक – बॉम्बे आर्ट सोसायटी (मुंबई). इ.स. १९४६ पटेल ट्रॉफी – आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई आणि त्याच वर्षी संस्थेचे अध्यक्षपद भूषवले, इ.स. १९४६ शांतिनिकेतनला सन्मानित चित्रकार म्हणून भेट दिली. इ.स. १९४३ मध्ये मुंबई येथे पहिले व्यक्तिगत प्रदर्शन भरवले. पुढे मुंबईत अनेक व्यक्तिगत प्रदर्शने भरवून नवनवीन चित्रांची मेजवानी रसिकांना दिली. अमेरिकेत पाच चित्र प्रदर्शने भरवली. १९६९ साली 'पद्मश्री' पुरस्काराने यांना सन्मानित करण्यात आले.

## प्रसिद्ध कलाकृती

वेणीफणी (१९४९), सूर्यफुले (१९५५), मंकी (१९५७), गाय – वासरू (१९४८), घराकडे, छकडा.

## श्री. वासुदेव गायतोंडे

(जन्म : इ.स. १९२४ मृत्यु :१० ऑगस्ट २००१)



वासुदेव गायतोंडे

अप्रतिरूप (केवलवादी) कलाशैलीत काम करणारे एक प्रतिथयश कलावंत म्हणून श्री. गायतोंडे ओळखले जातात. ते मुंबईतील प्रागतिक कलाकारांच्या गटाचे एक सभासद होते. यांचे कलाशिक्षण मुंबईच्या सर जे. जे. कलामहाविद्यालयात झाले. त्यांच्या प्रारंभीच्या चित्रशैलीवर भारतीय पारंपरिक कलेचा प्रभाव होता. परंतु नंतर त्यांनी आधुनिक पाश्चात्य शैलीचा स्वीकार केला. त्यांच्या काही चित्रांवर पॉल क्ले व कॅन्डिन्स्की या पाश्चात्य कलाकारांच्या शैलीचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. बौद्धिक विचारमंथनातून निर्माण झालेल्या आशयगर्भ प्रतीकांच्या साहाय्याने साध्या, मोजक्या आकारांची रचना चित्रावकाशात करून ते समतोल रंगयोजनेतून आपल्या भावना अभिव्यक्त करतात. यांनी भारतीय व परदेशी कलाप्रदर्शनात अनेक पारितोषिके मिळवली. मिळालेल्या शिष्यवृत्तीद्वारे ते न्यूयॉर्क व जपानलाही अभ्यासासाठी गेले. भारतात परतल्यावर शेवटपर्यंत त्यांनी दिल्लीत वास्तव केले. १९७१ साली त्यांना 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला.



चित्रकार – वासुदेव गायतोंडे

## जिव्या सोमा म्हसे

(जन्म :१९ मे १९३४ मृत्यु :१५ मे २०१८)



जिव्या सोमा म्हसे

पालघर या आदिवासी बहुल जिल्ह्यातील डहाणू तालुक्याच्या पूर्वेकडील गंजाड गावातील जिव्या सोमा म्हसे हे प्रसिद्ध वारली चित्रकार. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बहुल, डहाणू, विक्रमगड, मोखाडा, जव्हार, तलासरी आणि वसई, पालघर या तालुक्यांत तुरळक वस्ती असलेल्या वारली जमातीमध्ये लग्न, बारसे, पूजापाठादी अनेक संस्कार श्रद्धेने पाळले जातात. अनेक विधींमध्ये देवदेवतांची चित्रे काढणे ही परंपरा असते. येथील आदिवासींच्या झोपड्यांमधील कारवींच्या विणलेल्या आणि शेणाने लिंपलेल्या कुडावर, प्राणी, पक्षी, देवदेवता, निसर्ग आदी चित्रे काढलेली दिसून येतात.

वारली चित्रे काढण्याची मक्तेदारी स्त्रियांची असायची. परंतु तेराव्या वर्षी सहजच चित्र रेखाटले. त्यांची या आदिवासी संस्कृतीतील तारपा नृत्य, लग्नाचा मांडव, लग्नाचे विधी, जंगलातील व्यवहार आदींची चित्र उठावदार व वैशिष्ट्यपूर्ण ठरू लागली. शाळेतही त्यांच्या चित्रांची प्रशंसा व्हायची. ही आवड त्यांनी पुढेही चालू ठेवली. वारली पेटिंगसाठी वापरले जाणारे रंगही नैसर्गिक फुलापानांपासून तयार केलेले असतात. म्हसे हे रंग स्वत: बनवत. तसेच चित्र काढण्यासाठी लागणाऱ्या काड्या ह्यादेखील ते स्वत: वनस्पतीपासूनच बनवत असत.



चित्रकार – जिव्या सोमा म्हसे

जिव्या म्हसे यांच्या पेंटिंग्जची माहिती ऐकून भास्कर कुलकर्णी हे मुंबईतील कलापत्रकार त्यांच्या गंजाड येथील मुक्कामी आले. यांच्या अद्‌वितीय कलेबद्‌दल तात्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सांस्कृतिक सचिव आणि तेव्हाच्या ट्रेड फेअर ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या अध्यक्ष पुपुल जयकर यांच्या कानावर घातली. पुपुल जयकर या सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकार आणि भारतीय संस्कृतीच्या अभ्यासक होत्या. त्यामुळे त्यांच्या चौकस नजरेतून म्हसेंची ही उपेक्षित राहिलेली वारली कला सुटली नाही. त्यांनी यांची कला प्रथम राष्ट्रीय स्तरावर आणि नंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवली. परदेशी रसिकांना भारतीय अभिजात संस्कृती, तसेच कलेचे फार आकर्षण असते. तोच विचार करून जयकर यांनी त्यांच्या चित्रांना प्रसिद्‌धी दिली. त्यातूनच जर्मनी, इस्त्रायल, अमेरिका, इंग्लंड, रशिया, चीन, आखाती देश अशा जगाच्या कानाकोपऱ्यात यांची चित्रे पोहोचली. जंगलामधल्या कडेकपारीत लपलेली वारली चित्रकला जगाच्या नकाशावर जिवा म्हसे यांनी नेली.

भारत सरकारने १९८२ साली म्हसे यांना पावणेतीन एकर जमीन दिली. तेथे त्यांची कलासाधना सुरू होती. मुंबई, वसई, डोंबिवली, डहाणू तालुक्याबाहेर ठाणे येथील महाविद्यालयात वारली चित्रकलेचे धडे विनामूल्य दिले आहेत. त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मानांनी गौरवले गेले. १९७६ साली राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले व २०११ साली भारत सरकारने त्यांना 'पद्‌मश्री' देऊन वारली कलेला राजमान्यता व लोकमान्यता मिळवून दिली. तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

**उपक्रम : आपल्या परिसरातील चित्रकाराची माहिती फोटोसह लिहा.**

## माझा अभ्यास

### १. लघुचित्रशैली.

**प्र.१ थोडक्यात माहिती लिहा.**

१) अकबरकालीन चित्रकला.

२) जहांगीरकालीन चित्रकला.

३) पहाडी शैली

**प्र.२. मोगल व रजपूत चित्रकलेची तुलना पुढील मुद्द्यांच्या आधारे करा.**

१) काळ २) खास वैशिष्ट्ये ३) स्वरूप ४) विषय

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा?**

१) चित्रकार अबुलहसन यास जहांगीरने कोणती पदवी दिली होती?

२) इराणी शैली व भारतीय शैली यांच्या संयोगातून कोणती शैली निर्माण झाली?

३) अकबराने कोणती चित्रे काढण्यास प्रोत्साहन दिले?

४) जहांगीरकालीन वनस्पतीशास्त्राचा अमूल्य ठेवा कोणता?

५) सचित्र ग्रंथनिर्मितीच्या बाबतीत कोणते चित्रकार अधिक कुशल होते?

६) अकबराच्या काळात किती हस्तलिखित ग्रंथ चित्रबद्ध करण्यात आले?

७) अकबरकालीन चित्रातील 'तर्हा' म्हणजे काय?

८) अकबरकालीन चित्रात रंगकाम करणाऱ्या चित्रकारास काय म्हटले जाते असे?

९) जहांगीरच्या दरबारातील चित्रकारांची नावे कोणती?

१०) अकबराच्या काळात एकाच चित्रावर अनेक चित्रकार काम करत हे कशावरून सिद्ध होते?

११) पहाडी कलेतील प्रमुख शैलींची नावे लिहा.

१२) कांग्रा चित्रशैली अजून कोणत्या नावाने ओळखली जाते?

१३) कांग्रा चित्रशैलीतील दोन प्रमुख चित्रकारांची नावे लिहा.

१४) औरंगजेब बादशाहाच्या काळात चित्रालये बंद का करण्यात आली?

१५) पहाडी कलेत कोणत्या विषयावर चित्रे काढण्यात आली?

१६) उत्तर मध्ययुगात लघुचित्राचा उपयोग कशासाठी केला जाऊ लागला ?

१७) कशावरून 'लघुचित्रे' असे नाव रुढ झाले?

१८) लघुचित्रे कोणत्या रंगात रंगवली गेली?

१९) पश्चिम भारतीय लघुचित्र शैलीचे दुसरे नाव कोणते?

२०) लघुचित्रांना कशाने चकाकी आणली जाई?

२१) राजस्थानी शैलीतील राजदरबारी चित्रे कशामुळे नष्ट झाली?

२२) राजस्थानी शैलीचे वैशिष्ट्य कोणते?

**प्र.४ चूक की बरोबर ते लिहा. वाक्य चुकीचे असल्यास योग्य उत्तर लिहा.**

१) पहाडी चित्रकारांच्या चित्रशाळा होत्या.

२) पहाडी चित्रकार अंतिम रेखाटन हरणाच्या कातड्यावर काढत असत.

३) हस्तव्यवसायाने तयार केलेला कागद 'सियालकोटी' या नावाने प्रसिद्ध असे.

४) 'सियालकोटी' कागदाचा रंग पांढराशुभ्र असे.

५) पहाडी चित्रकार प्रथमतः काळ्या रंगाने रेखाकृती काढत.

## २. चित्रकार

**प्र.१ टीपा लिहा**

१) राजा रविवर्मा

२) अमृता शेरगिल

३) एन.एस. बेंद्रे

**प्र.२ रसग्रहणात्मक सविस्तर टिपा लिहा.**

१) सैरंध्री

२) तीन तरुण मुली

**प्र.३ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) इ.स. १८७३ प्रदर्शनातील राजा रविवर्मा यांच्या कोणत्या चित्राला सुवर्णपदक मिळाले होते ?

२) राजा रविवर्मा यांनी रंगीत चित्रे छापण्याचा कारखाना कोठे सुरू केला होता ?

३) राजा रविवर्मा यांचे पांडवांच्या अज्ञातवासातील प्रसंगावरील काढलेले कोणते चित्र प्रसिद्ध आहे ?

४) नंदलाल बोस यांच्या चित्रांवर कोणत्या शैलींचा प्रभाव अधिक दिसून येतो ?

५) नंदलाल बोस यांना सरकारने कोणती पदवी देऊन सन्मानित केले ?

६) अमृता शेरगिल यांच्या चित्रावर कोणत्या शैलीचा परिणाम दिसून येतो ?

७) 'तीन तरुण मुली' या चित्राच्या चित्रकाराचे नाव लिहा ?

८) एन.एस.बेंद्रे यांना 'रंगसम्राट' का समजले जाते ?

९) एन.एस.बेंद्रे यांच्या तीन प्रसिद्ध चित्रांची नावे लिहा.

१०) चित्रकार वासुदेव गायतोंडे यांची प्रसिद्ध चित्रे कोणती ?

११) चित्रकार गायतोंडे यांच्या चित्रांवर कोणत्या पाश्चात्य कलाकारांच्या शैलीचा प्रभाव दिसतो ?

१२) कोणत्या कलाशैलीत काम करणारे कलावंत म्हणून श्री. वासुदेव गायतोंडे ओळखले जातात ?

१३) चित्रकार जिव्या सोमा म्हसे कोणती चित्रे काढण्यात प्रसिद्ध होते ?

१४) जिव्या सोमा म्हसे चित्र काढण्यासाठी कशाचा वापर करीत ?

१५) जिव्या सोमा म्हसे यांना सरकारने कोणता मोठा पुरस्कार देऊन सन्मानित केले ?



# ४ पाश्चात्य कलेचा इतिहास

## वास्तुकला

मानवी जीवनात वास्तुकला ही अत्यंत उपयुक्त आणि अनिवार्य कला आहे. मानवाच्या ज्या मूलभूत गरजा-अन्न, वस्त्र, निवारा-त्यांपैकी निवारा निर्माण करण्याची कला आणि शास्त्र म्हणजे वास्तुकला. त्यामुळे अतिप्राचीन काळापासून या क्षेत्रात मानव कार्यरत असलेला आढळतो. किंबहुना यामुळेच या कलेला सर्व कलांची जननी मानण्यात येते. ऊन, वारा, पाऊस, तसेच पशू इत्यादींपासून संरक्षण मिळवण्यासाठी निवारा निर्माण केल्यानंतरच मानवाच्या मनात इतर कलानिर्मितीविषयी विचार निर्माण झाले असावेत.

माणसाने बांधलेली कोणतीही अथवा प्रत्येक वास्तू 'वास्तुकला' मानली जात नाही. कोणत्याही बांधीव आकाराला 'वास्तुकला' म्हणून मान्यता प्राप्त होण्यासाठी काही मूलभूत निकष पार करावे लागतात. ते म्हणजे – (१) ज्या कार्यासाठी ती वास्तू बांधली आहे त्या वापरातील वास्तूची उपयुक्तता, सोय (२) वास्तूच्या बांधकामातील भक्कमपणा आणि टिकाऊपणा (३) कार्यानुरूप कल्पक अवकाशरचनेची अभिव्यक्ती (४) देखभालीचा कमीत कमी व्याप (५) वास्तूची कार्यानुरूप चैतन्यवृत्ती (स्पिरिट) जागृत ठेवणारे अंतर्बाह्य अलंकरण (६) बांधीव आकार व अवकाश-सौंदर्य यांतील सुयोग्य मेळ. यांतील फक्त अलंकरण कालानुरूप बदलू शकते. प्रत्येक दर्जेदार वास्तुनिर्मितीत हे निकष प्रत्ययाला येतात व म्हणूनच अशा इमारतीला 'वास्तुकला' मानले जाते. अनेक गोष्टींचा अंतर्भाव वास्तुनिर्मितीच्या प्रक्रियेत करावा लागतो. विविध परिमाणे या प्रक्रियेचे नियंत्रण करतात. प्रथम म्हणजे, ज्या भूखंडावर वास्तू बांधायची आहे त्याचे क्षेत्रफळ, आकार, भूरचना, स्वरूप ज्याच्यासाठी बांधायची आहे त्याची आर्थिक क्षमता, कुवत, किती कालावधीत बांधायची आहे त्यानुसार प्रत्यक्ष बांधकामाचे नियोजन; ज्या कार्यासाठी वास्तू बांधायची आहे त्यासंबंधी कार्यवादी दृष्टिकोनातून सखोल अभ्यास, वायुवीजन, ऊन, पाऊस या दृष्टींनीं वास्तूची ठेवण, अंतर्गत रचनेतील कार्यानुरूपता, उपयुक्तता, सोयी विविध प्रकारच्या निस्सारण योजना कमीत कमी आर्थिक खर्चात जास्तीत जास्त उपयुक्त वास्तुसाहित्य उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अभ्यास, त्याची निवड, स्थलशिल्परचनेचा शोध व प्रत्यक्ष रचना, वास्तूच्या प्रत्येक घटकाची उपयुक्त, सौंदर्यपूर्ण, माफक किंमतीची रचना अशा अनेक वास्तुशास्त्रीय घटकांची सांगड कलाघटकांशी घालावी लागते. त्याचबरोबर ज्याच्यासाठी वास्तू बांधली जाणार आहे त्याच्या पारंपरिक, धार्मिक, सांकेतिक गरजांचादेखील विचार करून त्यानुसार आवश्यक सोयीसुविधांचा अंतर्भाव वास्तुशास्त्रीय रचना करताना करावा लागतो.

वास्तुनिर्मितीची प्रक्रिया ही कला, शास्त्र व तंत्र या तीन पातळ्यांवरून नियंत्रित केली जाते. वास्तुनिर्मितीची प्रक्रिया आणि तिचे स्वरूप, गुणवैशिष्ट्ये मुख्यतः त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांवर अवलंबून असतात. आद्यारंभी मानवाने आपली निवाऱ्याची गरज दगडी गुहेचा आश्रय घेऊन, काही वास्तुशास्त्रीय प्रयत्न न करता भागवली. निरनिराळी खनिजे एकमेकांत मिसळून रासायनिक संयोगाची प्रक्रिया अनेक वर्षे झाल्यानंतर दगड तयार होतो. भार पेलण्याची शक्ती त्यात निर्माण होते, तसेच ऊन, वारा, पाऊस आदींच्या परिणामामुळे दगडाची झिजण्याची

वृत्ती फार कमी व अतिमंद असते. त्यामुळे वास्तुकलेत दगडाचा वापर अतिप्राचीन काळापासून प्रचलित आहे. वास्तुकलेत दगडाच्या विविध प्रकारांबरोबरच तंत्राचादेखील विकास पाहावयास सापडतो. दगडांमधील सांध्यांचे तंत्र, चकाकी आणण्याचे तंत्र, शिल्पालंकृत करण्याचे तंत्र आणि संरचनेतील विविधता यांमुळे अनेक ऐतिहासिक वास्तू आजही त्याच सौंदर्याने शतकानुशतके उभ्या राहिलेल्या दिसतात.

## पाश्चात्य वास्तुकला

### हाजिया सोफिया चर्च :



हाजिया सोफिया चर्च

बायझंटाईन कालखंडात बांधण्यात आलेल्या चर्चपैकी सर्वात मोठे व अप्रतिम मानले गेलेले हे चर्च जस्टिनियन बादशहाच्या प्रेरणेने केवळ सहा वर्षात बांधून पूर्ण झाले. मौल्यवान संगमरवर व इतर बांधकाम साहित्य बाहेरून आणून मुक्तपणे वापरले गेले. या चर्चच्या अनुविक्षेप बॅसिलिका पद्धतीचा नाही. तो मध्यवर्ती अनुविक्षेप साधारणपणे चौकोनी आहे. त्याची लांबी ७६ मीटर व रूंदी ६७ मीटर आहे. मुख्य सभामंडप दुतर्फा असलेली दुमजली पाखी हे या चर्चचे प्रमुख भाग होत. पूर्वेकडील टोकाला स्तब्धिका असून त्या भागातच मुळात वेदी होती. पश्चिम बाजूला प्रवेशद्वाराची ओटी असून तिला तीन दरवाजे आहेत. मुख्य सभामंडपाच्या वर डौलदार, भव्य व आकर्षक घुमट आहे. त्याच्या दोन्ही बाजूंस तेवढ्याच व्यासाचे दोन अर्धघुमट आहेत. मध्यवर्ती घुमटाचा व्यास ३२.५ मीटर व उंची ५५ मीटर आहे. घुमटाच्या तळाशी असलेल्या चाळीस खिडक्यांतून प्रकाश आत येतो. एकसंघ व अतिशय अलंकृत स्तंभ, उंच भिंती व जमीन या सर्वांवर संगमरवराच्या फरशा बसवल्या आहेत. या रंगतदार फरशा, चमकदार सोनेरी पार्श्वभूमीवरील मोझाइक चित्रे यामुळे डोळे दिपून टाकणारे स्वर्गीय वातावरण निर्माण झाले आहे. या चर्चमध्ये बायझंटाईन वास्तुकलेचा परमोत्कर्ष दिसतो असे म्हणणे यथार्थ ठरेल.

### बायझंटाईन कला :

ख्रिस्ती धर्माचा खूप प्रसार झाल्यावर प्रारंभीच्या बॅसिलिका पद्धतीच्या रचनेत सुधारणा करण्याची जरूर भासू लागली. कॉन्स्टॅन्टिनोपल येथील 'हाजिया सोफिया' हे चर्च बायझंटाईन वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. घुमट, स्तंभ व कमानी, संगमरवरी जाळी, अंर्तभागात खेळवलेला भरपूर प्रकाश व भव्यपणा ही या इमारतीची वैशिष्ट्ये आहेत. परंतु याहीपेक्षा महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे बायझंटाईन चर्चमधील जडाव-चित्रे (मोझाइक्स) हे होय. रंगीत दगड व काचेचे तुकडे चुन्याच्या गिलाव्यात बसवून ही चित्रे तयार करीत. चर्चमध्ये अंधार असे व त्यामुळे



जडाव चित्र (मोझाइक्स)

फ्रेस्को चित्रे अंधारात उठावदारपणाने कमी पडू लागली. मोझाइक्स थोड्याशा उजेडाने चमकत व त्यामुळे प्रकाशमय ईश्वरी साक्षात्कार घडल्याचा आनंद प्रार्थना करताना मिळे, हे मोझाइक्सच्या सजावटीचे वैशिष्ट्य असावे. याशिवाय धार्मिक हस्तलिखीत ग्रंथातील चित्रे ग्रीक धर्तीवर काढलेली आहेत. या काळात मूर्तिकलेला धार्मिक दृष्टीने विरोध होता. म्हणून फारसे मूर्तिशिल्प आढळत नाही, तथापि शवपेटिकेवरील शिल्पाचे, फर्निचरवरील हस्तिदंती कोरीव कामाचे नमुने आढळतात. सर्व बायझंटाईन कला धार्मिक स्वरूपाची आहे व कलावंतांना कलानिर्मितीचे स्वातंत्र्य नव्हते.

### पिसाचा झुकता मनोरा

इटली देशाच्या पिसा शहरातील एक चर्चचा मनोरा हे लोकप्रिय आकर्षण असलेले वास्तुशिल्प आहे. इसवीसन ११७३ साली या मनोऱ्याचे बांधकाम सुरू झाले. पायाखालील ठिसूळ जमीन व कमकुवत पायाभरणीमुळे ११७८ साली तीन मजले बांधून पूर्ण झाल्यानंतर हा मनोरा एका बाजूला कलण्यास सुरुवात झाली. त्यानंतर मनोऱ्याचे काम थांबले. बोनॅनो पिझ्ाने हा या मनोऱ्याचा वास्तुरचनाकार होता आणि त्याचा मूळ प्लॅन आठ मजल्यांचा ५६ मीटर उंचीचा होता. तांत्रिक अडचणी, राजकीय अस्थैर्यामुळे मनोऱ्याचे थांबलेले काम १२७२ साली परत सुरू झाले आणि १२७८ मध्ये सात मजले पूर्ण झाले. चौथ्या मजल्यापासून वरचे मजले झुकावाच्या बाजूने अधिक उंचीचे बांधले गेले. पण झुकाव अधिक वाढतच गेला. अखेरीस १३७० साली आठवा मजला बांधून पूर्ण झाला. हा मनोरा पूर्ण होण्यास दोन शतकांचा काळ लागला.

झुकाव थांबण्यासाठी अनेक तांत्रिक प्रयोग होऊनही मनोऱ्याचे कलणे थांबले नाही. शेवटी झुकावाच्या विरुद्ध बाजूला पायात सहाशे टन शिसे भरण्याचा प्रयोग यशस्वी झाला. तिरकेपणा जाणवू नये म्हणून दुसरी बाजू उंच बांधण्यात आली. मात्र यामुळे मनोरा थोडा वक्र झाला. इसवी सन १३७२ मध्ये मनोऱ्यातील घंटेची खोली बांधण्यात आली. येथे सप्तसुरांशी निगडित सात घंटा आहेत. त्यानंतरच्या सहा मजल्यांना प्रत्येकी तीस व शेवटच्या मजल्याला सोळा कमानी आहेत. टॉवर्सची उंची बुटक्या बाजूने ५५.८६ मीटर आणि उंच बाजूने ५६.७ मीटर आहे. आतमधून जाण्यासाठी गोल जिन्याला २९६ पायऱ्या आहेत. अत्यंत मोहक अशा पांढऱ्याशुभ्र संगमरवराच्या खांबांनी आणि जाळीदार झरोक्यांनी प्रत्येक मजला सुशोभित असलेला हा मनोरा त्याच्या सौंदर्यापेक्षा त्यातल्या दोषांमुळे अधिक चर्चेत राहिला. १९८७ मध्ये पिसाच्या मनोऱ्याला वारसा स्थान म्हणून घोषित केले. १९९० मध्ये लोकांसाठी हा मनोरा बंद करण्यात आला. वजन कमी करण्यासाठी सर्व घंटा काढून टाकण्यात आल्या. तसेच २००१ मध्ये हा मनोरा पुन्हा खुला करण्यात आला.


गॅलिलिओने गुरुत्वाकर्षण सिद्ध करण्यासाठी ह्याच मनोऱ्यावरून अनेक प्रयोग केले होते. पिसाच्या कललेल्या मनोऱ्याला एक वैज्ञानिक चमत्कार म्हणून जागतिक प्रसिद्धी मिळाली असली तरी हा सर्व चमत्कार तिथल्या मूळच्या दलदलीच्या जमिनीमुळे झाला आहे. कला इतिहासात झुकता पिसाचा मनोरा रोमनेस्क शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे.



झुकता मनोरा

### सिस्टेन चॅपेल

हे पोपचे अधिकृत खाजगी प्रार्थना मंदिर आहे. ते इ.स. १४७५ ते १४८३ या काळात बांधले गेले. अनेक धार्मिक कार्यक्रमांखेरीज नव्या पोपची निवडणूक करण्याची सभा याच प्रार्थना मंदिरात भरते. जमिनीवर १५ व्या शतकात सुंदर मोझाइक काम रोमन शैलीचे आहे. बाजूच्या मुख्य भिंतीवर सहा सहा फ्रेस्को चित्रांच्या दोन मालिका आहेत. डावीकडे भिंतीवर मोझेसच्या जीवनातील प्रसंग व उजवीकडे ख्रिस्तचरित्रातील प्रसंग रंगवलेले आहेत. या चॅपेलच्या अर्धगोलाकृती छतावर मायकेल अँजेलोने इ.स. १५०८ ते १५१२ या चार वर्षांत उताणे पडून आपली जगप्रसिद्‌ध फ्रेस्कोचित्रे रंगवली. फ्रेस्को रंगवण्याचे काम कधीही न केलेल्या मायकेल अँजेलोला जबरदस्तीने हे काम करावयास लावणारा पोप दुसरा ज्युलियस याने मोठीच दूरदृष्टी व प्रतिभा दाखवली. जगाची उत्पत्ती व विकास या विषयाच्या बायबलमध्ये वर्णन केलेल्या घटनांचे चित्रण यात आहे. सुदृढ व परिपूर्ण मानवी शरीर चित्रित करण्याचा त्याचा प्रयत्न या चित्रात दिसतो. तो मूळचा शिल्पकार होता. त्यामुळे त्याच्या मानवाकृती शिल्पसदृश व घनतापूर्ण आहेत. ॲडमचा जन्म, ईव्हचा जन्म, सूर्य, चंद्र व तारे यांची उत्पत्ती चित्रे प्रसिद्‌ध आहेत. वेदीच्या मागील भिंतीवर त्याने पोप तिसरा पॉल याच्या आदेशावरून 'अंतिम निवाडा' हे भव्य फ्रेस्को चित्र इ.स. १५३५-४१ या सहा वर्षांत रंगवले. ग्रीक अपोलो-हर्क्युलसप्रमाणे दिसणारा ख्रिस्त पुण्यकाल व पापी आत्म्यांचा अंतिम निवाडा करीत असल्याचे दृश्य या भव्य व अप्रतिम चित्रात रंगवले आहे.




फ्रेस्को चित्र : सिस्टेन चॅपेल

### आयफेल टॉवर

**आयफेल टॉवरची मूळ संकल्पना आणि बांधकाम:** फ्रेंच राज्यक्रांतीच्या शंभराव्या वर्धापन दिनानिमित्त १८८९ साली एक्सपोजिशन युनिव्हर्सल येथे जर्नल ऑफिसयल मध्ये एक मोठी स्पर्धा सुरू केली गेली. प्रथम खोदण्याचे काम २८ जानेवारी १८८७ रोजी सुरू झाले. ३१ मार्च १८८९ रोजी टॉवरचे बांधकाम २ वर्ष २ महिने ५ दिवस विक्रमी वेळेत पूर्ण केले आणि एक तांत्रिक पराक्रम म्हणून त्याची स्थापना झाली. त्यासाठी ५० अभियंत्यांनी डिझाईन केले. १८,०३८धातूचे भाग ५,३०० विविध भागांचे डिझाईन केले गेले. १५० ते ३०० कामगार कार्यशाळेत व तेवढेच बांधकामावर कामगार कार्यरत होते. ह्यासाठी ७,३०० टन लोह व ६० टन रंग वापरण्यात आला असून ह्यास ५ लिफ्ट वापरण्यात आल्या.

**आयफेल टॉवरची रचना :** जागतिक मेळाव्याच्या तयारीचा भाग म्हणून ३०० मीटर उंच टॉवर बांधण्याच्या योजनेची कल्पना केली गेली. लोखंडी बुरुज चौरस तळासह १२५ मीटर ओलांडून ३०० मीटर उंच उभारण्याच्या शक्यतेचा अभ्यास करण्यात आला व १०७ प्रकल्पांपैकी ते गुस्तावे आयफेल, हे उद्योजक, मॉरिस कोचेलिन आणि एमिली नौगियार दोन्ही अभियंते आणि स्टीफन सॉवेस्त्रे वास्तुविशारद स्वीकारले गेले. टॉवर बनवण्याची कल्पना ही तळाशी विभक्त होऊन एकत्र येताना, जाळीच्या कामाच्या गर्डरच्या चार स्तंभांसह तो एका मोठ्या तोरणांसारखा बनवायचा अशी होती. शीर्षस्थानी आणि नियमित अंतराने अधिक मेटल गर्डरद्वारे ते एकमेकांना सामील झाले. ३०० मीटर उंचीपेक्षा जास्त सक्षम असलेल्या मेटल सपोर्ट आणि पाईल्सचे बांधकाम करण्यास परवानगी मिळाली. व त्यासाठी नौगियर आणि कोचेलिन यांनी आर्किटेक्ट स्टीफन सॉवेस्त्रेला प्रकल्पाचे काम करण्यासाठी नेमले.



आयफेल टॉवर

पाया घालण्यासाठी दगडी पाट्या तयार करण्याचा प्रस्ताव सॉवेस्त्रेने दिला. स्तंभ आणि प्रथम स्तराला जोडण्यासाठी स्मारकाच्या कमानी, प्रत्येक स्तरावर काचेच्या भिंतीचे मोठे हॉल, संपूर्ण रचना समजवण्यासाठी वेगवेगळ्या सजावटीच्या वैशिष्ट्यांसाठी बल्बच्या आकाराचे डिझाइन सरतेशेवटे हा प्रकल्प सोपा करण्यात आला. परंतु पायथ्यावरील मोठ्या कमानीसारख्या काही घटकांना कायम ठेवण्यात आले.

तब्बल २२ महिन्यानंतर पूर्ण झालेले हे काम पॅरिसच्या बाहेरील बाजूस असलेल्या लेवल लोईस पेर्रेट येथे असलेल्या आयफेलच्या कारखान्यात सर्व घटक तयार केले गेले होते. टॉवर बांधण्यासाठी १,००० तुकड्यांची प्रत्येक रचना आणि मोजणी करण्यात आली, त्यास दहा मिलीमीटरचा अचूकतेचा शोध लागला आणि त्यानंतर प्रत्येकी पाच मीटर नवीन तुकडे तयार केले. जोडकामाची एक टीम ज्यांनी महान धातूच्या वायडक्ट प्रकल्पांवर काम केले होते, अश्या १५० ते ३०० कामगारांनी उंचावरील या विशाल सेटला एकत्र करण्याची जबाबदारी पार पाडली.

टॉवरचे सर्व धातूचे तुकडे रिबेट्सद्वारे एकत्र जोडले आहेत. टॉवर बनवण्याच्या वेळी बांधकामाची एक शास्त्रशुद्ध पद्धत अवलंबली आहे. प्रथम ते तुकडे बोल्टच्या साहाय्याने कारखान्यात एकत्र केले गेले, नंतर थर्मली असेम्बल्ड रिवेटसह एकेक जागी ठेवले गेले, जे थंड झाल्यावर संकुचित होते जेणेकरून अगदी घट्ट व बळकट होते. प्रत्येक रिवेट असेम्बल करण्यासाठी चार माणसांची आवश्यकता असे. एक  रिवेट तापवत असे, दुसरा जागेवर ठेवत असे, तिसरा त्याला आकार देणारा आणि चौथा त्याला स्लेजे हॅमरने ठोकत असे. असे टॉवर वर वापरलेल्या २५००५००,००० रेव्हीटस पैकी फक्त रिवेट्स एक तृतीयांश थेट साईटवर घातले गेले.

त्या काळात उपलब्ध असणारी प्राथमिक साधने व तंत्रज्ञान लक्षात घेता पायाभरणी व पाण्याखाली काम करण्याच्या पद्धती व इतर जोडणी उभारणी ही अतिशय कलात्मक, कौशल्यपूर्ण पद्धतीने जलद गतीने करण्यात आली. त्या काळी त्याची कालमर्यादा रेकॉर्ड मानले जाते. टॉवरची जोडणी ही अचूकतेचे उदाहरण आहे. बांधकाम होण्यापूर्वीच हा टॉवर बराच चर्चेचा विषय ठरला होता. कला आणि साहित्य जगातील सर्वात मोठ्या नावे असलेले रेकॉर्ड या टॉवरने त्या काळी आपल्या नावे केले व एक प्रचंड लोकप्रिय जागतिक आश्चर्याच्या रूपाने हा टॉवर पॅरीसच्या सौंदर्यात मानाचा उत्कृष्ट नमुना म्हणून राजधानीच्या अगदी मध्यभागी स्थित आहे. उत्कृष्ट सौंदर्याचा ठसा, त्याची रचना, आकार व वास्तुकला नमुना म्हणून अभ्यासणे उपयुक्त ठरेल.

**प्र.१ खाली दिलेल्या मुदद्यांच्या आधारे वास्तूंची सविस्तर माहिती लिहा.**

१) हाजिया सोफीया

२) आयफेल टॉवर

(अ. स्थान, ब. माध्यम, क. आकारमान, ड. वैशिष्ट्ये)

**प्र.२ जोड्या जुळवा.**

| अ.क्र. | अ गट | ब गट |
|---|---|---|
| १ | हाजिया सोफिया | पोपचे अधिकृत खाजगी प्रार्थना मंदिर |
| २ | सिस्टेन चॅपेल | बायझंटाईन काळातील चर्च |
| ३ | पिसाचा झुकता मनोरा | जगातील आश्चर्यात गणना |
| ४ | आयफेल टॉवर | इटली देशातील प्रसिद्ध वास्तू |

**प्र. ३ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या बादशाहच्या प्रेरणेने हाजिया सोफिया हे चर्च बांधले गेले?

२) हाजिया सोफिया या चर्चच्या घुमटाच्या तळाशी प्रकाशासाठी किती खिडक्यांची योजना करण्यात आली आहे?

३) हाजिया सोफिया या चर्चमध्ये बायझंटाईन वास्तुकलेचा परमोत्कर्ष झालेला दिसतो असे का म्हटले जाते?

४) सिस्टेन चॅपेलच्या भव्य छतावर जगप्रसिद्ध फ्रेस्कोचित्र रंगवण्याऱ्या कलाकाराचे नाव काय?

५) सिस्टेन चॅपेलच्या छतावर कोणत्या विषयाचे चित्रण करण्यात आलेले आहे?

६) ‘अंतिम निवाडा’ हे प्रसिद्ध फ्रोस्को चित्र कोणत्या वास्तूत आहे?

७) सिस्टेन चॅपेलमधील चित्रातील मानवाकृती या शिल्प सदृश व घनतापूर्ण का आहेत?

८) सिस्टेन चॅपेलमधील प्रसिद्ध चित्रांची नावे लिहा.

९) आयफेल टॉवर उभारणाऱ्या वास्तुविशारदांची व अभियंत्यांची नावे सांगा.

१०) पॅरिसमधील सर्वात मोठ्या वास्तूचे नाव सांगा.

११) इटली देशातील पिसा शहरातील प्रसिद्ध वास्तूचे नाव काय?

१२) झुकत्या मनोऱ्याच्या वास्तुरचनाकाराचे नाव काय?

१३) पिसाचा झुकता मनोरा किती मजली आहे?

१४) सप्तसुरांशी निगडीत सात घंटा कोणत्या वास्तूत आहेत?

१५) गॅलिलिओने गुरुत्वाकर्षण सिद्ध करण्यासाठी प्रयोगासाठी कोणती वास्तू निवडली होती?

१६) कोणती वास्तू रोमनेक्स शैलीचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखली जाते?

१७) झुकत्या मनोऱ्याच्या तळ मजल्याला किती कमानी आहेत?

१८) झुकत्या मनोऱ्याचा झुकाव थांबवण्यासाठी झुकावाच्या विरुद्ध बाजूस पायात किती टन शिसे भरण्यात आले?

१९) मोझाईक्सच्या सजावटीचे वैशिष्ट्य कोणते होते?

२०) जडाव चित्रे कशी तयार केली जात असत?

२१) बायझंटाईन काळात फारशी मूर्तिशिल्पे का आढळत नाही?

२२) ‘बोनॅनो पिझाने’ वास्तुरचनाकाराने कोणती वास्तू बांधली?

# ५ पाश्चात्य शिल्पकला

**मायकेल अँजेलो :**

(जन्म : १४७५, मृत्यु : १५६४)



मायकेल अँजेलो

मायकेल अँजेलो यांचा जन्म इटलीमधील फ्लॉरेन्स शहराजवळ काप्रेसे या गावी झाला. हा श्रेष्ठ इटालियन चित्रकार, मूर्तीकार व वास्तुकार होता. यांशिवाय तो लेखन व काव्य या विषयातही प्रवीण होता. मानवी देहाच्या अचूक प्रमाणबद्धतेतील सौंदर्याचे निकष त्याच्या कलाकृतीत जाणवतात. मानवाकृतीच्या चित्रणावर त्याने आपले सर्व लक्ष केंद्रित केले होते. त्याने चित्रात धार्मिक विषयाचा पुरेपूर उपयोग केला. तो मूळचा शिल्पकार, परंतु त्याने सिस्टेन चॅपेल या चर्चच्या छतावर रंगवलेली फ्रेस्को चित्रे जगप्रसिद्ध आहेत. त्याच्या चित्रात सुदृढ व जोशपूर्ण मानवाकृतींचे चित्रण दिसते. मायकेल अँजेलो हा उत्तम वास्तुविशारदही होता. व्हॅटिकन सिटीतील सेंट चर्च जगातील सर्वात मोठे चर्च आहे. वीस वर्षे या चर्चचे काम सुरू होते. या चर्चमध्ये छायाप्रकाशाचा मनोहर खेळ निर्माण करून काही भाग आकर्षक करण्याचे काम मायकेल अँजेलो यांनी केले.

समकालीन कलावंतात 'आधुनिक तंत्राचा' वापर करणारा आगळावेगळा कलावंत म्हणून त्याच्या कलाकृतींचा खास वेगळाच अभ्यास करावा लागतो. तंत्र आधुनिक वापरले तरीही विषय मात्र धार्मिकच निवडले हे त्याचे एक वैशिष्ट्य होय.

त्याची उत्फूर्त प्रतिमा मात्र शिल्पकलेतच अधिक बहरून आलेली आढळते. एकापेक्षा एक अशी उत्कृष्ट शिल्पे त्याच्याकडून झाली. मायकेलच्या छिन्नीचा स्पर्श ज्या ज्या दगडाला झाला तो प्रत्येक दगड जिवंत झाला असे म्हणावे लागेल.

एका प्रसिद्ध प्रार्थना मंदिरातील 'रात्र व दिवस' व 'उषःकाल आणि संध्या' ही काळ आणि जीवनाची क्षणभंगुरता प्रतीकात्मकतेने दाखवणारी स्त्री-पुरुषांची शिल्पे आहे. ही शिल्पे म्हणजे कलेचे अप्रतिम नमुने आहेत. 'द डाईंग स्लेव्ह' सारखी मरणाच्या दारातील गुलामांची दुःखे पाषाणातून व्यक्त झालेली दिसतात. मायकेल अँजेलोने अशी अनेक गुलामांची शिल्पे केली आहे. बहुतेक गुलाम त्रिभंगाकृतीत आहेत. त्यांची शरीररचना, स्नायू, त्यांचे इतर सर्व अवयव यांचे शिल्प मायकेल अँजेलोच्या गुणांची साक्ष देतात.

मोझेस, डेव्हिड, पिएता, मरणोन्मुख गुलाम, गिलियानो व लॉरेन्झी मोदिची इत्यादी शिल्पे अजोड आहेत.

**मोझेस :**

'सेंट पीटर्स चर्च इन व्हिंकोला' येथील मोझेसची पाषाणाची मूर्ती पाहणाऱ्यापेक्षा भव्य व उंच आहे. तिचा सारा रुबाब वेगळाच आहे. प्रत्येक अवयवांतील वैशिष्ट्ये स्पष्ट व बोलकी आहेत. करारी मुद्रा, छातीवर रुळणारी दाढी पाहणाऱ्याच्या मनात एक प्रकारचा आदर निर्माण करते. या शिल्पात मोझेसला संत दाखवण्यापेक्षा उग्र, रागीट सेनापतीच्या स्वरूपात दाखवले आहे. मोझेस हे संगमरवरी शिल्प अँजेलोच्या शिल्पसामर्थ्याचा प्रत्यय आणून देतो. मोझेसच्या मनातील खळबळ त्यांनी फार उत्कृष्टपणे दाखवली आहे.



शिल्प : मोझेस

**पिएता :**

**स्थान :–** सेंट पिटर्स चर्च

**माध्यम :–** संगमरवरी दगड

**कलाकार :–** मायकेल अँजेलो

**कालखंड :–** इ.स.१४९८

**वैशिष्ट्ये :** येशू ख्रिस्ताला क्रूसावरून खाली उतरवल्यावर मृत येशू ख्रिस्तास मेरीने मांडीवर घेतलेले आहे असे दृश्य या शिल्पात आहे. मेरीच्या मांडीवरील निष्प्राण ख्रिस्ताच्या देहाचे वास्तव शिल्पांकन मायकेल अँजेलोने केले आहे. मेरी ही ख्रिस्तापेक्षा तरुण दाखवली आहे. माता ही अमर असते. ती कधीही वयस्कर होत नाही. मूल कितीही मोठे झाले तरी त्याची काळजी ती घेत असते. आई ही भावना कधीच वयस्कर होऊ शकत नाही. ती शेवटपर्यंत तरुणच राहते, असे मायकेल अँजेलो यांचे मत होते. त्यानुसार त्यांनी या शिल्पात मेरी तरुण दाखवली आहे.




शिल्प : पिएता

या शिल्पातील माता मेरीही सुकुमार ख्रिस्ती धर्मप्रणित ‘कुमारी माते’ चीच आणि अभिव्यक्ती आहे. तिच्या चेहऱ्यावरील कमालीची सोशिकता आणि नितांत शांत भाव, काळजी, प्रेम याचे शिल्पांकन उत्कृष्ट आहे. ख्रिस्ताचे झालेले हाल, यातना, दु:ख याचे शिल्पांकन देहबोलीवरून स्पष्ट दिसून येते. संगमरवरातील हे शिल्प मायकेल अँजेलो यानेच तयार केलेल्या सेंट पिटर्स चर्चमध्ये सध्या पाहावयास मिळते.

**बर्निनी**

(जन्म : १५९८ मृत्यु : १६८०)



बर्निनी

बर्निनी हा पोपचा अधिकृत वास्तुकार होता. १७ व्या शतकात बरोक कलाशैलीचा तो सर्वार्थाने योग्य प्रतिनिधी गणला जातो. त्याने वास्तू, चित्र, शिल्प आणि सजावट या कला एकात्म बनवल्या. जो स्वत: या सर्व कलांत प्रवीण होता. वास्तूच्या घडणीत त्याने प्रकाशाला महत्वाचे व प्रतीकात्मक स्थान मिळवून दिले. वास्तूरचनेत वक्र रेषांचा अंतर्भाव केला. मायकेल अँजेलोचे सेंट पीटर्स चर्चमधील अपुरे काम त्याने पूर्ण केले व दर्शनी भागात वक्राकार पाखी बांधली. शिल्पकलेतही त्याने क्रांती घडवली. ‘सेंट थेरेसाची परमानंदावस्था’ हे शिल्प त्याने अद्‌भुत प्रकाशयोजनेद्‌वारे परिणामकारक घडवले आहे. कोर्नेरो चॅपेलमधील या शिल्पात छायाप्रकाश हा चित्राचा गुण प्रभावी ठरला आहे.

रंगभूमीवर नेपथ्यासारख्या अवकाश रचनेमुळे शिल्पात अभिप्रेत असलेली करुणामय भावावस्था जोरदारपणे आविष्कृत झाली आहे. वास्तूसमोर, बागेत किंवा चौकात शिल्पयुक्त कारंजी निर्माण करण्याची प्रथाही बर्निनीने सुरू केली. इ.स. १६४० च्या सुमारास त्याने उभारलेले ट्रिटॉन कारंजे उल्लेखनीय आहे.

### ट्रिटॉन कारंजे :

बरोक काळातील अष्टपैलू प्रतिमेचा कलावंत असलेल्या बर्निनी याने वास्तुकलेत अनेक नव्या गोष्टींचा अंतर्भाव केला. शिल्पयुक्त कारंजी ही त्यातील एक महत्त्वाची भर होय. इ.स. १६४० च्या सुमारास निर्मिलेले ट्रिटॉन कारंजे हे त्यांपैकीच एक होय. ग्रीक देव पॉसिडॉन याचा कनवाळू मुलगा ट्रिटॉन शंख फुंकत आहे. त्याच्या आजूबाजूला शिंपले व डॉल्फिन माशांच्या आकृती आहेत असे दृश्य मोठ्या मोहक रीतीने शिल्पित केले आहे. पोपचे माहात्म्य वाढवण्यासाठीच या कारंज्याची निर्मिती करण्यात आली हे स्पष्टपणे दिसून येते. शिल्पावरील मधमाशी ही पोपचे प्रतीक मानली जाते.



ट्रिटॉन कारंजे

### पाब्लो पिकासो


(जन्म : १८८१, मृत्यू : १९७३)



पाब्लो पिकासो

घनवाद कला प्रकाराचे जनक पाब्लो पिकासो यांना पाश्चात्य आधुनिक कला इतिहासाच्या प्रभावी बदलांच्या रूपातील महत्त्वाचा कलावंत मानतात. पिकासोच्या प्रायोगिक मनाला बहुधा त्यांच्या शिल्पांमध्ये सर्वात स्वातंत्र्य आणि खेळण्याची अभिव्यक्ती सापडली. असेंब्लेज शिल्पकलेचा शोधकर्ता म्हणूनही त्यांना ओळखले जातात. पिकासोच्या निर्मितीची ही बाजू १९६० च्या उत्तरार्धात लोकांपुढे आली. त्याच्याभोवती असलेल्या कोणत्याही वस्तूतून उदा. धातू, लाकूड, सिरॅमिक, कुंभारकामाच्या वस्तू तो शिल्पाकृती करू शकतो याची जाणीव त्या काळातील अन्य कलाकारांना झाली. शिल्पकलेतील अविस्मरणीय उदाहरणांपैकी शिकागोमध्ये सार्वजनिक ठिकाणी स्मारक रूपात असणारे भव्य शिल्प शहराचा अभिमान मानले जाते. सर्जनशील मनाने प्रत्येक नियम मोडून तोडून त्रिमितीय वर्तमानातील समजूतदारपणे उत्कृष्ट शिल्प निर्माण केले. अवकाश आणि घटक यांच्यातील संबंध शोधण्यासाठी मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग करून कलात्मकरीत्या द्विमितीय प्रयोगातून त्यांनी त्रिमितीतील घनवादी शिल्प निर्माण केले.

पिकासोच्या सुरुवातीस असेम्ब्लेज आणि बांधकाम या कल्पनेचे समर्थन करणारे मॉडेलिंगच्या पारंपरिक कलेपासून दूर गेले. त्यांच्या प्रसिद्ध कामांपैकी एक असलेल्या गिटारमध्ये तार, पुठ्ठा आणि कागदाच्या बनवलेल्या त्रि-आयामी वस्तूने हे स्पष्ट आहे. पिकासोने कोलाज तंत्र व स्क्रॅपमध्ये (जंककला) दररोजच्या वस्तूंचा समावेश केला व त्यातून सर्जनशील निर्मिती केली. अशा गोष्टींचा वापर होऊ शकत नाही आणि पारंपरिक साहित्य आणि माध्यमांची मर्यादा सोडता येत नाही असे नियम दर्शवतो. 'बुल हेड' या प्रसिद्ध शिल्पात पिकासोने सायकलचे सीट व हँडलच्या शीर्घ मांडणीतून सर्जनात्मक शिल्प मांडणी केली आहे. प्रसिद्ध चित्रकार पॉल सेझानच्या यांच्या निर्मितीतच पिकासोला त्यांच्या सर्जनशील कर्तृत्वाची गुरुकिल्ली सापडली. आदिम शिल्पकला आणि आफ्रिकन परंपरेकडे आकर्षित होऊन कल्पकतेने व सृजनशीलता येणे हे पिकासोच्या रूपात परिवर्तनाच्या सामर्थ्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. 'द गोट' हे एक लाइफ साइज शिल्प आणि 'द प्रेग्नेंट वुमन' शिल्पे उल्लेखनीय आहेत.



शिल्प : द गिटार



शिल्प : द गोट




शिल्प : बुल हेड



शिल्प : आऊल

## हेन्री मूर

(जन्म :१८९८ मृत्यु: १९८६)



हेन्री मूर

विसाव्या शतकातील अव्वल दर्जाचा व आघाडीचा शिल्पकार म्हणजे हेन्री मूर होय. हेन्रीचा जन्म १८९८ साली कॅसलफोर्ड (Castleford) या यॉर्कशायरमधल्या (Yorkshire) गावात झाला. त्याचे वडील खाणकामगार होते. त्याला लहानपणापासून शिल्पकार व्हायची इच्छा होती. इंग्लंडमध्ये असताना तिथल्या खडकांच्या रचनांचे निरीक्षण आणि अभ्यास करता करताच त्याच्यातल्या कलावृत्तीने उचल खाल्ली. तिथला निसर्ग हेन्रीच्या सर्जनशील वृत्तीला अतिशय प्रेरणादायी ठरला. हेन्रीमध्ये निसर्ग निरीक्षणाची आणि छोट्या छोट्या गोष्टींमध्ये सौंदर्य शोधण्याची विलक्षण वृत्ती होती. कधी त्याला हे सौंदर्य एखाद्या लहानशा दगडात दिसे. कधी एखाद्या प्राण्याच्या अवशेषात दिसे, तर कधी एखाद्या निष्पर्ण फांदीमध्येही दिसे.

याशिवाय काही विचित्र वाटणाऱ्या घटनाही हेन्रीच्या शिल्पकलेच्या प्रवासात प्रेरणादायी ठरल्या. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्याच्या आईला आर्थरायटीसचा त्रास होता. हेन्री अनेकदा तिची दुखरी पाठ चेपून देत असे. त्या वेळी त्याच्या हातांनी अनुभवलेल्या आईच्या मणक्याचा आकार त्याने 'द सीटेड वुमन' (The seated Woman) या शिल्पात उतरवला आहे. इ. स. १९५७ साली हेन्रीने हे शिल्प पूर्ण केले. शिल्प समोरून घडवणे जितके महत्त्वाचे, तितकेच पाठीमागूनही त्याचे तपशील महत्त्वाचे असतात याविषयी त्याचे ठाम मत होते.

त्याला त्याची कलाकृती एकाच वेळी अनेकांना बघता येईल अशा ठिकाणी ठेवायची असे म्हणून त्याची बहुतेक शिल्पे एखाद्या बागेत किंवा डोंगरावर ठेवलेली आढळतात. खुले आभाळ, हिरवळ आणि खडक यांच्या पार्श्वभूमीवरच्या या अजोड कलाकृती निसर्गाचाच भाग वाटतात.



शिल्प : 'द सीटेड वुमन'

त्याच्या शिल्पांतील मानवी देहाचे साधे, सरळ, भव्य व काहीसे भूमितीय रूप थक्क करून सोडते. हेन्रीच्या कलाकृतीमधून नेहमीच त्यांची स्वतःची खास शैली दिसते. त्याने शिल्पकलेत अनेक विषय हाताळलेले दिसतात. पण त्यातही निसर्ग आणि मानवी प्रतिमा जास्त आढळतात. कुटुंब या संकल्पनेवरचा विश्वास, श्रद्धा आणि आदर त्याच्या शिल्पांमधून ठायीठायी दिसतो.

आधुनिक शिल्पकलेचा प्रवाह हा चित्रकलेच्या प्रवाहाशी समांतर वाहताना दिसतो. आज चित्रकारांप्रमाणे शिल्पकारही संकेतांच्या बंधनातून स्वतःची सुटका करून घेत आहेत आणि प्रायोगिक शिल्पांची निर्मिती करण्यात व्यग्र आहेत.

## माझा अभ्यास

**प्र.१ टिपा लिहा.**

१) मायकेल अँजेलो

२) पिकासो

३) ट्रिटॉन कारंजे

४) हेन्री मूर

**प्र.२ जोड्या जुळवा.**

| अ.क्र. | अ गट | ब गट |
|---|---|---|
| १ | मायकेल अँजेलो | तीन संगीतकार |
| २ | बर्निनी | द सीटेड वुमन |
| ३ | हेन्री मूर | सेंट थेरेसाची परमानंदावस्था |
| ४ | पाब्लो पिकासो | दि लास्ट जजमेंट |

**प्र. ३ गाळलेल्या जागा भरा.**

१. मायकेल अँजेलोने ........... या चर्चच्या छतावर रंगवलेली फ्रेस्कोचित्रे जगप्रसिद्ध आहेत.

२. पिएता हे संगमरवरातील प्रसिद्ध शिल्प ...........या शिल्पकाराने घडवले आहे.

३. वास्तु, चित्र, शिल्प आणि सजावट या कला एकात्म बनवण्याचे काम ........... या वास्तुकाराने केल्या.

४. वास्तूसमोर, बागेत किंवा चौकात शिल्पयुक्त ........... निर्माण करण्याची प्रथा बर्निनीने सुरू केली.

५. पोपचे माहात्म वाढवण्यासाठी ........... कारंज्यांची निर्मिती करण्यात आली.

६. हेन्री मूरच्या शिल्पात ........... आणि ........... प्रतिमा जास्त आढळतात.

७. हेन्री मूर यांची बहुतेक ........... बागेत किंवा डोंगरावर ठेवलेली आढळतात.

८. शिल्प समोरून व तितकेच पाठीमागूनही घडवणे महत्वाचे असे ...........या शिल्पकाराचे ठाम मत होते.

**प्र.४. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'पिएता' कलाकृतीचे रसग्रहण लिहा.**

(स्थान, माध्यम, कलाकार, कालखंड, वैशिष्ट्ये)

**प्र. ५ एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) ट्रिटॉन कारंज्याच्या शिल्पावरील मधमाशी ही कशाचे प्रतीक होते ?

२) सायकलचे सीट व हॅन्डल वापरून पिकासोने कोणते शिल्प तयार केले ?

३) 'सेंट थेरेसाची परमानंदावस्था' हे प्रसिद्ध शिल्प कोणत्या शिल्पकाराने घडवले ?

४) बर्निनीने कोणत्या तीन कला एकात्म बनवल्या ?

# ६ पाश्चात्य चित्रकला


१७ व्या शतकात ‘बारोक कला’ व १८ व्या शतकात ‘रोकोको कला’ निर्माण झाल्या. नाट्यपूर्णता व अलंकारिकता ही कलेची खास वैशिष्ट्ये होती.

याच काळात छायाचित्रण (फोटोग्राफी) व मुद्रणकला यांचा शोध लागला. त्यामुळे कलावंतांनी स्वीकारलेल्या वास्तवदर्शी चित्रणाच्या ध्येयात काही स्वास्थ्य उरले नाही. मुद्रणकलेमुळे प्रसिद्ध कलाकृतीच्या छापील प्रती थोड्या किमतीत उपलब्ध होऊ लागल्या. शिवाय रंगांचे शास्त्रीय संशोधन होऊन रंगशास्त्रही प्रगत झाले. या सर्व परिस्थितीमुळे कलेच्या उद्दिष्टांत क्रांतिकारी बदल होणे अपरिहार्य झाले. वास्तववादी चित्रणाची मळलेली वाट सोडून कलाकार नव्या मार्गाचा शोध घेऊ लागले व नवेनवे प्रयोग करू लागले. या प्रयत्नातून आधुनिक कलाप्रवाहांचा जन्म झाला.

## १. आधुनिक कलाप्रवाह

**दृकप्रत्ययवाद (इंप्रेशनिझम) :**

१९ व्या शतकाच्या शेवटी युरोपात औद्योगिक क्रांती झाली. विविध शास्त्रीय शोध लागले. त्यात नवनवीन यंत्रांची निर्मिती झाली. त्यामुळे मानवी जीवन व सांस्कृतिक वातावरण यांत आमूलाग्र बदल झाला. त्याचा परिणाम झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीत कलाक्षेत्रातील पारंपरिक नियम व प्रमाणे यांच्यावरही झाला. नव्या युगाशी सुसंवाद राखणारी नवी कलात्मक भाषा निर्माण करण्याची गरज भासू लागली. कॅमेऱ्याच्या शोधामुळे वास्तववादी ॲकॅडेमिक कलाशैलीचे महत्त्व कमी झाले. परिणामी या कलावंतांना पारंपरिक शैलीला नवीन पर्याय शोधण्याची गरज भासू लागली. या सर्व घडामोडींमधूनच आधुनिक कलेचा जन्म झाला आणि सर्वप्रथम कलेच्या क्षेत्राला नवे वळण देणाऱ्या दृकप्रत्ययवादाचा जन्म इ.स. १८६० च्या सुमारास झाला.



क्लॉद मोने

‘क्लॉद मोने’ हा दृकप्रत्ययवादाचा प्रणेता मानला जातो. त्याने निर्माण केलेल्या ‘इंम्प्रेशन सनराईज’ या कलाकृतीवरून कलासमीक्षकांनी या शैलीला ‘इंप्रेशनिझम’ असे नाव दिले. या कलासंप्रदायामध्ये पुढील वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

१. या कलासंप्रदायामध्ये आपणास वस्तूंचे दर्शन, त्यावर पडणाऱ्या व त्यापासून परावर्तित होणाऱ्या प्रकाशामुळे घडते. म्हणून चित्रकाराने वस्तूचे चित्रण न करता, तिच्यावर पडलेल्या प्रकाशाचे चित्रण केले पाहिजे. म्हणजेच प्रकाशाच्या परिणामाला अधिक महत्व दिले पाहिजे.

२. नैसर्गिक प्रकाशाचा वस्तूवरील परिणाम शक्य तितक्या लवकर चित्रित केला पाहिजे. त्यांसाठी



चित्र : ‘इंम्प्रेशन सनराईज’

चित्रात घटकांचे संयोजन व रेखाटन बारकाव्यानिशी करण्याचा खटाटोप करू नये.

३. नैसर्गिक प्रकाशात रंग दिसतात. म्हणून दृकप्रत्ययवादी चित्रणात 'रंग व प्रकाश' या दोन गोष्टी महत्वाच्या आहेत.

४. शेवरूलने प्रतिपादन केलेल्या विरोधाभासाच्या आणि इतर रंगशास्त्रीय नियमांना अनुसरून रंगयोजना केली पाहिजे. निसर्गात काळा रंग नाही, म्हणून त्याचा वापर करू नये.

५. निसर्गातील रंग शुद्ध व तेजस्वी असतात. तसा परिणाम साधण्यासाठी रंगफलकावर रंगांचे प्रत्यक्ष मिश्रण न करता दोन शुद्ध रंगांचे लहानलहान ठिपके कॅनव्हासवर लावावेत. चित्र काही अंतरावरून पाहिल्यास त्याच्या मिश्रणातून तयार होणाऱ्या रंगाचा परिणाम साधला जातो. त्यामुळे रंगांची तेजस्विता कायम राहते.

६. वस्तूवरील प्रकाश व रंग यांशिवाय इतर गोष्टींकडे लक्ष न देता चित्रण करावे. यातूनच अप्रतिरूपवादाचा श्रीगणेशा झाला. रंगांच्या मुक्त वापरामुळे त्यातून आधुनिक कलेतील विविध कलासंप्रदायांची निर्मिती झाली.

७. दृकप्रत्ययवादातील प्रकाशाच्या परिणामाला दिलेल्या अधिक महत्वामुळे भावाविष्काराकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष झाले.

## आविष्कारवाद : (एक्सप्रेशनिझम)



एडवर्ड मुंक



चित्र : 'द क्राय' (एडवर्ड मुंक)

इ.स. १९१४ मध्ये जर्मनीत या वादाची निर्मिती झाली. दृकप्रत्ययवाद्यांनी भावनाविष्काराकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. त्याविरुद्ध उठाव करणाऱ्या व भावनाविष्कारावर भर देणाऱ्या कलावंतांनी या वादात चित्रनिर्मिती केली. आविष्कारवाद हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. जोरदार भावनिक आशय व्यक्त करणाऱ्या कोणत्याही कलाकृतीविषयी ही संज्ञा विशाल अर्थाने वापरली जाते. भावनांना महत्त्व देऊन चित्रनिर्मिती करण्यावर या कलावंतांचा भर होता. त्यांच्या मते 'भावनाविष्कार' हा कलाकृतीचा 'आत्मा' आहे. या आविष्कारवादाचा प्रणेता म्हणून एडवर्ड मुंकचा उल्लेख केला जातो. त्याचप्रमाणे व्हॅन गॉख व पॉल गोगॅ या रंगभरवादी कलावंतांनाही आविष्कारवादी मानले जाते.



व्हॅन गॉख



चित्र : 'व्हास विथ फिफ्टिन सनफ्लॉवर्स' (व्हॅन गॉख)


आविष्कारवादाची निर्मिती जर्मनीत झाली. जर्मन लोक हे भावनाप्रधान आहेत. त्यांच्या स्वभावानुसार काहीशा तर्क सामर्थ्यावर भर देणारी आणि जीवनातील तणावांचे, दु:खाचे दर्शन घडवणारी ही कला आहे आणि हीच आविष्कारवादाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या वादात रेषाप्रधान चित्रांची निर्मिती करून ती गडद रंगात, विशेषत: काळ्या व तपकिरी रंगाकडे जाणाऱ्या रंगांमध्ये रंगवलेली आहेत. या वादात मानवी जीवनातील दु:खी भावनांचे प्रकटीकरण आधी केलेले आहे. त्यामुळे यातील चित्रांचे विषय कारुण्य, तिरस्कार, संताप, अंध:कार व भय यांकडे झुकलेले दिसतात. त्याचप्रमाणे या वादातील रंगलेपन कुंचल्याच्या मोठमोठ्या जोरकस फटकाऱ्यांनी केलेले आहे. सौम्य व आनंदी भावनांचा



चित्र : 'स्टारी नाईट' (व्हॅन गॉख)

मनोहारी व गोंडस आविष्कार या वादात फारसा आढळत नाही. जीवनातील कष्टप्रद तणावांचा आविष्कार करणे हेच या वादाचे मुख्य ध्येय होते. आविष्कारवादाचे चित्रकारांच्या शैलीवरून दोन गट पडतात. (१) 'द ब्रिज ग्रुप' आणि (२)'द ब्ल्यू रायडर ग्रुप'. पहिल्या गटामध्ये हेकेल एमिलगोड व कर्चनर असे कलावंत होते तर दुसऱ्या गटात कॅंडेस्की, मार्क क्ले, मॅक्स बेकमन, एडवर्ड मुंक. या प्रसिद्ध कलावंतांनी नवीन प्रयोग करून पुढे 'केवलवादाची' मुहूर्तमेढ रचली. या वादातील एडवर्ड मुंकचे 'द क्राय' व व्हॅन गॉखचे 'स्टारी नाईट' या कलाकृती विशेष उल्लेखनीय आहेत.

## घनवाद : (क्युबिझम)



जॉर्ज ब्राक

आधुनिक युगातील एक महत्वाचा कलासंप्रदाय म्हणून घनवादाकडे पाहिले जाते. घनवादाची सुरुवात इ.स. १९०७-०८ मध्ये झाली आणि पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभापर्यंत हा वाद प्रभावशाली होता. या वादाचे आद्यप्रवर्तक म्हणून 'पिकासो'व 'ब्राक' हे ओळखले जातात. दृकप्रत्ययवादातील चित्रकार 'पॉलसेझाँ' याने केलेल्या लिखाणातून पिकासो व ब्राँक यांना प्रेरणा मिळाली. सेझाँचा मृत्यू १९०६ मध्ये झाला. त्यानंतर या दोन्ही चित्रकार मित्रांनी त्या लिखाणांवरून चित्र निर्मितीला प्रारंभ केला. घनवादात भौमितिक यथार्थ दर्शनाला

फाटा दिला. वस्तूंच्या आकारांच्या पृथक्करणातून मिळणाऱ्या विविध पातळ्या व तिच्या बाजूंचे लहान लहान तुकडे यांचे केलेले संयोजन, करड्या रंगापेक्षा वेगळ्या रंगात रंगवण्यावर त्यांनी भर दिला. डोळ्यांना जसे दिसते तसे चित्रण मात्र त्यात नाही.



**चित्र : 'स्टील लाईफ' (जॉर्ज ब्राक)**

घनवादाच्या निर्मिती अगोदर वस्तूचे चित्रण एकाच दृष्टिकोनातून वस्तू जशी दिसेल तसे केले जात होते. परंतु त्या पद्‌धतीत बदल केल्यामुळे घनवादाचे दोन प्रकार पडले.

१. **विश्लेषणात्मक घनवाद :** या प्रकारामध्ये वस्तूच्या रूपाचे विविध पातळ्यांवर अनेक तुकड्यांमध्ये पृथक्करण करून त्यांनी एकत्रितपणे रचना करण्यात येत असे. वस्तूचे तुकड्यांमध्ये रूपांतर करताना भौमितिक आकारांचा वापर केला जात असे. या तुकड्यांनी आच्छादन पद्‌धतीने रचना केली जात असे. या प्रकारात पिकासोचे 'मा जॉली' व ब्राकचे 'स्थिरचित्रे' ही चित्रे प्रसिद्‌ध आहेत.

२. **संश्लेषणात्मक घनवाद :** या दुसऱ्या प्रकारात एक वस्तू वेगवेगळ्या बाजूंनी पाहिली असता ती जशी दिसेल, तशी तिची सर्व रूपे एकाच आकृतीत दर्शवणारी 'तीन संगीतकार' ही कलाकृती उल्लेखनीय आहे.

घनवाद्यांनी आकारांच्या मूळ रचनेचे अनेक तुकडे केल्यामुळे आणि ते भौमितिक आकारात मांडल्यामुळे त्यात वास्तवता राहिली नाही व त्यातील सौंदर्य कमी झाल्यामुळे आकर्षकता निर्माण होण्यासाठी या चित्रांमध्ये उजळ व आकर्षक रंगांचा वापर केलेला आहे. त्यातील रंगलेपन मात्र सपाट पद्‌धतीने केलेले आहे. या नव्या तंत्राचा वापर करून पुढे अनेक कलाकृती निर्माण करण्यात आल्या. २० व्या शतकातील बदलेल्या परिस्थितीला अनुरूप व शोभणारी कला त्यांना निर्माण करायची होती. या उद्‌देशाने त्यांनी कलाक्षेत्रात नवे नियम निर्माण केले व नवी तंत्रे शोधून त्याचा उपयोग चित्रनिर्मितीत केला. घनवादात पिकासो व ब्राक यांच्याखेरीज ग्रिस, लेजे, व्हिलॉ, मार्सेलदुशॉ या कलावंतांनी चित्रनिर्मिती केली. घनवादातून 'कोलाज' हे नवे तंत्र निर्माण झाले.

पाब्लो पिकासो हा मूळचा स्पॅनिश कलावंत नंतर फ्रान्समध्ये स्थायिक झाला. तो अलौकिक प्रतिभेचा महान कलावंत होता. बालपणापासून चित्रकलेची आवड असलेला पाब्लो पिकासो वयाच्या सोळाव्या वर्षीच मान्यवर व्यावसायिक चित्रकार म्हणून प्रसिद्‌ध झाला. चित्रकाराबरोबरच तो शिल्पकार आणि मुद्राचित्रकारही होता. या प्रत्येक क्षेत्रात त्याने नवनवीन प्रयोग करून वैशिष्ट्यपूर्ण अशी कलानिर्मिती केली. वास्तववादी आणि पारंपरिक चित्रशैलीत चित्रनिर्मितीची सुरुवात करून नंतर त्यात काळानुरूप बदल करून नव्या वाटा शोधल्या त्यात काही काळ त्याने दृकप्रत्ययवादामध्ये चित्रनिर्मिती केली. कालांतराने १९०७ च्या सुमारास ब्राक या मित्रासोबत घनवादाची निर्मिती केली. घनवादातील 'तीन संगीतकार' 'मा जॉली' या त्यांच्या कलाकृती उल्लेखनीय ठरल्या. यासोबतच आविष्कारवाद, अप्रतिरूपवाद, अतिवास्तववाद अशा अनेक कलासंप्रदायांमध्ये निर्मिती करून शेवटी त्याने आपली स्वतःची खास शैली निर्माण केली. इ.स. १९३७ साली जर्मनीने

स्पेनमधील ग्वेर्णिका शहरावर केलेल्या बॉम्ब हल्ल्याचा निषेध करण्याच्या हेतूने केलेली आविष्कारवादी शैलीतील 'ग्वेर्णिका' ही पिकासोची राजकीय विषयावरील कलाकृती जगप्रसिद्ध झाली.



चित्र : 'ग्वेर्णिका' (पाब्लो पिकासो)

त्याच्या चित्रशैलीवर आफ्रिकन शिल्पांचा प्रभाव जाणवतो. या प्रभावातील त्याची 'ॲव्हेन्यूच्या स्त्रिया' ही कलाकृती उल्लेखनीय आहे. पिकासोने वस्तूकडे अनेक दृष्टिकोनांतून पाहिल्यावर दिसणारी दृश्ये, एकाच चित्रात संयोजित करण्याचे नवीन तंत्र कलाक्षेत्रात रूढ केले. रंग, शाई या पारंपरिक माध्यमांखेरीज रंगीत पेपर, वर्तमान पेपर, रंगीत दोरे वगैरे वस्तू चिकटवून कलानिर्मिती करता येते, हे पिकासोने 'कोलाज' तंत्रातून दाखवून दिले. आपल्या आयुष्याची ७० हून अधिक वर्षे व्यावसायिक कलावंत म्हणून यशस्वीपणे घालवणाऱ्या पिकासोने २० व्या शतकातील आधुनिक कलाकृतींच्या विक्रीतून करोडो डॉलर्सची संपत्ती मिळवली. आयुष्यात भरपूर सुख, संपत्ती व नावलौकिक मिळवणाऱ्या पिकासोचे राहणीमान मात्र सामान्य होते.



चित्र : 'थ्री म्युझिशियन' (पाब्लो पिकासो)

## अतिवास्तववाद : (सर्रिॲलिझम)

२० व्या शतकातील अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी कलाप्रणाली म्हणून या वादाकडे पाहिले जाते. इ.स १९२३ मध्ये या वादाची निर्मिती झाली. या वादाची निर्मिती पहिल्या महायुद्धाच्या सुमारास निराश व भ्रमनिरास झालेल्या चित्रकारांनी 'दादावाद'या नव्या कलाप्रवाहास जन्म दिला. युद्धकाळात सामाजिक व नैतिक सुव्यवस्थेला काहीच अर्थ उरलेला नव्हता. नकारात्मक भूमिकेतून त्यांनी चित्रनिर्मिती केली. त्यांच्या या दादावादातूनच अतिवास्तववादाची निर्मिती झाली.

साल्व्हेदोर–द–दाली आणि मॅक्स या चित्रकारांनी अतिवास्तववाद निर्माण केला. या वादाच्या निर्मितीमागे 'फ्राईड' या मानसशास्त्रज्ञाचा मानवी मनाचा विचार महत्त्वाचा मानला गेला. त्याच्या मते मानवी मनाचे दोन भाग पडतात :

१) अंतर्मन

२) बाह्यमन

या दोन्ही मनांची सांगड घालून या वादातील चित्रकारांनी चित्रनिर्मिती केली. प्रत्यक्षात दिसणाऱ्या सृष्टीमागे लपून बसलेले रहस्य किंवा सत्य शोधून, त्यावर सखोल संशोधन करून नवनिर्मिती करणे हे या वादाचे मुख्य ध्येय होते. त्यामुळे या वादातील चित्रे स्वप्नातील घटनांवर आधारित वाटतात, तसेच प्रत्यक्षात कधीही न घडणाऱ्या घटनांचे चित्रण या वादात केलेले दिसते. या चित्रांमध्ये वास्तवतेपेक्षा वेगळ्या घटनांना व रचनेला महत्त्व दिलेले आहे. प्रेक्षकांच्या अंतर्मनावर परिणाम करणाऱ्या घटनांचे यात चित्रीकरण केलेले आहे. या वादातील चित्रे दिशाभूल करणारी वाटतात



साल्व्हेदोर – द – दाली

आणि मुख्य म्हणजे या चित्रामध्ये कधीही एकत्र न येणाऱ्या वस्तूंचे व घटनांचे चित्रण केल्यामुळे ही चित्रे वास्तववादी असूनही अवास्तव वाटतात. या चित्रांच्या दृश्यांची पूर्तता फक्त स्वप्नातच होऊ शकते. उदा. कपाटातून निघणारी रेल्वे, घड्याळाला लागलेल्या मुंग्या, मानवी चेहऱ्याची फळांची डिश. या वादातील चित्रांमध्ये अत्यंत बारकाव्यांनिशी रेखाटन व वास्तववादी पद्धतीने रंगकाम केलेले आहे. या वादात साल्व्हेदोर– द– दाली व मॅक्स बरोबर शागल, चेरीको, पॉक क्ले या कलावंतांनी चित्रनिर्मिती केली. तसेच चित्रकलेबरोबर काव्य, साहित्य तत्वज्ञान या कलांमधून हा वाद विकसित झालेला दिसतो. दालीचे 'स्मृती सातत्य' हे चित्र या वादातील प्रसिद्ध चित्र मानले जाते.



चित्र : स्मृती सातत्य (पर्सिटन्स ऑफ मेमरी),
(साल्व्हेदोर – द – दाली)

## २. पाश्चात्य चित्रकार

**रेम्ब्रॉट : (जन्म १६०६ – मृत्यू १६६९)**



रेम्ब्रॉट

१७ व्या शतकातील हा डच चित्रकार व आम्ल रेखनकार जागतिक कलेतील महत्वाचा श्रेष्ठ कलाकार होता. जगातील निरनिराळ्या कला संग्रहालयांत त्याची ५०० ते ६०० चित्रे आजही पाहावयास मिळतात. बारोक कला पूर्णत्वाला नेण्याचे कार्य त्याने केले. त्याच्या कलाशैलीवर अन्य कलावंतांचा प्रभाव दिसत नाही. तत्कालीन प्रथा सोडून त्याने आपल्या आवडीप्रमाणे धार्मिक व पौराणिक विषय, निसर्गदृश्ये, एका व्यक्तीची व सामूहिक व्यक्तिचित्रे, प्राणी अशी अनेक प्रकारची चित्रे रंगवली. त्याच्या शैलीत वास्तवता आणि आध्यात्मिकता याचे अपूर्व मिश्रण झालेले आढळते. मानव व मानवी भावना यांविषयीची त्यांची आस्था 'शरीर शास्त्रांचा पाठ', 'कापड व्यापारांचा संघ', 'रुग्णाची शुश्रुषा करणारा ख्रिस्त' व अन्य आम्लारेखित मुद्राचित्रांतून दिसून येते. त्याचे खरे वैशिष्ट्य त्याच्या चित्रातील प्रकाशयोजनेत आहे.

अंधाऱ्या अवकाशात अचानक पडणाऱ्या प्रखर प्रकाशाच्या झोताने त्याच्या चित्रात नाट्यपूर्ण



चित्र : नाईट वॉच (रेम्ब्रॉंट)



पीटर पॉल रुबेन्स

परिणामकारकता दिसते. काही ठिकाणी हा प्रकाशाचा खेळ नैसर्गिक व सुसंबद्‌ध आहे. 'सामूहिक व्यक्तिचित्रे' व 'शरीरशास्त्र पाठ' हे शल्य विशारदांचे व्यक्तिचित्रही प्रसिद्‌ध आहेत. 'नाईट वॉच' हेही असेच एक सांघिक व्यक्तिचित्र होय. या चित्रामुळे प्रतिष्ठित लोकांची नाराजी ओढवून घेतली व त्याला विपन्नावस्था प्राप्त झाली. त्याने साठपेक्षा अधिक आत्म-व्यक्तिचित्रे रंगवली. तरुणपणापासून वृद्‌धत्वापर्यंतची ही चित्रे म्हणजे त्याचे जणू आत्मचरित्र होय. त्याच्या सर्व चित्रात प्रकाशझोताखेरीज इतर भाग गडद छायेचा असतो. परंतु छायेतील परावर्तित प्रकाश व रंग सूचित करण्याचे त्यांचे कौशल्य केवळ अप्रतिम आहे. वातावरणाच्या निर्मितीमध्येही त्याचा हातखंडा होता.

### पीटर पॉल रुबेन्स : (जन्म १५७७ – मृत्यू १६४८)

पीटर पॉल रुबेन्स हा १७ व्या शतकातील म्हणजे बारोक कालखंडातील महान कलावंत होय. तो चित्रकार, वास्तुकार, सजावटकार व राजकारणी होता. त्याने इंग्लंड, फ्रॉन्स व स्पेनमध्ये राजदूत म्हणून काम केले. १६०८ मध्ये त्याची फ्लँडर्सचा दरबारी चित्रकार म्हणून नेमणूक झाली. त्याने सर्व प्रकारच्या विषयांवर चित्रे काढली. धार्मिक व पौराणिक प्रसंग, लोकजीवन, व्यक्तिचित्रे, निसर्गदृश्ये अशा सर्व प्रकारचे विषय त्याने यशस्वीपणे हाताळले. मायकेल अँजेलो, राफाएल, तिशियन, तिलोरेत्तो अशा पूर्वसूरींच्या कलाशैलींमधील निवडक वैशिष्ट्ये आत्मसात करून त्याने आपली प्रारंभिक शैली बनवली होती. चर्चच्या सुशोभनासाठी आणि प्रासादातील भिंतींच्या व दालनांच्या अलंकरणासाठी उपयुक्त अशी स्वतःची खास शैली त्याने विकसित केली. अत्यंत गतिमान संयोजन, मानवाकृतींच्या रेखाटनातील जोरदार आवेश व जोश, छायाप्रकाशातील तीव्र विरोध, भारदस्त चित्रण आणि चैतन्य ही त्याच्या शैलीची वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या स्टुडिओमध्ये अनेक शिष्य व मदतनीस होते. त्याला भरपूर काम मिळत असे. कामाची पहिली आखणी त्याने केल्यावर मदतनीस ते काम त्याच्या देखरेखीखाली पूर्ण करीत आणि शेवटचा टप्पा तो स्वतः पूर्ण करत असे. त्याला मिळालेल्या मोठ्या कामांपैकी लक्झेंबर्ग प्रासादासाठी प्रचंड आकारांची २१ भव्य चित्रे ही

त्यापैकी आहेत. ही चित्रे सध्या पॅरिसच्या लूव्र म्युझियममध्ये आहेत. अँटवर्प कँथेड्रलमधील ख्रिस्ताचे क्रूसारोह व क्रूसावरोहण ही दोन चित्रे त्यातील शारीरिक हालचाल, तिरकी कर्णाची रचना, कृत्रिम पद्धतीने प्रकाशाचा उपयोग व कारुण्यपूर्ण भावाविष्कार याबद्दल प्रसिद्ध आहेत. ल्युसिपसच्या मुलींचे अपहरण, फेल्ट हॅट, ॲमेझॉन, स्त्रियांशी युद्ध ही चित्रे गतिमान व जोशपूर्ण संयोजन आणि छाया प्रकाशाचे समर्थ चित्रण याबद्दल प्रसिद्ध आहेत. युरोपातील निरनिराळ्या म्युझियममध्ये त्यांची ३००० हून अधिक चित्रे पाहावयास मिळतात.

### फेल्ट हॅट :

बारोक काळातील अग्रगण्य फ्लेमिश चित्रकार पीटर पॉल रुबेन्स याचे हे प्रसिद्ध व्यक्तिचित्र होय. त्याची मेहुणी सुसाना फोर्मेंट हिच्या चेहऱ्यावर डोक्यावरील फेल्ट हॅटची छाया पडली आहे असे हे दृश्य आहे. छायेत दिसणारा परावर्तित प्रकाशाचा परिणाम दाखवण्यात रुबेन्स कमालीचा यशस्वी झाला आहे. चेहऱ्यावरील अर्धस्फुटित हास्य, चेहऱ्याच्या मांसल भागावरील शीत व चमकदार वर्ण आणि हॅट, पोशाख व पार्श्वभूमी रंगवण्यातील सफाईदार जोश यामुळे हे व्यक्तिचित्र अविस्मरणीय झाले आहे.



चित्र : फेल्ट हॅट (रुबेन्स)

### लिओनार्दो-द-विंची : (१४५२-१५१९)



लिओनार्दो द विंची

उच्च प्रबोधन काळातील हा सर्वश्रेष्ठ कलावंत. वैज्ञानिक, तत्त्वचिंतक, चित्रकार, शिल्पकार, अभियंता, संगीतकार अशा सर्व शास्त्रांत व कलांमध्ये निपुण असलेला हा कलावंत अलौकिक प्रतिभेचा महामानव होता. त्यांचा जन्म फ्लॉरेन्सजवळील विंची खेड्यात झाला. लहानपणी ते गायन व वादन कलेत तरबेज होते. ज्ञानप्राप्तीची तीव्र इच्छा व सतत वेगवेगळ्या क्षेत्रातील आवड व कुतूहल यामुळे ते प्रयोगशील बनले. फ्लॉरेन्समध्ये लिओनार्दोनी १० ते १२ वर्षे शास्त्र आणि कला यांची उपासना केली. त्यांच्या मते काव्य व कला ही वास्तवाच्या ज्ञानाचे साधन आहे. विज्ञानातील सत्य व कलेतील सत्य सारख्याच तोलाचे आहेत आणि त्याचा पाया सूक्ष्म अचूक, निसर्ग निरीक्षणात आहे असे मत होते.

विविध क्षेत्रातील कार्याबरोबरच त्यांनी काही चित्रे रंगवली. लष्करी अभियंता म्हणून काम करताना त्यांनी मानवी देहाचे शवविच्छेदन विपुल प्रमाणात केले व शरीरशास्त्राचा परिपूर्ण अभ्यास केला. चित्रकला क्षेत्रातील कामावर ते समाधानी नव्हते. त्याच्या चित्रात शास्त्रीय व भावनात्मक प्रवृत्तींचा सुरेख संगम आढळतो. मोनालिसा या चित्रातील सूक्ष्म भावदर्शन हे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांच्या चित्रातील संयोजन सूचिच्या


आकाराचे आहे. छायाप्रकाश व सूक्ष्म छायाभेद त्याचा सूचक वापर त्यामुळे निर्माण झालेली वस्तूंची गोलाई व घनता दाखवण्याचे त्यांचे कसब अप्रतिम होते. चित्रातील यथार्थ दर्शन सखोलता, अनेकार्थ सूचकता, प्रवाही वक्राकार रेखांकन, नेटक्या व सुबक व्यक्तिरेखा, सौम्य रंगछटा त्यातून एक आकार दुसऱ्या आकारात सहजपणे मिसळणारी 'फ्युमातो' ही रंगलेपनाची पद्धत ही त्यांच्या चित्राची वैशिष्ट्ये आहेत. विविध विषयांवरील त्यांनी तयार करून ठेवलेल्या सुमारे ५००० पृष्ठांच्या टिपणवह्या पुढच्या पिढ्यांना प्रेरक व मार्गदर्शक असणारा ठेवा होता. ते रेखाटन व लेखन डाव्या हातांनी, तर रंगकाम दोन्ही हातांनी करत असत. मोनालिसा, द लास्ट सपर (येशूचे अंतिम भोजन) ह्या त्यांच्या सर्वात जास्त गाजलेल्या कलाकृती आहेत. 'सेंट ॲन समवेत कुमारी माता व बालक येशू' या विषयावर त्यांनी अनेक रेखाटने केली. याशिवाय त्यांनी फ्लॉरेन्समधील अनेक व्यक्तींची व्यक्तिचित्रे तयार केली. फ्रेंच राजा पहिल्या फ्रॉन्सिसने त्यांना अग्रणी चित्रकार वास्तुकार, यंत्रज्ञ म्हणून मानाचा किताब दिला. त्यांच्या शैलीचा तरुण चित्रकारांवर खूपच प्रभाव पडला. 'प्रस्तरापुढील मदोन्ना' हे लिओनार्दोने रंगवलेल्या काही चित्रांपैकी एक प्रमुख चित्र होय. प्रगत प्रबोधकाळातील शैलीचे तंत्र या चित्रातून दिसते. मागील प्रस्तरांच्या गडद पार्श्वभूमीतून खडकांची घडण व भूरचना याविषयींचे त्यांचे संशोधनात्मक निरीक्षण दिसून येते. अत्यंत बारकाव्यांनिशी त्यांनी ते चित्रित केले आहे. अवकाशातील घनतापूर्वक आकृत्या, चेहऱ्यावरील प्रसन्न भाव, नाजूक अवयव, मुलांच्या शरीरावरील मार्दव व गोंडसपणा ह्याचे चित्रण अप्रतिम आहे. मदोन्नाच्या अधांतरी हातामुळे चित्रात त्रिमिती अभ्यास निर्माण होतो. शंकुच्या आकारासारखी त्रिकोणी रचना, पार्श्वभूमीत मिसळणारा चित्र आकाराचा काही भागांमुळे हे चित्र म्हणजे जगातील उत्कृष्ट चित्रांपैकी एक अशी गणना होते.

### येशूचे अंतिम भोजन

**माध्यम–** टेंपरा पद्धतीने तैलरंग

**कलाकार –** लिओनार्दो-द-विंची

**कालखंड –** इ.स.१४८७ ते १४९८



चित्र : येशूचे अंतिम भोजन (लिओनार्दो द विंची)

लिओनार्दो-द-विंची यांनी हे भव्य भित्तिचित्र मिलान येथील चर्चच्या भोजनगृहात (मठाच्या भिंतीवर) रंगवले आहे. हे चित्र ११ वर्षांच्या मेहनतीनंतर पूर्ण झाले. टेंपरा पद्धतीने रंगवलेल्या या चित्रात तैलरंगाचा वापर केला आहे. या चित्रात येशू ख्रिस्त आपल्या जवळच्या बारा शिष्यांसमवेत भोजन घेत आहे असे दाखवले आहे. यांपैकी एक शिष्य माझा विश्वासघात करणार आहे, असे भाकीत येशू ख्रिस्ताने वर्तवले आहे. त्यामुळे हे अंतिम भोजन आहे. हे ऐकताच त्याचा परिणाम वेगवेगळ्या शिष्यांवर वेगवेगळ्या प्रकारे झाला आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील आश्चर्य, राग, दु:ख या संमिश्र भावभावनांचे व मानसिक तणावाचे चित्रण यात दिसते. या चित्रातील रचना, रंगयोजना, छायाप्रकाश व येशूच्या व्यक्तिमत्त्वाला दिलेले महत्त्व, चित्रातील खोली, यथार्थ दर्शन, सपाट पृष्ठभागावरील संकल्परचना ही या चित्राची वैशिष्ट्ये आहेत. मानवी स्वभावांचे दर्शन, व्यक्तींचे हावभाव, छायाप्रकाशाचा नाट्यमय वापर, धार्मिकतेचा आविष्कार यामुळे हे चित्र जगप्रसिद्ध आहे. लिओनार्दोने प्रयोगशील वृत्तीतून हे चित्र रंगवले आहे. त्यामुळे आता या चित्रातील रंग फिके पडले आहेत. परंतु संयोजनाच्या दृष्टीने हे चित्र अप्रतिम आहे.

**मोनालिसा :**

**माध्यम :** तैलचित्र

**कलाकार :** लिओनार्दो-द-विंची

**कालखंड –** १५०१ ते १५०४

**वैशिष्ट्ये :** फ्लॉरेन्समधील फ्रान्सेस्को देल जोकोन्दो या व्यापाऱ्याच्या पत्नीचे हे व्यक्तिचित्र कलेच्या क्षेत्रात अजरामर झाले आहे. व्यक्तिचित्रणातील ही सर्वोच्च सिद्धी मानली जाते. मोनालिसाच्या चेहऱ्यावरचे गूढ, मंद स्मितहास्य हा आजतागायत संशोधनाचा व लेखनाचा विषय बनला आहे. मोनालिसाच्या डोळ्यातील विलक्षण चैतन्यपूर्ण जिवंत भाव, त्यातून डोकावणारे सूक्ष्म कारुण्य, हातांचे व त्यावरील वस्त्रांच्या चुण्यांचे अत्यंत कौशल्यपूर्ण सुबक रेखाटन, चित्राला दिलेली निसर्गाची-काल्पनिक गिरी प्रदेशाची गूढरम्य पार्श्वभूमी, धूसर बाह्यरेषा व सौम्यसर रंगातून स्कुमातो तंत्राचा वापर ही या चित्राची वैशिष्ट्ये आहेत. गडद रंगाचे मोनालिसाचे वस्त्र व मागील निसर्गातील मंद प्रकाशात मोनालिसाच्या चेहऱ्यावरील उजळ कांती याचे चित्रण यथार्थ दर्शनाची सखोलता व मोनालिसाच्या चेहऱ्यावरील गूढ हास्यामुळे हे चित्र जगप्रसिद्ध आहे. हे चित्र सध्या पॅरिसच्या लूव्र म्युझियममध्ये पाहावयास मिळते.



**चित्र : मोनालिसा (लिओनार्दो द विंची)**

## माझा अभ्यास

**प्र.१ एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. दृकप्रत्ययवादाचा प्रणेता कोण?

२. रंग व प्रकाश या दोन महत्वाच्या गोष्टी कोणत्या वादाच्या चित्रणात दिसतात?

३. दृकप्रत्ययवादात भावविष्काराकडे का दुर्लक्ष झाले?

४. 'इंप्रेशनिझम' हे नाव कसे दिले गेले?

५. आविष्कारवादाचा प्रणेता म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?

६. आविष्कारवादाच्या दोन गटांची नावे कोणती?

७. काळ्या व तपकिरी रंगाकडे जाणाऱ्या रंगांत कोणत्या वादाची चित्रे रंगवलेली आहेत?

८. आविष्कारवादातील ऍडवर्ड मुंक व व्हॅन गॉखच्या प्रसिद्ध कलाकृतींचे नाव काय?

९. पिकासो व ब्राक हे कोणत्या वादाचे आद्यप्रवर्तक म्हणून ओळखले जातात?

१०. कोणत्या चित्रकाराच्या लेखनातून पिकासो व ब्राक यांना प्रेरणा मिळाली ?

११. कोणत्या शैलीत विश्लेषणात्मक व संश्लेषणात्मक हे प्रकार विशेष आढळतात?

१२. विश्लेषणात्मक घनवादातील दोन प्रसिद्ध चित्रांची नावे कोणती?

१३. घनवादातून कोणते नवे तंत्र निर्माण झाले?

१४. साल्व्हेदोर दाली व मॅक्स या चित्रकारांनी कोणता वाद निर्माण केला?

१५. अतिवास्तववादातील साल्व्हेदोर दालीच्या प्रसिद्ध चित्राचे नाव काय?

१६. जागतिक कलेतील महत्वाचा आम्ल रेखनकार म्हणून कोणता कलाकार श्रेष्ठ समजला जातो?

१७. रेम्ब्रॉट याने कोणती कला पूर्णत्वाला नेण्याचे कार्य केले?

१८. पीटर पॉल रुबेन्स हा कोणत्या कालखंडातील महान कलावंत होता?

१९. पीटर पॉल रुबेन्स याने स्वतःची अशी कोणती खास शैली विकसित केली?

२०. 'ग्वेर्णिका' हे प्रसिद्ध चित्र कोणत्या महान कलावंताचे आहे?

**प्र. २ जोड्या लावा.**

| 'अ' गट (कलाकार) | 'ब' गट (प्रसिद्ध कलाकृती) |
|---|---|
| १. पीटर पॉल रुबेन्स | स्थिरचित्रे |
| २. रेम्ब्रॉट | स्मृती सातत्य |
| ३. क्लॉद मोने | तीन संगीतकार |
| ४. एडवर्ड मुंक | स्टारी नाईट |
| ५. व्हिन्सेंट व्हॅन गॉख | द क्राय |
| ६. पिकासो | इंप्रेशन सनराईज |
| ७. साल्व्हेदोर – द – दाली | नाईट वॉच |
| ८. ब्राक | ल्युसिपसच्या मुलीचे अपहरण |

**प्र. ४ टीपा लिहा.**

१. अतिवास्तववाद

२. आविष्कारवाद

**प्र ५. रसग्रहणात्मक टीप लिहा.**

१. रात्रीचा पहारा (नाईट वॉच)

२. फेल्ट हॅट

# कला शिक्षणातील व्यवसाय वाटा

कलाशिक्षणाचे अभ्यासक्रम, कलासाहित्य आणि भौतिक सुविधा इत्यादी आवश्यक बाबींमध्ये सातत्याने काळानुरूप बदल होत आहेत. जागतिक पातळीवरील नवनवे शोध व तंत्रज्ञान यांमुळे कलाक्षेत्राचे आधुनिकीकरण झाले आहे. त्यामुळे औद्योगिक आणि व्यावसायिक पातळीवर रोजगाराच्या मिळणाऱ्या असंख्य संधी कलाकारांना उज्ज्वल भविष्य मिळवून देतील यात शंका नाही.

नोकरीपेक्षाही व्यावसायिक शिक्षण आणि क्षेत्र मोठे आहे हे अनेकांना आता पटायला लागले आहे. चित्र, शिल्प, गायन, वादन, उपयोजित कला व इतर कलांच्या क्षेत्रांत आधुनिक तंत्रज्ञानामुळे व्यवसायाच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत.

आज मोठ्या प्रमाणात वाढणारे औद्योगिकीकरण व होणाऱ्या आर्थिक उलाढालींच्या पार्श्वभूमीवर मार्केटिंग व ॲडव्हर्टायझिंगच्या क्षेत्रात रोजगाराच्या खूपच संधी उपलब्ध आहेत. मुंबई, ठाणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर यांसारख्या मोठ्या शहरांतून देशी- विदेशी जाहिरात जाळेही कार्यरत आहे. वृत्तपत्रे, मासिके, टीव्ही चॅनेल्स, रेडिओ चॅनेल्स, पोस्टर्स, होर्डिंग्ज इत्यादी जाहिरात माध्यमे व त्यांचे आधुनिक स्वरूप पाहता कार्पोरेट क्षेत्रातील अनेक उत्पादने व सेवा, ग्राहकांना जाहिरातींद्वारे आकर्षित करताना दिसतील. या विविध माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या जाहिरातींचे संकल्पन (डिझायनिंग) कल्पकतेने करणारे कुशल कलाकार, अर्थात उपयोजित चित्रकार (ग्राफिक डिझाईनर्स) यांना सध्या मोठ्या संधी प्राप्त होत आहेत. ॲनिमेशन, वेब- इंटरफेस डिझाईनिंग, इंडस्ट्रियल प्रेझेंटेशन इत्यादी अनेक सेवांकरिता ग्राफिक डिझाईनशिवाय पर्याय नाही. त्यामुळे उपयोजित कलाशिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. क्रिएटिव्ह जाहिरातींद्वारे सामाजिक गरजा व अपेक्षांची दखल घेऊन, त्यासंदर्भातील समस्या सोडवून, विक्री प्रक्रिया गतिशील ठेवण्यात उत्पादक यशस्वी झालेले दिसतात. त्यामुळे एकूणच सर्व क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढालीही होत आहेत.

चित्रकलेच्या क्षेत्रात पेंटिंग व्यवसायाबरोबरच, विविध पब्लिक सेक्टर्समध्ये फ्रीलान्स कामे उपलब्ध आहेत. दूरदर्शनसह अनेक खाजगी चॅनेल्समध्ये कामे मिळतात. अनेक प्रकाशनांना आर्टिस्टची गरज असते. ॲनिमेशनसाठी अनेक आर्टिस्टची आवश्यकता असते. स्वतंत्र 'सिझनेबल' व्यवसाय या लोकांना करता येतात. जसे दिवाळीत आकाशकंदील बनवणे, गणेशोत्सवात मखर बनवणे, नवरात्रात सजावटी करणे, लग्नाच्या सीझनमध्ये स्टेज रंगवणे, सजवणे, म्यूरल्स करणे, सिरॅमिक डिझाईन्स बनवणे, लग्नपत्रिकांचे डिझाईन्स, साड्यांचे डिझाईन्स, शर्टींगचे डिझाईन्स बनवणे इत्यादी.

थोडक्यात या क्षेत्रात पदार्पण केलेल्या व्यक्तींना जे करायचं आहे ते त्यांना करता येऊ शकते. गिफ्ट आर्टिकल्स, फ्रेम्स बनवणे, लॅण्डस्केप आर्टिस्ट, पोर्टेट आर्टिस्ट, कंटेम्परारी आर्टिस्ट, रिप्लिका बनवणारा आर्टिस्ट, रिस्टोरेशन करणारा आर्टिस्ट, टॅटू आर्टिस्ट, क्रिएटिव्ह आर्टिस्ट अक्षरशः स्वतःमध्ये असलेले कौशल्य आणि व्यावसायिक नियोजन यांच्या समन्वयातून ह्या क्षेत्रातील व्यक्ती स्वतंत्र व स्वावलंबी बनू शकते.

शिल्पकलेच्या क्षेत्रालादेखील अलीकडच्या काळात फारच महत्त्व प्राप्त झालेले आहे. 'शिल्पकला' या मुख्य शीर्षकाखाली अनेक प्रकारचे कलाकार एकत्र येऊ शकतात. त्यात माती, प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती

बनवणारे मूर्तीकार हे वर्षभर चालणारा व्यवसाय करून स्वावलंबी झालेले आहेत. मूर्तीचे रंगकाम करणारे, दगडांवर कोरीवकाम करणारे, स्प्रे पेंटिंग करणारे, वास्तववादी काम करणारे, अमूर्त काम करणारे, अर्ध उठाव काम करणारे अशा विविध तंत्रातील शिल्पकार, धातूकाम करणारे मूर्तीकार, स्टेज डिझायनिंग करणारे आर्टिस्ट, फायबरमध्ये काम करणारे, म्यूरल, टेराकोटा, कोल्ड सिरॅमिक अशा विविध तंत्राचा माध्यमांचा उपयोग करून या क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्वतःची एक आगळीवेगळी ओळख निर्माण करता येते.

उपयोजित कलाक्षेत्राच्या बाबतीत Sky is the limit असे म्हटले जाते. कलेचे उपयोजन करण्याची शक्यता जिथे शक्य आहे ते सर्व काही या क्षेत्रांमध्ये मोडते. ग्रीटिंग कार्डपासून तर स्टेज डिझायनिंगपर्यंत साऱ्याच गोष्टी या क्षेत्रात मोडतात.

वृत्तपत्रीय क्षेत्रासाठी रेखांकनकार, अक्षर सुलेखनकार, पेज ले-आऊट आणि डिझायनिंग आर्टिस्ट, ग्राफिक डिझायनर, सिम्बॉल डिझायनर, व्यंगचित्रकार, टायपोग्राफर, फोटोग्राफीतील मॉडेल फोटोग्राफी, इंडस्ट्रियल फोटोग्राफी, स्टील फोटोग्राफी, वृतपत्रीय फोटोग्राफी, फंक्शन फोटोग्राफी, इव्हेंट फोटोग्राफी, क्राईम फोटोग्राफी अशा अनेक क्षेत्रांत छायाचित्रकार म्हणून स्वतःची ओळख निर्माण करता येते. संगणकीय तंत्रज्ञानाने तर अक्षरशः थक्क केले आहे. 'कॉम्प्युटर ग्राफिक्स' या मुख्य विषयांतर्गत अनेक उपक्षेत्रांमध्ये व्यावसायिक स्थान पक्के करता येते.

प्रिंटिंग क्षेत्र हे उपयोजित कलेतील महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. विविध पृष्ठभागांवर निरनिराळ्या शाईने छपाई करण्याचे क्षेत्र प्रचंड मोठे आहे. हे क्षेत्र प्रत्येक इच्छुकाला स्वावलंबी बनवते. अंतर्गत गृह सजावट या विभागात विविध प्रदर्शनांची आयोजणे, त्यांच्या रचना, मांडणी आणि सजावटीसाठी विविध विभाग बनले आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की, या क्षेत्रामध्ये अनेक संधी वाट पाहत असतात. त्यामुळे या क्षेत्रात मेहनत करण्याची तयारी असेल तर प्रत्येक सूर्योदय हा त्या कलाकाराचाच असेल असे म्हटल्यास वावगे होणार नाही.



# कला शिक्षणातील संधी

## कलाशिक्षणातील संधी :

सध्या मोठ्या प्रमाणात मिळणारा रोजगार व व्यावसायिक वातावरण यामुळे समाजाचा कलाविषयक दृष्टिकोन चांगल्या अर्थाने बदललेला दिसतो. राज्यातील शिक्षित, सुसंस्कृत समाज व आर्थिक केंद्रीकरणामुळे कलाक्षेत्र व कलाशिक्षण संदर्भातील अनेक बाबींचा विकास होत आहे. माहिती तंत्रज्ञान, नवनवे शोध आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर कलाशिक्षणाला आज असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईपासून ते राज्याच्या जिल्हा-तालुका स्तरापर्यंत कलाशिक्षणाच्या संधी उपलब्ध आहेत.

कलाशिक्षणातील संगणकाचा अंतर्भाव, कलाविषयक मांडणी, रचना व संकल्पनांना कलाटणी देणारा ठरला. इंटरनेटद्वारे उपलब्ध असलेला माहितीचा प्रचंड साठा व साधता येणारा जागतिक संवाद यामुळे कलाशिक्षण व त्यासंदर्भातील समग्र बाबींची आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण सहजसाध्य होत आहे.

कला अभ्यासक्रमात दृश्यकलेत (Visual Art) 'रंग व रेखा आणि कला' (Drawing And Painting), शिल्पकला (Modeling And Sculpture) या विषयांतील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. याशिवाय 'कलाशिक्षक', 'कलाशिक्षण' व मूलभूत कलाशिक्षणाचे अभ्यासक्रमही राबवले जातात. चित्रणकला, ॲनिमेशन, वेब डिझायनिंग, गेम डिझायनिंग, प्रॉडक्ट डिझायनिंग, इंटरफेस ॲन्ड प्रेझेंटेशन डिझायनिंग अशा अनेक विषयांतील कला अभ्यासक्रम हे प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी या स्वरूपात उपलब्ध आहेत. कलाशिक्षणातून एम. फिल. व पी. एच. डी. अभ्यासक्रमांतर्गत कलाविषयात संशोधनाच्या संधीही उपलब्ध होत आहेत.

कलेविषयी पाल्याची आवड व त्यांच्यातील सुप्त कलागुण बालवाडी ते प्राथमिक शिक्षण या टप्प्यावरच जाणवू लागतात. शाळा, शिक्षक, पालक व समाज या माध्यमातून बालकांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडत असेत. महाराष्ट्रात प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षणात चित्रकला, हस्तकला, संगणक प्रशिक्षण यांसारख्या विषयांचे ज्ञान कार्यानुभवातून दिले जाते. विद्यार्थ्यांना इतर शालेय विषयांसोबत कलाविषयाची निवड करून उच्च कलाशिक्षणाकडे वाटचाल करता येते.

राज्यात कला संचालनालयाद्वारे 'एलिमेंटरी' व 'इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा' शालेय व खाजगी संस्थांच्या माध्यमातून राज्य पातळीवरून मोठ्या प्रमाणात राबवल्या जातात. पुढील उच्च कलाशिक्षण प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना या परीक्षांचा निश्चितपणे लाभ होतो. इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कला संचालनालयाद्वारे राबवण्यात येणारा एक वर्षाचा मूलभूत अभ्यासक्रम (Foundation Course) हा आदर्श पायाभूत शिक्षणक्रम विद्यार्थ्यांना उच्च कलाशिक्षणाच्या पुढील संधी उपलब्ध करून देतो. मूलभूत अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना उपयोजित कला, रंगरेखा कला व शिल्पकला अशा पदविका (जी.डी.आर्ट) अभ्यासक्रमांपैकी कोणत्याही एका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येतो. जी. डी. आर्ट या चार वर्षाच्या पदविका अभ्यासक्रमानंतर एक वर्षाचा डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशन (Dip. A. Ed.) हा पोस्ट डिप्लोमा पूर्ण करता येतो. उच्च कलाशिक्षण संस्थांमध्ये डिप. ए. एड. झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष प्राधान्याने संस्थेत घेतले जात आहे. त्याचप्रमाणे आर्ट मास्टर (A.M.) हा एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रमही ए. टी. डी. व जी. डी. आर्ट नंतर पूर्ण करता येतो.
एम. ए. असलेल्या व्यक्तीस कला संस्थांमधून सेवा

बढती व सुधारीत वेतनश्रेणीचा लाभ होत आहे. या व्यतिरिक्त १२ वीनंतर विद्यार्थ्यांना दोन वर्षांचा आर्ट टिचर्स डिप्लोमा (A.T.D.) हा पदविका अभ्यासक्रमही निवडता येतो.

महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, उत्तर महाराष्ट्र येथील विद्यापीठे व समकक्ष संस्थांमध्ये उच्च कलाशिक्षणाचे विविध अभ्यासक्रम राबवले जातात. त्यापैकी एक वर्षाचा बॅचलर ऑफ फाईन आर्ट (B.F.A.) ब्रीज कोर्सद्वारे जी.डी.आर्ट डिप्लोमा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र व दर्जा मिळवता येऊ शकतो. याशिवाय उपयोजित कला, रंग व रेखा कला व शिल्पकला या प्रमुख विषयांतील चार वर्षांचा बॅचलर ऑफ फाईन आर्ट (B.F.A.) हा पदवी अभ्यासक्रम १२ वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेद्वारे निवडता येतो. बी. एफ. ए. पदवीधरकांना मास्टर ऑफ फाईन आर्ट (M.F.A.) या पोस्ट ग्रॅज्युएट पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेता येतो. १२ वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुंबईतील आय.आय.टी. बॉम्बे या पवईस्थित (I.D.C.) केंद्राद्वारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलाशिक्षण घेता येते. बॅचलर ऑफ डिझाईन (बी. डेस.) व मास्टर ऑफ डिझाईन (एम. डेस.) अशा पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणाबरोबर आय. डी. सी. च्या माध्यमातून कलाविषयक संशोधनाकरता पीएच.डी. अभ्यासक्रमात प्राधान्य दिले जाते. राज्यात उच्च कलाशिक्षण संस्था वाढत असतानाच केवळ महिलांसाठी कलाशिक्षण देणारे एस.एन.डी.टी. विद्यापीठही कार्यरत आहे. दृक कला विषयातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांबरोबरच एम. फील. व पी.एच.डी असे संशोधन अभ्यासक्रमही या विद्यापीठात अनेक वर्षांपासून यशस्वीपणे राबवले जात आहेत. कलाक्षेत्रातील पुरुष व महिला कलाकारांना समान संधी उपलब्ध असून सर्जनशील, संगणककुशल, संवादक्षम व माहिती तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून सातत्याने अपडेट असणाऱ्या कलाकारांची विविध क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडून निवड होताना आढळून येते.

'ग्लोबलायझेशन' च्या पार्श्वभूमीवर कला शिक्षणात व कलाक्षेत्रात सातत्याने आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रात कलाशिक्षण तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेले दिसते. कलाविषयक साक्षरतेची विशेष दखल घेऊन महाराष्ट्राने हायटेक कला शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आहे. कलाशिक्षणातून बालविकास घडवतानाच महाराष्ट्राने उच्च कलाशिक्षण व औद्योगिकीकरण यांचा समन्वय साधून जागतिक स्तरावर अनेकविध क्षेत्रांत कुशल व तज्ज्ञ कलाकरांना संधीचे दालन उपलब्ध करून दिले आहे.



# प्रात्यक्षिक विषय

## १. चित्रकला (Drawing)

| अ. क्र. | उपघटक | विषय |
|---|---|---|
| १. | सूक्ष्म रेखांकन | विविध झाडांची पाने, फुले |
| २. | सूक्ष्म रेखांकन | विविध वस्तूंचे रेखांकन |
| ३. | निसर्गनिर्मित घटकांचे रेखांकन | सिमला मिरचीचे पेन्सिलच्या साहाय्याने रेखांकन करून एका टोनमध्ये पेन्सिल शेडिंग करा.. |
| ४. | निसर्गनिर्मित घटकांचे रेखांकन | पेन्सिलच्या साहाय्याने केळ्याचे सूक्ष्म रेखाटन करून पेन्सिलने छायाप्रकाश दाखवा. |
| ५. | मानवनिर्मित घटकांचे रेखांकन | पेन्सिल व खोडरबर या वस्तूंचे रेखाटन करून छायाप्रकाश दाखवा. |
| ६. | मानवनिर्मित घटकांचे रेखांकन | रेषांच्या कमी व अधिक उठावातून ग्लासचे काळ्या रंगाने रेखाटन करा. |
| ७. | निसर्गनिर्मित व मानवनिर्मित घटकांचे रेखांकन | लिंबू आणि काडेपेटी यांचे काळ्या रंगाच्या साह्याने रेखाटन करा. |
| ८. | निसर्गनिर्मित व मानवनिर्मित घटकांचे रेखांकन | झाडाचे पान व चेंडू यांचे काळ्या रंगाच्या साह्याने रेखाटन करा. |
| ९. | प्लॅस्टरचे नमुने | नाक, कान व डोळे यांचे सूक्ष्म रेखांकन करा. |
| १०. | परस्पेक्टिव्ह | वन पॉईंट परस्पेक्टिव्हवर आधारित स्वाध्याय |
| ११. | परस्पेक्टिव्ह | टू पॉईंट परस्पेक्टिव्हवर आधारित घरांचे रेखाटन (पेन्सिल/पेन/पेस्टल कलर/इंकपेन) कोणतेही एक माध्यम वापरा. |
| १२. | प्रसंगचित्रे | इनडोअर/ आऊटडोअर |
| १३. | वस्तू रेखाटन | विविध प्रकारच्या वस्तूंचे रेखाटन करा व रंगवा. |
| १४. | स्मरण चित्र | दैनंदिन जीवनातील प्रसंग/भारतीय सण/उत्सव |
| १५. | कल्पनाचित्र | स्वकल्पनेने एका विषयावर चित्र तयार करा. |

| | | |
|---|---|---|
| १६. | रेखाटने | मानवाकृतींची व वस्तूंची रेखाटने करा. (प्रत्येक प्रात्यक्षिकात ५ ते १० रेखाटनांचा संच अपेक्षित आहे.) |
| १७. | रेखाटने | |
| १८. | स्थिर चित्र | मग, ग्लास, बकेट, फळ, ड्रेपरी (या वस्तूंची मांडणी करून सुलभीकरण पद्धतीने रंगवा.) |
| १९. | स्थिर चित्र | ब्रश, डिश, पोस्टर कलरची मांडणी करा. वस्तूंचा आकार, घाट यांच्या प्रमाणबद्धतेसह रेखाटन करा व छायाभेद, पोत यांचा वापर करून जलरंगात रंगवा. |
| २०. | स्थिर चित्र | प्लेट, डबा, चौकोनी ठोकळा किंवा बॉक्स व ड्रेपरी यांची मांडणी करा. वस्तूंचा आकार, घाट यांच्या प्रमाणबद्धतेसह रेखाटन करा व छायाभेद, पोत यांचा वापर करून रंगवा. |
| २१. | स्थिर चित्र | सुरई, कोणतेही फळ, प्लेट, ड्रेपरी यांची मांडणी करा. वस्तूचा व फळाचा आकार, घाट यांच्या प्रमाणबद्धतेसह रेखाटन करा. छायाभेद व पोत यांचा वापर करून रंगवा. |

**टीप :–**

- वर्षभरात २० प्रात्यक्षिक कार्ये आवश्यक.
- वरील प्रात्यक्षिक कार्यांत सरावासाठी वेळेनुसार अधिक चित्रनिर्मितीही करता येईल. तसेच विषय व माध्यमांतही विविधता आणता येईल.
- प्रात्यक्षिक कार्यांसाठी १/४ इंपेरियल (२८ × ३८ सेमी) आकाराचा ड्रॉईंग कागद वापरावा.



# २. संकल्पचित्र व रंगकाम (Design and Colouring)

वर्षभरात संकल्पचित्र व रंगकाम या विषयाचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करताना प्रामुख्याने पुढील घटकांचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

- रंगसंगती
- अलंकारीक संकल्प रचना
- भित्तीचित्रणावर आधारीत संकल्प
- कल्पकतेवर आधारित संकल्प

| अ. क्र. | बाह्याकार | घटक | रंगसंगती |
|---|---|---|---|
| | **(१) रंगसंगतीवर आधारित प्रात्यक्षिक कार्य** | | |
| १. | १५ × २० सेमी | नैसर्गिक घटक | विरोधी रंग – उच्च छटा |
| २. | १० सेमी त्रिज्येचे वर्तुळ | भौमितिक घटक | शीत रंग – निच्च छटा |
| ३. | १८ × २२ सेमी | मानवनिर्मित घटक | विभक्त विरोधी रंसंगती |
| ४. | १० सेमी बाजूचा षटकोन | आपल्या नावातील अक्षरे | संबंधित रंगसंगती |
| ५. | २० × २० सेमी | पक्ष्याचे अलंकारिक आकार | त्रिरंग संवाद |
| | **(२) अलंकारिक रचनाकृती (पारंपरिक संकल्प)** | | |
| ६. | १५ × २० सेमी | टेबल टॉप | ऐच्छिक |
| ७. | १८ × १८ सेमी | हातरूमाल | ऐच्छिक |
| ८. | १७ × १७ सेमी | फरशी | ऐच्छिक |
| ९. | उंची २४ × रुंदी १५सेमी | टेबल लॅम्प | ऐच्छिक |
| १०. | १० सेमी त्रिज्येचे वर्तुळ | डिश | ऐच्छिक |
| | **(३) भित्तीचित्रणावर आधारित प्रात्यक्षिक कार्य** | | |
| ११. | १२ सेमी त्रिज्येचे वर्तुळ | मंदिर | विषयानुसार |
| १२. | १५ × २२ सेमी | बालक मंदिर | विषयानुसार |
| १३. | १२ × २८ सेमी | उपहारगृह (हॉटेल) | विषयानुसार |
| १४. | १८ × १८ सेमी | नाट्यगृह | विषयानुसार |
| १५. | १२ × २० सेमी | चित्रकला वर्ग/महाविद्यालय | विषयानुसार |
| | **(४) कल्पनाशक्तीवर आधारित कार्य** | | |
| | भविष्यातील वाटचालीसाठी स्पर्धा परीक्षांच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती विकसित करण्याच्या हेतूने नावीन्यपूर्ण विषयांची निवड करणे. | | |

| | |
|---|---|
| १६. | आपल्या कल्पकतेने पुढील २५ वर्षांनंतर विद्यार्थ्यांचे शालेय दप्तर कसे असेल हे रेखाटा व रंगवा. |
| १७. | पुढील ५० वर्षांनंतरची मोटरसायकल कशी असेल याचे आपल्या कल्पकतेने रेखाटन करा व रंगवा. |
| १८. | पुढील ३० वर्षांनंतर मुलांच्या किंवा मुलींच्या पोषाखाचे रेखाटन व रंगकाम करा. |
| १९. | कोणत्याही एका वाहनाचे चाक तुमच्या कल्पकतेने रेखाटून त्यावर नक्षीकाम व रंगकाम करा. |
| २०. | तुमच्या स्वप्नातील घराचे किंवा इमारतीचे रेखाटन व रंगकाम करा. |

**टीप :–**

(१) प्रात्यक्षिक कार्यासाठी $\frac{१}{४}$ इंपेरिअल (२८ × ३८ सेमी) आकाराचा ड्रॉईंग पेपर वापरावा.

(२) प्रात्यक्षिक कार्यात रंगकामाचा चांगला परिणाम साधण्यासाठी जलरंग (पारदर्शक/अपारदर्शक), पेस्टल, क्रेऑन्स इत्यादी रंगमाध्यमांचा स्वतंत्र किंवा एकत्रितपणे वापर करावा.

(३) सौंदर्यवृद्धीच्या दृष्टीने रंगकामात पोतनिर्मिती करावी.

(४) वर्षभरात किमान १८ ते २० प्रात्यक्षिक कार्य वर्गकामात अपेक्षित आहेत. या संपूर्ण वार्षिक कामाला वर्षाअखेर २० पैकी गुण असतील.




# ३. चित्रात्मक संकल्प (Pictorial Composition)

| क्र. | घटक | उपघटक |
|---|---|---|
| १. | **चित्रकलेचे मूळ घटक** | (१) रंग, रेषा, आकार, छायाभेद, पोत या घटकांचा वापर करून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** १५ × २० सेमी **माध्यम :** इंक पेन, शाई<br>(२) निसर्गनिर्मित आकार व भौमितिक आकारांचा वापर करून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** २० × २० सेमी **माध्यम :** सुयोग्य<br>(३) मानवनिर्मित आकार व अलंकारिक आकारांचा वापर करून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** १८ × २० सेमी **माध्यम :** जलरंग<br>(४) अमूर्त आकार (केवलाकार) यांचा वापर करून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** २० × २० सेमी **माध्यम :** सुयोग्य<br>(५) अमूर्त आकार किंवा भौमितिक आकारांचा वापर करून संकल्प तयार करणे व कोलाज तंत्राचा उपयोग करणे.<br>**आकार :** १८ × १८ सेमी **माध्यम :** न्यूज पेपर, रंगीत पेपर |
| २. | **संकल्पाची मूलतत्त्वे** | (१) **पुनरावृत्ती :** नैसर्गिक घटकांचा वापर करून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** १८ × १८ सेमी **माध्यम :** पोस्टर कलर्स<br>(२) **उत्सर्जन :** आकाश, सूर्य, पाणी, प्रकाश या घटकांचा वापर करून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** २० × २० सेमी **माध्यम :** सुयोग्य<br>(३) **तोल व लय :** मानवाकृती, प्राणी आणि झाडे यांचा वापर करून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** १७ × १७ सेमी **माध्यम :** मिक्स<br>(४) **बदल व प्रमाण:** मानवनिर्मित व निसर्गनिर्मित घटकांचा वापर करून संकल्प तयार करणे. रंगकामात विविध पोतांचा वापर करणे.<br>**आकार :** २५ × २० सेमी **माध्यम :** सुयोग्य<br>(५) भौमितिक आकार व अलंकारिक आकारांचा वापर करून संकल्प तयार करणे. **(संकल्पाची मूलतत्त्वे)**<br>**आकार :** २० × २० सेमी **माध्यम :** सुयोग्य |

| | | |
|---|---|---|
| ३. | मुद्राचित्र | (१) **मुद्रा चित्र :** दोरा तसेच पुठ्ठ्याचा वापर करून अमूर्त किंवा नैसर्गिक आकाराची संकल्प निर्मिती करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** शाई, जलरंग<br>(२) **मार्बलिंग (तरंग चित्र) :** याचा उपयोग करून सृजनात्मक पद्धतीने संकल्प निर्मिती करणे.<br>**आकार :** सुयोग्य **माध्यम :** वॉटरप्रूफ इंक, ऑईलपेंट<br>(३) **ठसे काम :** निसर्गातील घटकांचा वापर करून, ठसे घेऊन त्यापासून संकल्प तयार करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** क्रेऑन्स, रंगीत पेन्सिल<br>(४) **ठसे काम :** पुठ्ठ्याचे भौमितिक व अलंकारिक आकार कापून त्याचे ठसे घेऊन संकल्प तयार करणे.<br>**आकार :** सुयोग्य **माध्यम :** काळा रंग/प्रिंटींग इंक<br>(५) **मुद्रा चित्र :** काच किंवा प्लॅस्टिकसारख्या गुळगुळीत पृष्ठभागावर रंग टाकून त्याचे ठसे घेऊन संकल्प निर्मिती करणे.<br>**आकार :** सुयोग्य **माध्यम :** काच/प्लॅस्टिक, जलरंग/पोस्टर कलर्स |
| ४. | लघुचित्रशैली,<br>विविध रचनाशैली<br>व<br>म्यूरल | (१) सर्जनशीलता, कल्पकता यावर आधारीत विषयांवर रचनात्मक चित्र निर्मिती करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** सुयोग्य<br>(२) लघुचित्रशैलीचा अभ्यास करून अलंकारिक पद्धतीने मानवाकृती किंवा निसर्गनिर्मित घटकांचा वापर करून ऐतिहासिक अथवा पौराणिक विषयावर चित्रात्मक रचना तयार करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** सुयोग्य<br>(३) भारतीय कलाशैलींचा अभ्यास करून त्यापैकी आवडत्या शैलीत रचना तयार करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** सुयोग्य<br>(४) जनजागृती व समाजप्रबोधनात्मक विषयावर संकल्प तयार करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** सुयोग्य<br>(५) सामाजिक विषयावर चित्रात्मक रचना तयार करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** सुयोग्य<br>(६) स्वप्न, कल्पनेतील विश्व, भविष्यातील युग यांसारख्या विषयांवर संकल्प रचना तयार करणे.<br>**आकार :** १/८ ड्रॉईंग पेपर **माध्यम :** सुयोग्य |

## संकल्पचित्र









## संकल्पचित्र










# रचनाचित्र संकल्प (Pictorial Composition)









# रचनाचित्र संकल्प (Pictorial Composition)









## रचनाचित्र संकल्प (Pictorial Composition)









संकल्पचित्र (Gray Scale)






संकल्पचित्र






# द्विमित संकल्प (दृष्टिभ्रम)












## संकल्पचित्र










## द्विमित संकल्प (दृष्टिभ्रम)









## संकल्पचित्र









## मार्बलिंग





## द्‌विमित संकल्पचित्र (मुद्राचित्र)





# स्मरणचित्र









## स्मरणचित्र







## चित्रात्मक संकल्प





# वस्तुचित्र






















# स्थिरचित्र







## लघुचित्र




**कला विषय विद्यार्थी चित्राकृती :**

(१) बाराशिव हनुमान कनिष्ठ महाविद्यालय, बाराशिव ता. वसमत जि. हिंगोली. (२) इंदिराबाई ललवाणी न्यु कॉलेज जामनेर , ता. जामनेर, जि. जळगाव (३) एस. एम. आर. के. महिला महाविद्यालय, नाशिक. (४) नागनाथ वाणिज्य, विज्ञान व कला महाविद्यालय, औंढा (नागनाथ) जि. हिंगोली.



































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.**

कलेचा इतिहास व रसग्रहण इ.१२वी

₹८५.००

